# ४४ लाखांचा अंमली पदार्थांचा साठा जप्त

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ११ :

पुणे शहरातील कात्रज परिसरात गुन्हे शाखेच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने मोठी कारवाई केली आहे. पथकाने ५० वर्षीय आरोपीकडून सुमारे ४४ लाख रुपयांचा अंमली पदार्थांचा साठा जप्त केला आहे. पोलीस कर्मचारी योगेश मांढरे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे प्रीतम हाईट्स, मांगडेवाडी, कात्रज येथील अरुण अशोक अरोरा याच्या घरावर छापा टाकण्यात आला. या कारवाईत पोलिसांनी २ किलो १४० ग्रॅम चरस आणि १ किलो ७९० ग्रॅम गांजा जप्त केला. या अंमली पदार्थांची एकूण किंमत ४३ लाख ८७ हजार रुपये आहे. पोलिस अंमली पदार्थांचा स्रोत, त्याचे ग्राहक आणि साथीदार, तसेच त्याच्या तस्करी नेटवर्कबद्दल तपास करत आहेत.


Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५४ * अंक २८५ * | * नागपूर * | रविवार, दिनांक १२ जानेवारी २०२५ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)







# ठाकरे गट स्थानिक स्वराज्य संस्था स्वबळावर लढवणार : संजय राऊत

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :



मुंबई ते नागपूरपर्यंत सर्व महानगर पालिका, जिल्हा परिषद आणि नगर परिषदेच्या निवडणुका स्वबळावर लढणार असल्याची घोषणा उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केली आहे. उद्धव ठाकरे यांनी आम्हाला स्वळावर लढण्याचे सांगितले आहे. या संदर्भात आम्ही पदाधिकाऱ्यांशी तशी चर्चा केली असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे आम्हाला देखील पाहायचे आहे की काय होते? असे देखील ते म्हणाले. आघाडीमध्ये लढताना कार्यकर्त्यांना संधी मिळत नाही. त्याचा पक्षाच्या वाढीला देखील फटका बसतो. त्यामुळे महानगरपालिका, जिल्हा परिषद, नगर परिषदेमध्ये आम्ही स्वबळावर लढणार असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे.

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत उद्धव ठाकरे गट, काँग्रेस आणि शरद पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्र निवडणुका लढवल्या होत्या. यात लोकसभा निवडणुकीत आघाडीला मोठे यश मिळाले मात्र विधानसभा निवडणुकीत मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले. विधानसभा निवडणुकीनंतर महाविकास आघाडी कायम राहणार का? याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात होते. त्यातच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आता होणार आहे. या निवडणुका आघाडी एकत्र लढणार नसल्याचे संकेत उद्धव ठाकरे गटाच्या वतीने वारंवार दिले जात होते. त्यानुसार आज संजय राऊत यांनी स्पष्टपणे आपण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वभावावर लढणार असल्याची घोषणा केली आहे. त्यामुळे आता शिवसेना महाविकास आघाडीतून बाहेर पडले असल्याचे बोलले जात आहेत.

आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संदर्भात उद्धव ठाकरे यांच्या वतीने त्यांच्या मातोश्री निवासस्थानी सर्वच स्थानिक पदाधिकाऱ्यांच्या बैठकांचे सत्र सुरू होते. यामध्ये सर्वच महानगरपालिका, जिल्हा परिषद आणि नगरपरिषदेच्या कामाचा आढावा उद्धव ठाकरे घेत होते. प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पक्षाची स्थिती आणि पक्ष मजबुत करण्यासाठी प्रयत्न उद्धव ठाकरे गटाच्या वतीने मागील काही दिवसांपासून सुरू होते. यातूनच उद्धव ठाकरे स्वबळाची तयारी करत असल्याचे संकेत मिळाले होते. त्यानुसार आता संजय राऊत यांनी स्वबळावर निवडणुकीला सामोरे जाणार असल्याची घोषणा केली आहे. त्यामुळे आता काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष काय निर्णय घेणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

विधानसभा निवडणुकीत संजय राऊत यांनी जागा वाटपाला उशीर केल्याचा आरोप काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केला होता. त्याला प्रत्युत्तर देताना संजय राऊत यांनी काँग्रेसला चांगलेच सुनावले. महाराष्ट्रात काही नेते मुख्यमंत्रीपदाचा कोट शिवून तयार होते. त्यात आम्ही नव्हतो, असे संजय राऊत यांनी म्हटले आहे. या माध्यमातून संजय राऊत यांनी काँग्रेसला प्रत्युत्तर दिले आहे.

महाराष्ट्रात शिवसेनेमुळे पराभव झाला असे म्हणत असतील तर हरियाणा, जम्मू-काश्मीर, पश्चिम बंगाल मध्ये काँग्रेसचा पराभव का झाला? असा प्रश्न राऊत यांनी उपस्थित केला. विजय वडेट्टीवार देखील या सर्व बैठकांना हजर होते. आघाडीमध्ये समन्वयाचे आणि तडजोडाची भूमिका स्वीकारावी लागते. तशी भूमिका ज्याची नसते, त्यांना आघाडीमध्ये राहण्याचा अधिकार नसतो. असे देखील राऊत यांनी म्हटले आहे.

# संजय राऊत रिकामटेकडे मी नाही : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांना नागपुरात एक टोला लगावला. नागपुरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (मेडिकल) आणि इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाला (मेयो) भेट दिल्यावर पत्रकारांशी फडणवीस बोलत होते.

शुक्रवारी नागपुरातील एका झालेल्या मुलाखतीत देवेंद्र फडणवीस म्हणाल होते की, उद्धव ठाकरे पूर्वी माझे मित्र होते. आता राज ठाकरे मित्र आहे. त्यावर संजय राऊत यांनी शनिवारी फडणवीसांवर टीका करतांना देवेंद्र फडणवीस नाही ठरवणार कोणता पक्ष भविष्यात कुठल्या पक्षासोबत जाणार. फडणवीसांनी आपचा पक्ष फोडला. ही कुठली आयडिओलॉजी आहे.असा सवाल केला.त्यावर माध्यमांनी फडणवीस यांना प्रतिक्रिया विचारली असता ते म्हणाले, संजय राऊत यांनी त्यांचे मत व्यक्त केले. मी मुलाखतीत माझे मत व्यक्त केले. मी कुणाच्याही प्रश्नावर उत्तर द्यायला बांधील नाही. कुणीही बोलल्यास त्यांच्या वक्तव्यावर मत व्यक्त करायला. ते (संजय राऊत) रिकामटेकडे आहे. ते रोज बोलतात मी रिकामटेकडा नाही, असे फडणवीस म्हणाले.

नागपुरातील मेडिकल आणि मेयो हे दोन्ही शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालये जुनी आहेत. दोन्ही महाविद्यालयातील इमारतींना अनेक दशक झाले आहे. त्यामुळे येथील इमारती अध्यायावत करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी एक हजार कोटींचा निधी दिला होता. दोन्ही ठिकाणी कामाची प्रगती पाहण्यासाठी मी आलो होतो. दोन्ही ठिकाणी काम सुरू असून प्रगतीपथावर आहे. गती वाढवण्याची आवश्यकता आहे. काही त्रुटी आढळल्या, त्या दुरुस्त करण्याची आवश्यकता आहे. निधीची कमतरता आम्ही पडू देणार नाही. काम दर्जेदार झाले पाहिजे अशी अपेक्षा आहे.

# तुटकर पैशांसाठी काहींनी इमान विकले

## चंद्रकांत खैरेंचा शिंदे गटावर घणाघात

■ महासागर प्रतिनिधी
छत्रपती संभाजीनगर, दि. ११ :

तुटकळ पैशांच्या अमिषापोटी काही पदाधिकाऱ्यांनी आपले इमान गद्दार गटाच्या हाती विकले, अशा शब्दांत शिवसेनेचे माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी शिंदे गटावर हल्लाबोल केला. यावेळी चंद्रकांत खैरे यांनी नंदकुमार घोडोले यांच्यावरही नाव न घेता टीका केली. मंत्र्याची गुलामी करण्यासाठी महापौराने शिवसेना सोडली, असे ते म्हणाले. तसेच शिवसेनेशी गद्दारी केलेले लोक मुख्यमंत्री झाले. परंतू त्यांना जनमानसात कधीच सन्मान मिळणार नाही, असे विधान अंबादास दानवे यांनी केले.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचा संभाजीनगर जिल्ह्यातील पदाधिकारी व लोकप्रतिनिधी यांचा शनिवार रोजी मेळावा पार पडला. शिवसेना नेते चंद्रकांत खैरे व शिवसेना नेते अंबादास दानवे यांनी या मेळाव्यास प्रमुख मार्गदर्शन केले. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेवर शिवसेनेचा भगवा ध्वज फडकविण्याचा यावेळी एकमुखाने निर्धार करण्यात आला.

शहरातील संत एकनाथ रंग नाट्यमंदिर येथे संपन्न झालेल्या मेळाव्याची शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस तर शिवसेना नेते अंबादास दानवे यांनी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून सुरुवात करण्यात आली. तदनंतर पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या हस्ते द्वीपप्रज्वलन करण्यात आले. माजी आमदार उदयसिंग राजपूत, शहरप्रमुख बाळासाहेब थोरात, दिनेश परदेशी, राजू शिंदे, दत्ता गोर्डे, महिला आघाडी जिल्हा संघटिका आशा दातार व युवासेना युवा जिल्हाधिकारी विठ्ठल डमाळे यांनी मनोगत व्यक्त केले.

# लाचखोर कृषी अधिकाऱ्याला अटक

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. ११ :

पुणे येथील कृषी आयुक्तालयातील फलोत्पादन विभागाचे उपसंचालक आणि प्रभारी सहसंचालक संजय बहादू गुंजाळ यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून पकडले आहे. निलंबित कर्मचाऱ्याकडून अडीच लाख रुपयांची लाच स्वीकारताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले. गुंजाळ यांनीनिलंबित कनिष्ठ लिपिकाकडून तीन लाख रुपयांची लाच मागितली होती. २०१९-२० मध्ये बुलढाण्यातील जळगाव जामोद येथे कार्यरत असलेल्या या कर्मचाऱ्याला प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेतील गैरव्यवहारामुळे निलंबित करण्यात आले होते.

# एकत्र लढण्यासाठी काँग्रेसचा पुढाकार

## ठाकरेंशी चर्चा करण्याची वडेट्टीवारांची तयारी

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ११ :

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या स्वबळावर लढणार असल्याची घोषणा उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केली आहे. मात्र, तरी देखील आम्ही उद्धव ठाकरे यांनी भेट घेऊन त्यांना एकत्र येण्याची विनंती करणार असल्याचे काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.

इतकेच नाही तर दिल्लीत इंडिया आघाडी अजूनही मजबूत असल्याचा दावा देखील वडेट्टीवार यांनी केला आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीवरुन राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. एकिकडे स्थानिक स्वराज्य संस्था स्वबळावर लढण्याची घोषणा करत, इंडिया आघाडी तुटण्याचे संकेत संजय राऊत यांनी दिले आहेत. तर दुसरीकडे इंडिया आघाडी मजबूत असल्याचा दावा वडेट्टीवार यांनी केला आहे.

या संदर्भात विजय वडेट्टीवार म्हणाले की, इंडिया आघाडी अजूनही मजबूत आहे. दिल्लीमध्ये इंडिया आघाडी एकत्रीत काम करत आहे.

# संजय राऊतांनी आधी चर्चा करायला हवी होती

## स्वबळाच्या घोषणेवर वर्षा गायकवाडांची टीका

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ११ :



शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढण्याची घोषणा केली. त्यांच्या घोषनेनंतर एकच खळबळ उडाली असून महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या प्रतिक्रियाही समोर येत आहेत. आम्हीही मुंबईपासून ते नागपूरपर्यंत महापालिका निवडणुका कशा लढवायच्या यावर वरिष्ठांशी बोलून ठरवू, असे सूचक वक्तव्य काँग्रेसच्या खासदार वर्षा गायकवाड यांनी केले.

विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला अपेक्षित यश मिळाले नाही. आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका येऊन ठेपल्या आहेत. महायुती या निवडणुकांच्या तयारीला लागली असून, महाविकास आघाडीत बिघाडी होत असल्याचे दिसत आहे. ठाकरे गट स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढवणार, अशी घोषणा संजय राऊत यांनी आज केली. महापालिकेच्या निवडणुकीत ठाकरे गटाने स्वबळाचा नारा दिल्यानंतर काँग्रेसच्या खासदार वर्षा गायकवाड यांनी उपरोक्त विधान केले आहे.

महाविकास आघाडी एकत्र राहिली पाहिजे अशीच आमची इच्छा आणि भूमिका असून त्यासाठी आम्ही सवोतोपरी प्रयत्न करत असल्याचे वर्षा गायकवाड म्हणाल्या. ठाकरे गटाच्या महापालिका निवडणुकीच्या भूमिकेसंदर्भात आम्ही वरिष्ठ नेत्यांबरोबर चर्चा करणार असून त्यानंतर निर्णय घेऊ, असेही त्या म्हणाल्या.

राऊत यांनी अशा गोष्टी थेट माध्यमांमध्ये जाऊन बोलण्यापेक्षा चर्चेच्या माध्यामातून सांगायला पाहिजे होती, अशा शब्दांत वर्षा गायकवाड यांनी संजय राऊत यांच्यावर आगपखाड केली. संजय राऊत त्यांच्या पक्षाचे व्यक्तिगत मत मांडत असतील. पण आमच्या पक्षाची भूमिका लवकरच सांगू, असेही गायकवाड यांनी सांगितले आहे.



नागपूर : दैनिक 'महासागर'च्या दिनदर्शिकेचे प्रकाशन करताना राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्यासह नाशिक मधील मान्यवर

# आरोपी विष्णू चाटेला २ दिवसांची पोलीस कोठडी

■ महासागर प्रतिनिधी
बीड, दि. ११ :

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील अटकेत असलेला मुख्य आरोपी विष्णू चाटे याला न्यायालयाने दोन दिवसांची सीआयडी कोठडी ठोठावली आहे. सीआयडीच्या वतीने विष्णू काटेला १४ दिवसांची कोठडी देण्याची मागणी करण्यात आली होती. विष्णू चाटे हा संघटित गुन्हेगारीचा भाग असून त्याच्या आणखी चौकशीसाठी कोठडी द्यावी, असा युक्तीवाद वकिलांनी केला होता. त्यानुसार न्यायालयाने विष्णू चाटेला आणखी दोन दिवसांची कोठडी दिली आहे. दरम्यान, संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींवर मकोका लावण्यात आला असून विष्णू चाटेचाही त्यात समावेश आहे. विष्णू चाटे याला शुक्रवारी खंडणी प्रकरणात न्यायलयीन कोठडी मंजूर करण्यात आली होती.




# योग्य नाश्त्याची निवड



कॉलेजगोइंग किंवा नोकरीला जाणारी मुलं एकटी राहायला लागलं, की सकाळच्या नाश्त्याची अबाळ करतात. घरगुती खाद्यपदार्थ मिळणाऱ्या ठिकाणी रोजचा नाश्ता परवडतोच असंही नाही किंवा एका ठराविक काळानंतर त्याचा कंटाळाही येतो. तेव्हा सकाळच्या धावपळीतही घरीच, पौष्टिक नाश्ता काय करता येईल, याविषयी...

शिक्षण किंवा कामानिमित्त एकटं राहायची वेळ अनेकदा मुलांवर येते. अशा वेळी खाण्या-पिण्याची जरा अबाळच होते. दोन्ही वेळचं जेवण बाहेर करता येतं; पण नाश्ता इतक्या सकाळी मिळणं अवघडच. एखाद्या घरगुती खाद्यपदार्थ मिळणाऱ्या ठिकाणी रोजचा नाश्ता परवडतोच, असंही नाही. तसंच ठराविक काळानंतर त्या खाण्याचा कंटाळाही येतो.

तेव्हा नोकरी किंवा कॉलेजला जाण्यापूर्वी घाईघाईनं नाश्त्यासाठी काय करायचं, असा प्रश्न पडतो. त्यातही हे खाणं दिवसाच्या सुरुवातीला असल्यामुळे पौष्टिक असलं पाहिजे, असंही मनातून वाटतं असतं; कारण त्यातूनच दिवसभराची ऊर्जा टिकून राहाणार असते. सकाळच्या घाईत त्यासाठीचे पर्याय पटपट सुचतातच, असं नाही. याचसाठी नाश्त्याचे सकाळच्या घाईत करता येण्यासारखे, तरीही सकस आणि पौष्टिक असे काय पर्याय प्रत्यक्ष करता येतील, याविषयी...

**अंडं आणि चटणी-पोळी रोल**

उकडलेलं अंडं, ऑम्लेट आणि पोळी हा नाश्ता करता येईल. पोळ्या विकत आणून ठेवता येतात. हल्ली घरगुती खाद्यपदार्थ मिळण्याची ठिकाणंही वाढली आहेत. प्रत्यक्षात जे पदार्थ बरेच वेळखाऊ आहेत, ते या ठिकाणांहून आणायचे आणि सकाळचा नाश्ता घरीच करायचा. हे छान सोयीचंही आहे. पोळीबरोबर अंडं घेतलं, तर त्यात प्रथिनं, ऊर्जा दोन्ही मिळेल. तिळाची, शेंगदाण्याची, कारळाची, जवसाची चटणी आणून ठेवायची. पोळीवर चटणी पसरून थोडं ऑलिव्ह ऑइल घालून 'रोल' करून घेता येईल.

**दूध मिश्रित पदार्थ**

कॉर्नफ्लेक्स आणि दूध, मुसली (एकप्रकारच्या धान्यापासून बनवलेलं असतं) आणि दूध हे एकत्र करूनही सकस असा नाश्ता करता येईल. एक कप दूध गरम करून एक चमचा ओट्स-बदाम-साखर घालून उत्तम पॅटीसही करता येईल.

**चहा आणि नाश्ता**

अनेकदा सकाळच्या किंवा संध्याकाळच्या चहाबरोबर बऱ्याच जणांना जिरा बटर, बिस्कीट किंवा पोळीचा रोल करून खाण्याची सवय असते. मात्र, केवळ एवढंच खाऊन ते पोटभरीचं ठरतंच असं नाही. नुसता चहा पिणंही पुष्कळ वेळा नको वाटतं. चहा हे मुळातच गोडसर पेय असल्यामुळे त्याबरोबर काहीतरी तिखट, झणझणीत किंवा चमचमीत खावंसं वाटणंही तसं स्वाभाविकच असतं. अशा वेळी खाकरा, ठेपले, शंकरपाळी, परतून केलेला चिवडा खाता येईल. वेगवेगळ्या प्रकारचे लाडूही खाता येतील.

**रेडी टू कूक**

'रेडी टू कूक' पदार्थ घेताना त्यात तेल-तूप-बटर याचं प्रमाण तसंच मिठाचं आणि पदार्थ टिकण्यासाठी वापरलेल्या पदार्थांचं (झीश-ेशीर्रिंळींश) प्रमाण किती आहे, हे पाहाणं आवश्यक आहे. ते वरचेवर फार वापरू नयेत; कारण ग्रेव्हीसाठी खोबरं, काजू इत्यादी पदार्थ वापरलेले असतात. मुगाच्या डाळीची खिचडी, पुलाव, उपमा इ. काही प्रमाणात वापरलेलं चालेल. तसंच पोषणमूल्य व्यवस्थित मिळावी म्हणून एक कप दूध, दोन फळं, मूठभर सुकामेवा रोज केव्हाही घेणं चांगलं. अंजिर, जर्दाळू, बदाम, खजूर, मनुका, बेदाणेही नियमित घ्यावे.

**ब्रेडपेक्षा पोळीच...**

वर उल्लेख केल्याप्रमाणे कोणताही नाश्ता आणि दूध एकत्र घ्यायला हरकत नाही. म्हणजे प्रथिनं आणि कार्बोहायड्रेट्स मिळतील. तसंच पोळीवर काकवी घालूनही घेता येईल. लोह मिळण्यासाठी ते उत्तम. तऱ्हेतऱ्हेचे लाडू, दूध हे उत्तम पौष्टिक पदार्थ आहेत. ब्रेडपेक्षा पोळी हा पर्याय केव्हाही चांगला आहे. मोड आलेली कडधान्य, कच्ची किंवा उकडून मीठ-तिखट घालून, पोळीवर, खाकऱ्यावर किंवा ठेपल्यावर पसरून खाता येतील.

**मस्त खा**

रोजच्या धावपळीतही तुमच्या आरोग्याला साजेसा, प्रकृतीला योग्य तो नाश्ता निवडून दिवसाच्या महत्त्वाच्या खाण्याची सुरुवात करा. नाश्ता हा दिवसभर लागणाऱ्या ऊर्जेसाठी असणारा महत्त्वाचा स्रोत आहे. तेव्हा तो कधीही टाळू किंवा चुकवू नका. मस्त खा आणि स्वस्थ राहा!




# चना... गर्रम!!



आदमी का नही , घोडे का खुराक म्हणून चना गरमची पूर्वी टिंगल केली जायची. त्यातही तो खास बम्बय्या पदार्थ नाही , म्हणून ' चाखण्या ' पुरताच त्याचा आस्वाद घेणारे अधिक. पण गेल्या काही वर्षात चना गरम मसालाने मुंबईकरांच्या संध्याकाळच्या हेल्दी चाटची फर्माईश पुरी केली आहे. भेळपुरी , पाणीपुरी , रगडा पॅटीससारख्या जीभेचे लाड पुरवणाऱ्या चाटच्या जोडीला आता ' चना गर्रम... ' चा आवाज जोर धरतोय.

मांटुगा रोड स्टेशनचा ब्रिज उतरून खाली आलं की नारायण गुप्ताच्या गाडीवरची तोबा गर्दी पाहून ' चना गरम्म ' चा आवाज वाढत असल्याची खात्री पटते. अठ्ठेचाळीस वर्षांपूर्वी गुप्ताजींनी दादरच्या डिसिल्व्हा शाळेसमोर चनामसाल्याची गाडी लावायला सुरुवात केली. तेव्हा त्याची रेसिपी आणि पद्धतही वेगळी होती. शाळकरी मुलांच्या तब्येतीला झेपेल इतकं तिखट आणि अपचन होऊ नये म्हणून मिरीचा माफक ठसका यात असायचा. सकाळच्या वेळी दूरून येणाऱ्या मुलांच्या नाश्त्याची सोय व्हावी , म्हणून यात जोडीला पावही दिला जायचा. लवकरच ही गाडी तिथून हलली आणि मांटुगा रोडच्या कोपऱ्यावर आली. तरीही या गाडीकडे येणारं डिसिल्व्हाकडचं गिऱ्हाईक काही कमी झालं नाही.. आजही चना गरम मसाल्याची वाफाळती चव चाखण्यासाठी मुंबईच्या कानाकोपऱ्यातून येणारे दर्दी खवय्ये सहकुटुंब- सहपरिवार इथे येतात. हिरव्या चण्यासारख्या वरकरणी क्षुल्लक वाटणाऱ्या कडधान्याचा भाव या चना गरमच्या डिशमध्ये चांगलाच वधारलेला दिसतो. गाडीवरचा सारा लवाजमा पाहिला तर हा पदार्थ बनवण्याची रेसिपी एकदम सोपी असावी असं वाटतं. पण त्यातल्या मसाल्याच्या जायक्यामध्ये याच खरा स्वाद लपलेला आहे.

स्वच्छ धुऊन आठ तास भिजवलेले हिरवे चणे , सैंधव मीठ घालून उकडले जातात. जितके चणे त्याच्या दीडपट पाणी. चणे उकडल्यानंतर त्यातलं हे पाणी वेगळं काढून ठेवलं जातं. चना गरमची टेस्ट वाढण्याचं खरं काम करतं हे पाणीच. उकडलेले चणे द्रोणात घेऊन त्यावर पहिला हात फिरवला जातो तो तीन वेगवेगळ्या मसाल्यांचा. हिरवा , गरम आणि लाल मसाला. हे मसाले रगड्यावर खास वाटून व बत्त्यात कुटून बनवले जातात. हिरव्या मसाल्यात पुदिना , कढीपत्ता , कोथिंबीर आणि ठसक्याची मिरची तर लाल मसाल्यामध्ये धने व लालचुटूक मिरच्यांची पूड असते. यातल्या गरम मसाल्यात सरसकट सगळ्या मसाल्यांची भर नसते , तर दालचिनी आणि लवंगचा टक्का थोडा जास्त असलेला मसाल्याची लज्जत वाफाळता चना जोर खाताना जीभेवर रेंगाळते..

गिऱ्हाइकाच्या मागणीनुसार तिखटाची मात्रा कमी- जास्त करीत हे वाफाळते चणे या तिन्ही मसाल्यात नीट घोळवले जातात. चिमूटभर मीठ , त्याहून किंचित अधिक हिरवा मसाला , स्पेशल लाल चना मसाल्यामध्ये चणे नीट मुरले की , त्यात कच्चा बारीक कापलेला कांदा , टोमॅटो , कोथिंबीर , उकडलेला बटाटा-कैरीच्या बारीक तुकड्यांचे मिश्रण यात घातले जाते. छोट्या स्टोव्हवर रटरटणाऱ्या चण्यांमधील पाणी घालून पुन्हा एकदा चना गरमवर हात फिरवला जातो. टोमॅटो , कैरी , लिंबू असे आंबट चवीचे तिन्ही पदार्थ यात घातलेले असले , तरीही चना गरमचा कल हा सोसावणाऱ्या तिखटाकडे अधिक असतो. शेवपुरी खाल्ल्यानंतर शेवटी ज्या सुक्या पुरीची फर्माइश असते , अगदी तशीच या मिरमिरीत चण्यांचा आस्वाद घेतल्यानंतर त्यातलं गरमागरम मसाला मारके पाणी ओरपणाऱ्यांचीही कमी नाही..

माटुंग्यातल्याच नल्ली दुकानाच्या गल्लीमधल्या मणीभाईची चनामसाल्याची गाडीही अशीच गर्दी खेचणारी. संध्याकाळी पाच ते नऊ या वेळेतच ही छोटी गाडी लागते. तरीही स्पेशल पुदिना चाट आणि दाक्षिणात्य मसाल्यांच्या चवीमुळे तिचे असंख्य चाहते आहेत. या चाटमसाल्यामध्ये सुकवलेल्या डाळींच्या पिठींचा मुबलक वापर केला जातोच , शिवाय पुदिन्याची महक त्याला वेगळी लज्जत आणते. थंडी आणि पावसाच्या गारेगार मोसमात हा गरमागरम पदार्थ खाण्यासाठी गर्दी असते , हा समज दादरच्या प्लॅटफॉर्म नंबर एकवर असणारा चना मसाल्याचा ठेला दूर करतो. संध्याकाळी कडाक्याच्या भुकेच्या वेळी भेळेप्रमाणे पोटाला आधार देणारा. या चना मसाल्यात लाल मसाल्याचा वापर माफक पण कोथिंबीर अन् कांद्याचे भाव वाट्टेल तितके वाढलेले असले तरीही सढळहस्ते देण्याची किमया साधतो. घरी पार्सल न्यायचं असेल तर मीठ- कांदा घातल्यावर चण्याला सुटणारे पाणी वगळण्यासाठी वेगवेगळ्या पुड्या बांधून देण्याचीही सोय आहे.. इथे द्रोण वा प्लेटची चैन नाही , कडक कागदांचा चौकोन चमच्यासारखा वापरून शेवटच्या घासाला त्यालाही लख्ख करणारे चनादर्दी आहेतच!

चनामसाल्याच्या रेसिपीची पारंपारिक बूज कायम ठेवणाऱ्या या मोजक्या गाड्यांच्या सोबतीला या रेसिपीत सातत्याने प्रयोग करणारे गाडीवाले नरीमन पॉइंटच्या भागात हमखास पाहायला मिळतात. त्यांनी मसाल्याच्या वैविध्यपूर्ण वापराचे प्रयोग केले नसले , तरीही एलिट बटर मस्क्याला मात्र त्यांनी या चनागरममध्ये आणून ठेवलंय. गरमागरम चना मसाल्याला तेलातुपाचा तवंग नसला , तरीही हे गाडीवाले मात्र बटर की साधा असा प्रश्न आणि पैसे दोन्ही आकारतात. अलीकडे महालक्ष्मी रेसकोर्सच्या छोटेखानी हॉटेलमधील पार्ट्यांमध्येही चनागरमचा स्पेशल स्टॉल लागलेला दिसतो यात डाळिंब , बीट , मक्याचे दाणे घालून त्यात वैविध्यही येतंय.. थंडीचा जोर वाढेल तशी वाट वाकडी करून

# खाणं आणि तणाव

ताणतणाव असला की नकळतच आपला भर खाण्यापिण्यावर असतो. कधी आपण अती खातो, तर कधी खाणंच टाळतो. पण त्याऐवजी तुम्ही इतर अनेक गोष्टी करून ताण हलका करू शकता.

कामाच्या ठिकाणी तणावपूर्ण परिस्थिती असल्यास त्याचा सामना करायला शिका. आलेल्या ताणाचा परिणाम तुमच्या आयुष्यावर होऊन देऊ नका.

तुमच्या कामाच्या ठिकाणी, तुमच्या डेस्कजवळ असणाऱ्या बोर्ड वर मोठ्या अक्षरात लिहून ठेवा, 'तणावाशी दोन हात करण्यासाठी मी खाण्याच्या पदार्थांचा आधार घेणार नाही. त्याने माझं नुकसान होईल.' हे काहीसं नाटकी वाटत असलं तरी दरवेळी हे वाक्य नजरेसमोर आणलं की आपोआप मनावर ताबा राहील.

तुम्हाला चहा, कॉफी किंवा इतर कोणत्याही पेयाची सारखी गरज भासते का? ती सवय घालवण्यासाठी एक उपाय करून बघा. एका मोठ्या बाटलीत पाणी भरून त्याला चहा किंवा कॉफी असं लेबल चिकटवून ठेवा. चहा कॉफी पिण्याची इच्छा झाली की लगेच बाटलीतून एक घोट पाणी प्या. अगदीच समाधान नाही झालं तर अर्धा कप चहा कॉफी घेण्यास काही हरकत नाही. हळूहळू ती सवय कमी होईल.

तणावाच्या या लढाईत तुमचा सगळ्यात मोठा शत्रू म्हणजे ताण कमी करायला खाण्याची इच्छा होणे. भावनेच्या आहारी जाऊन किती आणि काय खाल्लं जातंय याचं भान राहत नाही. खूप ताण आला असेल आणि काहीतरी खावंसं वाटत असेल तर तुमचं लक्ष दुसरीकडे वळवा. मोकळ्या हवेत फिरायला जा, किंवा मेडीटेशन करून बघा. तरीही खाण्याची इच्छा होत असेल तर ताज्या भाज्या किंवा केळी, सफरचंद, संत्री अशी फळं खाता येतील. फळांचा ज्यूस प्यायचा असेल तर त्यातली साखर कमी करण्यासाठी बर्फाचं प्रमाण जास्त ठेवा.



तुमच्या कामाचं स्वरूप सतत तणाव देणारं असेल तर थोडंसं लक्ष तुमच्या छंदाकडे द्या. बागकाम, गाणं, नृत्य, वाद्य वाजवणं अशा कोणत्याही गोष्टीची आवड असेल तर ती नक्की जोपासा. नवीन गोष्ट शिकताना असलेल्या उत्साहामुळे कामाचा ताण कमी होण्यास नक्कीच मदत होईल.

भरपूर कॅलरी असलेल्या जंक फुडच्या आहारी जाण्यापेक्षा मेडीटेशन, योगा, श्वासाचे व्यायाम आणि रोजचे व्यायाम यांनी तणावाला नियंत्रणात ठेवता येईल.

# सावधान...एनर्जी ड्रिंकमुळे 'धडधड वाढते ठोक्यात'!

दिवसभराच्या दगदगीनं आलेला थकवा घालवण्यासाठी झक्कासपैकी एनर्जी ड्रिंक घेऊन रिफ्रेश होण्याचा तुमचा फंडा असेल, तर या कॅनचा किंवा बाटलीचा नाद लवकरात लवकर सोडणंच तुमच्या हिताचं आहे. कारण, कॅफेनयुक्त एनर्जी ड्रिंकमुळे ह्रदयाचे ठोके वाढत असल्याचं एका संशोधनातून समोर आलंय आणि हे लक्षण दुर्लक्ष करण्यासारखं नक्कीच नाही.

जर्मनीच्या बॉन विश्वविद्यालयातील संशोधकांच्या एका पथकानं १७ व्यक्तींवर एक प्रयोग केला. एनर्जी ड्रिंक घेतल्यानंतर तासभरानं त्यांच्या ह्रदयाचे ठोके तपासले असता, ही धडधड वाढल्याचं निदर्शनास आलं. त्यामुळे अशा एनर्जी ड्रिंकपासून दोन हात लांबच राहण्याचा सल्ला प्रमुख संशोधक डॉक्टर योनास डॉर्नर यांनी दिला आहे. उत्तर अमेरिकेतील रेडिओलॉजिकल सोसायटीच्या वार्षिक बैठकीत त्यांनी आपल्या संशोधनाबाबत सविस्तर माहिती दिली.

कॅफेनच्या अतिसेवनाचे अनेक दुष्परिणाम आहेत. उच्च रक्तदाब, भीती वाटणं, दरदरून घाम फुटणं, ह्रदयाचे ठोके वाढणं अशा समस्या त्यातून उद्भवू शकतात. असं असतानाच, कोला किंवा कॅफेनयुक्त इतर पेय-पदार्थांपेक्षा एनर्जी ड्रिंकमध्ये कॅफेनचं प्रमाण तीन पट अधिक असतं. स्वाभाविकच, ही पेयं झटपट एनर्जी देत असली तरी ती कालांतरानं शरीराला हानीकारक ठरू शकतात, याकडे डॉ. डॉर्नर यांनी लक्ष वेधलं. ह्रदयाशी संबंधित काही आजार झालेल्या व्यक्तींनी एनर्जी ड्रिंकचं सेवन पूर्णपणे टाळावं, असंही त्यांनी नमूद केलं. याबाबत अजून थोडा अभ्यास शिल्लक असल्याचंही त्यांनी सांगितलं.

दरम्यान, एनर्जी ड्रिंकचं सेवन बच्चेकंपनीसाठी चांगलं नसल्याचं ब्रिटीश सॉफ्ट ड्रिंक असोसिएशननं याआधीच स्पष्ट केलं आहे. त्यामुळे तात्पुरत्या एनर्जीसाठी आरोग्याची खेळणं टाळलेलंच बरं, नाही का?

# 'मोनो डाएट'चं फॅड

वाढलेलं वजन झटपट कमी करायची अनेकांना खूप घाई होते. सध्याच्या फास्ट जीवनशैलीत सगळे शॉर्टकटच्या मागे लागतात आणि मग झटपट वजन कमी करण्यासाठी 'मोनो डाएट' किंवा एकाच प्रकारचे पदार्थ खाणे, अशा मार्गाचा अवलंब केला जातो. आहारशास्त्रातील कुठल्याही चांगल्या पुस्तकात याची शिफारस नाही.

'मोनो डाएट' म्हणजे फक्त एकच एक किंवा जास्तीत जास्त २ ते ३ पदार्थ आहारात असणे. उदाहरण, द्यायचे तर दिवसभर फक्त फळे खाऊन राहणे किंवा फक्त भाज्या आणि सूप घेणे, फक्त चिकन खाणे, फक्त चपाती आणि भाजी खाऊन राहणे, फक्त इडल्याच खाणे किंवा फक्त वेटलॉससाठी तथाकथित विविध महागडे शेक्स पिऊन राहणे. अशा प्रकारच्या आहारांना काही वैज्ञानिक आधार आहे का, तर याचे उत्तर आहे की, खरं तर मुळीच नाही. आहारशास्त्रावर आधारित असलेल्या कुठल्याही चांगल्या पुस्तकात याबद्दल, वजन कमी करण्यासाठी असे आहार घेण्यास सांगितलेलं नाही, तरीही अनेक जण ते घेत असतात.

**'मोनो डाएटस'चे परिणाम**

मोनोडाएट म्हणजे एकाच गटातील अन्न दिवसभरात पुन्हा पुन्हा खायचे. अशा प्रकारचा आहार साधारण एक ते तीन दिवस किंवा जास्तीत जास्त आठवडाभर घेतला जातो. काही वेळा वजन कमी करण्याच्या प्रक्रियेत अचानकपणे वजन कमी होणं बंद होतं आणि वजनकाटा पुढे सरकण्याचं नाव घेत नाही. अशा वेळी फक्त तज्ज्ञांच्या देखरेखीखाली कधीतरी आपण हे 'मोनो डाएट्स' करू शकतो. जास्त दिवस, बराच काळ किंवा कायमस्वरूपी अशी डाएट अगदीच चुकीची असते. त्याचं कारण म्हणजे त्यात वैविध्य नसल्यानं अनेक जीवनसत्वे आणि क्षार न मिळण्याची खात्री, त्यातून आज ना उद्या उद्भवणारे विविध आजार आणि पोषक तत्वांची कमतरता. मोनो डाएट्सनी वजन जसं पटकन कमी होतं, तसंच ते पटकन वाढूनही जातं. त्यामुळे हळू-हळू वजन कमी करणं आणि ते आटोक्यात ठेवणं, हेच योग्य. वजन कमी करणं म्हणजे शरीरातील चरबी कमी करणं. परंतु, 'मोनो डाएट्स'मुळे आपल्या शरीरात चरबीऐवजी स्नायूंची झीज होणं किंवा शरीरातील पाणी कमी होणं, असे नकारात्मक बदल घडतात. त्यामुळे काटा कमी वजन दाखवतो आणि आपल्याला आनंद होतो. माझ्या ओळखीची एक व्यक्ती महिनाभर लाल भोपळ्यावर होती आणि तिचं वजन खूप कमी झालं. पण हाडांचं दुखणं, जे आधी नव्हतं, ते कायमचं मागे लागलं. आपल्याला वजन कमी करायला कुठली किंमत द्यायची आहे, त्याचा विचार करणं आवश्यक आहे.

**कधी-कधी घेता येईल**

आठवड्यातून एकदा किंवा १५ दिवसांतून एकदा, एखादा दिवस मोनो आहार घेतल्यास, उदा. सूप किंवा फळे खाणं, हे आपण मनानंदेखील करू शकतो. यामुळे पोटालाही थोडी विश्रांती मिळेल. परंतु, मधुमेह किंवा इतर व्याधींनी ग्रस्त असणाऱ्यांनी मात्र स्वतःच्या मनानं असं काही बिलकुल करू नये.

त्यातल्या त्यात उत्तम 'मोनो डाएट' म्हणजे 'फ्रुट डाएट'. ज्यांना काही त्रास नाही त्यांनी जर एक दिवस केवळ फळं खाल्ली तर एका दिवसात त्यांचं वजन अर्धा ते एक किलोनं कमी होतं. परंतु, फळे भरपूर खायला हवीत. एक मात्र, लक्षात ठेवायलं हवं की, सतत अशा प्रकारचा आहार घेतल्यानं त्यांची उपयुक्तता (वजन कमी होण्यासाठीची) मात्र, कमी कमी होत जाते. पण पोटाला आराम जरूर मिळतो. केवळ ताजी, नैसर्गिक फळे आहारात असल्यानं त्यांच्या पचनाला इतर काही पदार्थांचा अडथळा राहत नाही आणि त्यातील सर्व पोषकतत्वे शरीराला व्यवस्थित आणि भरपूर पोचतात. अगदी जीवनसत्वांचा, क्षारांचा आणि तंतुमय पदार्थांचा नैसर्गिक 'मेगा डोस'च मिळून जातो.

आपला नेहमीचा आहार संतुलित हवाच, त्याला पर्याय नाहीच.

थोडक्यात...

१. वजन कमी करण्यासाठी योग्य संतुलित आहार आणि व्यायाम हाच खरा उपाय.

२. आपलं नक्की कुठलं वजन कमी होत आहे, चरबी की स्नायू, त्याची नियमित तपासणी करावी.

३. 'मोनो डाएट्स' कधीतरी, बदल म्हणून करणं ठीक. पण तेदेखील तज्ज्ञांना विचारूनच. इंटरनेटवर पाहून किंवा कुणाचं तरी ऐकून मुळीच नको.

४. आठवड्यातून एकदा फलाहार चालेल. ज्यांचा उपवास आहे त्यांनी पिष्टमय आणि तेलकट उपवासाचे पदार्थ खाण्यापेक्षा दिवसभर फळे खावीत.

५. 'मोनोडाएट्स'नं वजन जसं पटकन कमी होतं, तसे ते पटकन वाढतंही.

म्हणूनच झटपट वजन कमी करणाऱ्या जाहिरातींना भुलू नका. ते त्यांचं हित आणि तुमचा खिसा पाहत आहेत.



# डॉ. नरेश अग्रवाल, पुष्पा २+ मधील अँटी -नायलॉनमंजा मोहीम

■ **महासागर प्रतिनिधी,**

**नागपूर, दि. ११ :** देशभरातील सिनेमातील दक्षिण भारतातील पुष्पा + या ब्लॉकबस्टर चित्रपटाच्या प्रेरणा घेऊन, सामाजिक कार्यकर्त्यांने नायलॉन मंजाच्या विरोधात सार्वजनिक जागृत करण्याचा संदेश देण्यासाठी अडीच मिनिटांचा व्हिडिओ 'पुष्पा +' फिल्म बनविला आहे. हा चित्रपट सन्माननीय खासदार आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी याच्यां शुभ हातांनी केले आणि आमदार प्रवीण दाटके यांनी या अँटी -नायलॉन मंजा चित्रपटाचे कौतुक केले. डागा हॉस्पिटलसमोर, इयर -थ्रोट डॉक्टर नरेश अग्रवाल यांनी या पूर्वी लायन्स क्लब दक्षिणेकडील अंग दान मोहिमवर चित्रपट बनवून वाही वाहीला लुटले होते. दरवर्षी, गांधी जयंतीवरील अहिंसा रॅलीमध्ये डॉ.




अग्रवाल जोडपे बापू आणि कस्तुरबा उपस्थित असतात. स्टेजने जखमी झालेल्या प्राण्यांच्या पक्ष्यांना वाचवणे हे त्याचे प्राधान्य आहे.

यावेळी पुष्पा २ + नायलॉन मंजाविरूद्ध संताप, अल्लू अर्जुनची भूमिका बजावून, नायलॉन मंजा यांच्या निषेध आणि कठोरपणाचा संदेश दिला. भागीदार म्हणजे डॉ. अनिशा अग्रवाल, दिनेश अग्रवाल, हीती अग्रवाल.

हा चित्रपट स्व. प्रभाकर राव दाटके स्मृति सेवा संस्था ए. ओ. आई हेड आणि नेक सर्जन विदर्भ आणि समाजसेवक डॉक्टर डॉ. सुभाष राउत यांनी सहकार्य केले. चित्रपटाचे सिनेमॅटोग्राफी चेतन आणि जतन जोशी, साहिल पुसदकर, शुभम तरवतकर यांनी केले आहे.

# ३ पहिल्या ऑरेंज सिटी क्राफ्टफेअर आणि लोकनृत्य महोत्सवाचे रंगतदार उद्घाटन





■ **महासागर प्रतिनिधी,**

**नागपूर, दि. ११ :** साऊथ सेंट्रल झोन कल्चरल सेंटर , नागपूर आयोजित ३१ व्या ऑरेंज सिटी क्राफ्ट फेअर अँड फोक डान्स फेस्टिव्हल चे उद्घाटन आज १० जानेवारी २०२५ रोजी सायंकाळी ७ वाजता मा. केंद्रीय मंत्री श्री नितीन गडकरी यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करून समारोप करण्यात आला . याप्रसंगी डॉ. ... केंद्राच्या नागपूरच्या संचालिका आस्था गोडबोले कार्लेकर व सहाय्यक संचालक (कार्यक्रम) दीपक कुलकर्णी , प्रशासकीय अधिकारी श्री.दीपक पाटील व कार्यक्रम सहाय्यक श्री.गणपतलाल प्रजापती उपस्थित होते . त्यानंतर सन्माननीय पाहुण्यांचे स्वागत केंद्राचे संचालक व सहायक संचालक (कार्यक्रम) यांनी केले . संचालिका मॅडम यांनी कार्यक्रमाचा परिचय करून दिला आणि केंद्राच्या या कार्यक्रमाचा सुवर्ण इतिहास थोडक्यात सांगितला. लोकनृत्य गटांच्या प्रमुखांचे स्वागत श्री. नितीन गडकरी यांच्या हस्ते करण्यात आले . सहाय्यक संचालक (कार्यक्रम) श्री दीपक कुलकर्णी यांचे आभार व्यक्त केले यांनी केले.

महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना मा. केंद्रीय मंत्री श्री नितीन गडकरी जी यांनी ऑरेंज सिटी क्राफ्ट फेअर आणि लोकनृत्य महोत्सवाचे उद्घाटन केले. प्रशंसा करणे , वैशिष्ट्ये हायलाइट करणे . या मेळ्याच्या माध्यमातून हातमाग आणि हस्तकला यांचा प्रचार आणि प्रसार करण्यात येत आहे. तसेच सर्व नागरिकांकडून ऑरेंज सिटी क्राफ्ट फेअर आणि लोकनृत्य महोत्सव . येण्याचे निमंत्रण दिले आणि मेळा यशस्वी होण्यासाठी शुभेच्छा दिल्या . यानंतर आकर्षक लोकनृत्य सादरीकरण झाले. ज्याची सुरुवात गोटीपुआ ( अराता बंधू बारिक आणि समूह , ओरिसा) , काल्बेलिया ( जवाहरनाथ आणि समूह , राजस्थान) , होजागिरी नृत्य ( देबाशिश रेआंग आणि समूह , त्रिपुरा) , मयूर चारकुला (श्री कृष्ण गौर आणि समूह , उत्तर प्रदेश) , भांगडा ( अमरधीर सिंग आणि ग्रुप , पंजाब) आणि मस्करत ( गुणसीलन आणि ग्रुप , पुडुचेरी) यांनी उत्कृष्ट सादरीकरण केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती रेणुका देशकर यांनी केले. माननीय पाहुण्यांनी केंद्राच्या आवारात उभारलेल्या हस्तकला, इतर वस्तू आणि विविध पदार्थांच्या स्टॉलला भेट देऊन सर्व कलात्मक वस्तूंचे कौतुक केले. ३१ वा ऑरेंज सिटी क्राफ्टफेअर १९ जानेवारी २०२५ पर्यंत चालणार आहे. जत्रेत प्रवेश करण्यासाठी प्रति व्यक्ती प्रतिदिन रुपये प्रवेश शुल्क ठेवण्यात आले आहे. यामध्ये दररोज दुपारी २ पासून ' क्राफ्ट फेअर आणि फूड झोन ' आणि सायंकाळी ६.३० वाजल्यापासून सांस्कृतिक सादरीकरण होणार आहे. रसिकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून या कार्यक्रमाचा आनंद लुटण्याचे आवाहन . ... केंद्र, नागपूर . देशपांडे सभागृह आणि आमदार निवास येथे मेळाव्याच्या पार्किंगची सुविधा देण्यात आली आहे .

> व्ही आई केंद्रीय मंत्री श्री नितीन गडकरी उद्घाटन त्यांच्या सौभाग्याने झालेव्ही हस्तकलेच्या स्टॉल्सने केंद्राचा परिसर फुलला
>
> व्ही लोकनृत्याने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले
>
> व्ही १० जानेवारी २०२५ पासून दररोज रंगीत लोकनृत्य सादरीकरण आणि हस्तकला प्रदर्शन

# नंदनवन ग्रंथालयात 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रम सोत्साहात संपन्न



■ **महासागर प्रतिनिधी,**

**नागपूर, दि. ११ :** आजच्या तरूण पिढीला वाचन संस्कृतीकडे आकर्षित करण्यासाठी विविध समाजोपयोगी उपक्रमांमध्ये त्यांचा सहभाग घेऊन व्यक्तिमत्व विकास साधावा असे भावोद्गार जेष्ठ विचारवंत-लेखक लॉ. सुमित सिन्हा यांनी स्थानिक नंदनवन ग्रंथालयात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी आयोजित वाचक-लेखक परिसंवाद कार्यक्रमात बोलतांना काढलेत. अध्यक्षस्थानी डॉ. शांतीदास लुंगे, अध्यक्ष नंदनवन ग्रंथालय हे होते तर विशेष अतिथी म्हणून लॉ. दिनेश दुआ, उपाध्यक्ष, लॉयन्स क्लब नागपूर सेव्हन स्टार हे होते.

उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार, 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा अभिनव उपक्रम नंदनवन सार्वजनिक वाचनालय, नागपूर आणि लॉयन्स क्लब नागपूर सेव्हन स्टार यांच्या संयुक्त समन्वयाने आयोजित करण्यात आला होता.

सदर उपक्रमांतर्गत, सर्वप्रथम ग्रंथालयाची स्वच्छता करण्यात आल्यानंतर, ग्रंथालय वाचक / विद्यार्थांसाठी 'ग्रंथ-प्रदर्शनी' आयोजन करण्यात आले, ज्याचे उद्घाटन माजी नागपूर मनपा विरोधी पक्षनेता तानाजी वनवे व नगरसेविका मालुताई वनवे या उभयतांचे शुभहस्ते करण्यात आले. यासोबतच वाचकांसाठी वाचनकौशल्य कार्यशाळा घेऊन, सामुहिक वाचन कार्य संपन्न करण्यात आले.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी वाचक-लेखक परिसंवाद, कथन स्पर्धा घेण्यात आली. कथन स्पर्धेमध्ये हिमांशु बागडे, संकेत कोथळे, रितेश निरडकर व रिना चौधरी यांनी सहभाग घेतल्याबद्दल त्यांना गुलाबपुष्प-प्रशस्तीपत्र व ग्रंथ भेट देण्यात आली. लेखक लॉ. सुमित सिन्हा यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक परिक्षेच्या पूर्व तयारीबद्दल बहुमोल मार्गदर्शन केले.

या अभिनव उपक्रम कार्ययशस्वितेसाठी नंदनवन वाचनालयाचे नरेश राऊत, सतीश कुकडे, स्मिता उराडे (ग्रंथपाल), सोपान धारगांवे, चंदू सुर्यवंशी, शार्दुल लुंगे, विनोद गाडेकर यांनी तर लॉयन्स क्लब नागपूर सेव्हन स्टारचे लॉ. सीए अजित दामले, लॉ. डॉ. प्रमोद रक्षमवार, लॉ. प्रकाश दातार, लॉ. साधना रक्षमवार, लॉ. दामिनी लुंगे यांनी विशेष परिश्रम घेतलेत. संपूर्ण उपक्रमाला ग्रंथवाचक-विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# नवीन वर्षात पुन्हा एकदा नागनदी प्रदुषण मुक्तीसाठी प्रयत्न

■ **महासागर प्रतिनिधी,**

**नागपूर, दि. ११ :** शहराच्या मध्यभागातून वाहणारी नागनदी प्रदूषणमुक्त करण्यासाठी यात सोडण्यात येणारे सांडपाणी वाहून नेण्यासाठी नदीच्या पात्रालगत बंद जलवाहिनी (पाईपलाईन) टाकण्यात येणार आहे. अतिक्रमण काढण्यात येईल, अशी माहिती महापालिका आयुक्त व प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

केंद्र सरकार पुरस्कृत अमृत२ या योजनेअंतर्गत नागनदी प्रदूर्षणमुक्त करण्याचे प्रस्तावित आहे. या प्रकल्पासाठी सुमारे २१०० कोटी खर्च अपेक्षित आहेत. यामध्ये केंद्र सरकारचा वाटा ५० टक्के, राज्य सरकार आणि महापालिका वाटा प्रत्येकी २५ टक्के राहणार आहे. केंद्र सरकारने यासाठी जापानच्या जयका कंपनीशी करार केला आहे. प्रकल्प सल्लागार नेमण्यात आला असून सल्लागाराकडून सर्वेक्षण सुरू आहे. अहवाल प्राप्त झाल्यावर यादृष्टीने आवश्यक उपाययोजना केल्या जात आहे.

नागनदीला प्रदूषणमुक्त करण्यासाठी यात सोडण्यात येणारे सांडपाणी बंद करावे लागणार आहे. हे पाणी वाहून नेण्यासाठी नदीलगत वेगळी वाहिनी टाकण्यात येणार आहे.



यामाध्यमातून सांडपाणी मलजल शुद्धीकरण केंद्रात (एसटीपी) सोडण्यात येणार आहे. ही बंदनलिका टाकण्यासाठी नदीवरील पक्की घरे किवा इतर कोणत्याही प्रकारची अतिक्रमणे काढण्यात येईल, असे चौधरी यांनी सांगितले.

## कोणालाही विस्तापित केले जाणार नाही

शहरातील नाग, पिवळी व पोहरा नदीला प्रदूषणमुक्त करताना या नद्यांवरील अतिक्रमण काढण्यात येईल. हे काढताना कोणाला विस्थापित केले जाणार नाही. मात्र, प्रकल्पासाठी अडथळा ठरणारे अतिक्रमण काढण्यात येईल, असे महापालिका आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी सांगितले.

## राजकीय हस्तक्षेप खपवून घेणार नाही

रस्त्यावरील अतिक्रमण काढताना राजकीय हस्तक्षेप खपवून घेतला जाणार नाही. शहरातील रस्ते मोकळे करण्यासाठीच ही कारवाई आहे. कारवाई रोखण्यासाठी पुढा-यांनी हस्तक्षेप करने थांबवावे , अशाप्रकारे राजकीय विरोध होत असेल तर संबंधित नेत्यांशी चर्चा करण्यात येईल, असेही डॉ. चौधरी म्हणाले.

# भांडेवाडी येथील विविध घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांची आयुक्तांनी केली पाहणी



■ **महासागर प्रतिनिधी,**

**नागपूर, दि. ११ :** नागपूर महानगरपालिका आयुक्त आणि प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी भांडेवाडी डम्पिंग यार्ड येथे घनकचऱ्यावर प्रक्रिया करणाऱ्या सुसबिडी आणि झिग्मा कंपनीच्या कामाची पाहणी केली. सुसबिडी (सस्टेनेबल बिझनेस डेव्हलपमेंट कंपनी नवीन कचऱ्यावर प्रक्रिया करून आरडीएफ, बायो सीएनजी आणि सेंद्रिय खत तयार करते. तर झिग्मा ग्लोबल एन्व्हायरो सोल्यूशन कंपनी काही मागील वषार्पासून भांडेवाडी येथे साचलेल्या कचऱ्या वर प्रक्रिया करून त्यातून निघणाऱ्या वस्तूंची विल्हेवाट लावत आहे. याप्रसंगी मनपा आयुक्तांसोबत अधीक्षक अभियंता डॉ. श्वेता बॅनर्जी, कार्यकारी अभियंता श्री. राजेश दुफारे उपस्थित होते. पाहणी दरम्यान बायोमायनिंग प्रकल्पाची एजन्सीद्वारे प्रक्रिया केल्यानंतरचे मटेरियल हटविण्यात न आल्याचे आयुक्तांच्या निदर्शनास आले. प्रकल्पामध्ये कार्यरत कर्मचा ?यांना सुरक्षा उपकरणे पुरविणे, त्यांच्या जेवणासाठी स्वतंत्र खोली तयार करणे व सर्व ट्रकला जीपीएस ट्रॅकिंग उपकरण बसविण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. एजन्सीद्वारे सुरू असलेल्या कामावर देखरेख आणि नियंत्रणासाठी ह्यथर्ड पार्टी मॉनिटरींगह्ण करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. याशिवाय ह्यस्काडाह्ण आणि जीपीएस ट्रॅकिंगचे ह्यक्सेसह्ण मनपाकडे तात्काळ घेण्याचे निर्देश मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी दिले.

सुसबिडी द्वारे राबविण्यात येणा-या प्रकल्पाच्या कामाची गती वाढविण्याचे निर्देश आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी दिले. तसेच त्यांनी कंपनीतर्फे लावण्यात आलेल्या मिनी प्लांटची सुद्धा पाहणी केली.

येथे कचऱ्यापासून आरडीएफ आणि बायो सीएनजी तसेच सेंद्रिय खत तयार केले जात आहे. आयुक्तांनी सुसबीडीच्या अधिकाऱ्यांना लवकरात लवकर नवीन प्लांटची स्थापना करण्याचे निर्देशित केले. याप्रसंगी नेहरूनगर झोनचे सहायक आयुक्त विकास रायबोले, उप अभियंता प्रशांत वाघमारे आणि इतर अधिकारी उपस्थित होते.

## अपघात झाल्यास 'इमर्जन्सी क्यू आर कोड'वरून अपघातग्रस्ताची ओळख होणार

### उपचार व मदत मिळण्यास होणार मदत, मोफत सुविधा

**नागपूर:** राज्यात रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर अपघाताचे सत्र सुरू आहे. नवे रस्ते बनवण्याचे काम सुरू असल्यामुळे अथवा चालकाच्या चुकीमुळे अनेकदा मोठे अपघात होत असतात. ११ ते ते १८ जानेवारीपर्यंत यंदा ३५ वा राष्ट्रीय रस्ता सुरक्षा सप्ताह संपूर्ण देशातच मोठ्या उत्साहाने साजरा केला जाणार आहे. यावर्षापासून रस्ते अपघात रोखण्यासाठी 'सेफ्फ वे रोड सेफ्टी सोल्युशन्स इंडिया'द्वारा चार चाकी वाहन, तीन चाकी तथा दुचाकी वाहनांवर 'इमर्जन्सी क्यू आर कोड' लावण्याच्या कामाला सुरुवात होणार आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातून या अभियानाला सुरुवात करण्यात येणार आहे. याचा प्रथम टप्पा नागपुरातून सुरू होणार आहे. रस्त्यावर होणारे अपघातात, अपघातग्रस्त जखमींना तत्काळ मदत मिळावी या हेतूने या क्यूआर कोडची निर्मिती करण्यात आली आहे. अनेकदा रस्त्यांवर अपघात झाल्यास अपघात ग्रस्तांची ओळख नसल्यामुळे त्याला वेळेत मदत मिळण्यास विलंब होतो. एखाद्या व्यक्तीचा अपघातात मृत्यू झाल्यास अथवा गंभीरपणे जखमी झाल्यास या अपघाताची माहिती त्याचा परिवाराला मिळण्यासही किमान पाच ते सहा तासांचा अवधी लागतो. अपघातग्रस्त हा बेशुद्ध अवस्थेत असल्यामुळे त्याच्या परिवाराला माहिती मिळत नाही. अपघात ग्रस्तांची ओळख पटविण्याकरिता पोलिसांनासुद्धा मोठा कालावधी लागतो. त्यामुळे यावर उपाय शोधण्यात आला आहे.

सध्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अपघाग्रस्ताला वेळेत उपचार मिळवून देण्यासाठी महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. प्रत्येकाजवळ भ्रमनध्वनी असतो. परंतु, त्याला पासवर्ड असते. त्यामुळे तो उघडता येत नाही. त्यामुळे यापुढे अपघातग्रस्त गाडीला 'इमर्जन्सी क्यू आर कोड' लावण्यात येणार आहे. यामुळे अपघातग्रस्ताचा भ्रमनध्वनी क्रमांक कळू शकेल. तसेच एखाद्या ठिकाणी अपघात झाल्यास अपघातग्रस्ताच्या कुटुंबीयांना तत्काळ माहिती पोहोचण्याच्या दृष्टिकोनातून 'एसएमएस' सुविधेचा वापर केला जाणार आहे. याशिवाय या 'क्यू आर कोड'मध्ये तात्काळ रुग्णवाहीका सेवा मिळणार आहे. यासाठी रुग्णवाहिका सेवा १०८ तथा पोलीस सेवेसाठी ११२ सारख्या महत्त्वाच्या बटन्स निर्मित केल्या आहेत. तसेच अनेकदा बरेच प्रमाणावर गाड्यांचा पार्किंगचा मोठा विषय सार्वजनिक ठिकाणी उपस्थित होतो. वाहन शिस्तबद्ध पद्धतीने राहत नाही. यावरसुद्धा आळा घालण्यासाठी या क्यू आर कोडमध्ये 'नो पार्किंग'ची माहिती देणाऱ्या बटन जोडण्यात आली आहे. हा क्यूआर कोड कुठल्याही अँड्रॉइड मोबाईलमधून सहजपणे स्कॅन केला जाऊ शकतो. ज्याला कोणलाही पैसे देण्याची गरज पडणार नाही. त्यामुळे प्रत्येकाने गाडीवर हा 'इमर्जन्सी क्यू आर कोड' लावणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## आंतरराष्ट्रीय स्तरावर रोजगाराच्या संधी

### इच्छुकांनी संपर्क साधण्याचे आवाहन

**नागपूर:** मित्र या संस्थेच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय स्तरावर रोजगाराच्या संधी उपलब्ध असून जिल्हयातील जास्तीत जास्त रोजगार इच्छुक उमेदवारांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त सुनंदा बजाज यांनी केले आहे. इस्राईलमध्ये ५ हजार होम बेस्ड हेल्थ गिव्हर वर्कर्सची आवश्यकता आहे. त्याकरीता २५ ते ४५ वर्षे वयोगटातील उमेदवारांची शैक्षणिक पात्रता एएनएम, जीएनएम व बीएससी नर्सिंग असावी. त्यामध्ये ९० टक्के महिलांसाठी आणि १० टक्के पुरूषांसाठी रोजगाराची संधी उपलब्ध आहे.

पात्रताधारक व नोकरी इच्छुक उमेदवारांनी अर्ज करावा. अधिक माहितीसाठी +९१ २२३५५ ४३०९९ या क्रमांकावर किंवा जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, मार्गदर्शन केंद्र, नवीन प्रशासकीय इमारत क्र. २, दुसरा माळा (विंग-ए),सिव्हिल लाईन्स, नागपूर - ४४०००१ येथे संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## स्वाधार योजनेचे अर्ज करण्यास १५ जानेवारीपर्यंत मुदतवाढ

**नागपूर :** शासनाने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सुरू केली आहे. या योजनेसाठी सन २०२४-२५मधील अर्ज करण्यास मुदतवाढ देण्यात आली असून आता विद्यार्थ्यांना १५ जानेवारीपर्यंत या पोर्टलवर ऑनलाईन अर्ज सादर करता येणार आहेत. अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवगार्तील ज्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळालेला नाही अशा विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिक्षण घेता यावे म्हणून भोजन, निवास, शैक्षणिक साहित्य, निर्वाह भत्ता आदी आवश्यक सुविधा विद्यार्थ्यांना स्वत: उपलब्ध करुन घेण्यासाठी आवश्यक ती रक्कम संबंधित विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट उपलब्ध करुन देण्यात येते. अधिक माहितीसाठी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयाकडे संपर्क साधावा व पात्र विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज सादर करुन या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन समाज कल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे यांनी केले आहे.

## आदिवासी विकासाच्या योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे करा

### राज्य जाती-जमातीआयोगाचे उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम

**नागपूर:** आदिवासी समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी अनेक योजना आहेत. त्या योजनांची अंमलबजावणी संबंधित यंत्रणांनी प्रभावीपणे करावी, असे आवाहन महाराष्ट्र राज्य जाती-जमातीआयोगाचे उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांनी केले. आदिवासी उपयोजनेंतर्गत राबविण्यात येणा ?या विविध विभागाच्या योजनांचा आढावा रविभवन येथील सभागृहात घेण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी आदिवासी प्रकल्प अधिकारी नितीन इसोकार, नियोजन अधिकारी, क्रीडा अधिकारी पल्लवी धात्रक, जलसंधारण अधिकारी बी.व्ही. सयाम तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते. आदिवासी उपयोजनेंतर्गत विविध विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा त्यांनी आढावा घेतला असून वर्षनिहाय निधी कालमयार्देत खर्च करा व आदिवासी समाजाच्या विकासाच्या योजनेला गती द्या, असे ते म्हणाले. यावेळी कृषी विभागांतर्गत बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना, प्लास्टीक अस्तरीकरण योजना, पशुसंवर्धन विभागाच्या दुधाळ जनावरे गट वाटप योजना, शेळी मेंढी गट वाटप योजना, जनावरांना औषध वाटप योजना, मत्स्य व्यवसाय, वने, क्रीडा व युवक कल्याण, लघुपाटबंधारे, तंत्र शिक्षण, ग्रामीण पाणी पुरवठा, मृद संधारण विभागाच्या योजनांचा आढावा घेण्यातआला.

## अकोला ते शेगाव पायदळ वारी

**नागपूर:** मनिषनगर परिसरातील संत गजानन महाराज भक्तमंडळ स्वयंस्फूतीर्ने एकत्रित येऊन मागील तीन वर्षांपासून अकोला ते शेगाव पायी वारी करतात.श्रीरामाच्या प्रतिष्ठापनेला तिथीप्रमाणे जानेवारीला एक वर्ष पूर्ण होत आहे यांचेच औचित्य साधून जानेवारीला पहाटे वाजता अकोला येथील अनोखा हनुमान मंदिरातील हनुमान मूतीर्चे सुरेशचंद्र चकोले यांच्या हस्ते पुष्पहाराने पूजन व आरती करुन सर्वांनी हनुमंताचे दर्शन घेऊन श्रींच्या दर्शनाकरीता नागझरी मार्ग शेगावच्या वाटेने गण गण गणात बोते मंत्राचा जप करीत वारी सुरू झाली. पायीवारीमध्ये लहान मुले व जेष्ठ नागरिक सुध्दा सहभागी झालेत या वारीचा आंनद काही वेगळाच असतो. माऊली संत गजानन महाराज की जय,भारतमाता की जय अशा घोषणा देत शेगावच्या वाटेनी दिवसभर चालून सायंकाळी श्रीक्षेत्र शेगांव संस्थान मध्ये पोहोचून संत गजानन महाराज यांच्या समाधीचे दर्शन व प्रसाद घेऊन पायदळ वारीचे समारोप होईल?. वारीचे नियोजन श्रीकांत इरुटकर हे दर वर्षी करीत असतात.वारीमध्ये सर्वश्री-सुरेशचंद्रचकोले,श्रीकांत इरुटकर,विनोद निखाडे,आशा चकोले,पुष्पा हटवार,गजानन चकोले,किरण चाफले,रंजना चकोले,प्रज्ञा निखाडे,स्वप्निल चकोले,स्नेहा चकोले,तेजप्रताप चाफले,कर्मण्य चकोले ह्या भक्त मंडळीने वारीमध्ये सहभाग घेतला.

# झी टीव्हीचे कलाकार लोहरीसाठीच्या त्यांच्या आवडत्या आठवणी आणि योजना शेअर करतआहेत!

**मुंबई, ११ जानेवारी :** भारत हा अनेक परंपरा आणि संस्कृतींचा समावेश असलेल्या समृद्ध विविधतेसाठी ओळखला जाणारा देश आहे. विशेषतः उत्तर आणि पश्चिम भागात लोहरी हा मोठ्या प्रमाणावर साजरा केला जाणारा सण आहे. लोहरी हा एकसांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाचा आणि आनंदाचा सण आहे जो प्रामुख्याने भारताच्या उत्तरेकडील प्रदेशांमध्ये, विशेषतः पंजाबमध्ये साजरा केला जातो. पंजाबमध्ये, याला लोहरी म्हणतात आणि पवित्र शेकोटीभोवती हासाजराकेलाजातो. लोक उत्तमपिकासाठी कृतज्ञता व्यक्त करतात आणि येत्या वर्षात समृद्धीसाठी आशीर्वाद घेतात. हा लोकप्रिय पंजाबी लोक उत्सव बहुतेक वेळा हिवाळ्यातील संक्रांतीशी जोडलाजातो. जमाई नं. १ मधील सिमरन कौर, जागृति–एक नई सुबहमधील आर्य बब्बर, भाग्य लक्ष्मी मधील रोहित सुचांति, जाने अनजाने हम मिले मधील आयुषी खुराना, कैसे मुझे तुम मिल गए मधील अर्जित तनेजा आणि वसुधा मधील प्रिया ठाकूरहे या शुभ सोहळ्याचे महत्त्व आणि उत्सव याबद्दल आपले मतसांगतआहेत.

झी टीव्हीच्या जमाई नं.१ मध्ये रिद्धीची भूमिका साकारणारी सिमरन कौर म्हणाली, लोहरी हा माझ्यासाठी नेहमीच एक खास सण राहिला आहे, हिवाळ्यात तो उबदार मिठीसारखा वाटतो! मला आठवतं की लहानपणी मी माझ्या कुटुंबासोबत आगीभोवती जमत असे, पारंपारिक गाणी गात असे आणि पॉपकॉर्न आणि शेंगदाणे आगीत टाकत असे. त्या क्षणांचा आनंद आजही माझ्या हृदयात आहे. आजही मी त्याच उत्साहात, माझ्या प्रियजनांसोबत, त्या उबेचा आनंद घेत, मस्ती करत लोहरी साजरी करते. या काळात खायला माझा आवडता पदार्थ गजक आहे, त्याचा गोडवा हा सणाचा एक भाग वाटतो. लोहरी म्हणजे केवळ परंपरा नाही; तर हेएकत्र येणेआणिकृतज्ञता आणि सुंदर आठवणी निर्माण करण्याबद्दल आहे. मी सर्वांना प्रेम, प्रकाश आणि आनंदाने भरलेल्या लोहरीच्या खूप खूप शुभेच्छा देते!

झी टीव्हीवरील भाग्य लक्ष्मीमध्ये ऋषीची भूमिका साकारणारा रोहित सुचांति म्हणाला, लोहरीला माझ्या हृदयात एक विशेष स्थान आहे आणि दरवर्षी ती माझ्या बालपणीच्या सुंदर आठवणींना उजाळा देते तीशेकोटीआणि तीळगुळाचा वास. लहानपणी, सगळे एकत्र येऊन आनंद साजरा करायचे, आगीभोवती नाचायचे, मिठाई वाटायचे आणि लोकगीते गायचे. या वर्षीनवीन सुरुवातीच्या शुभेच्छा देऊन आणि आपल्या सांस्कृतिक वारशाचा आनंद घेतलोहरी पेटवूनमी माझ्या कुटुंबासह या परंपरा पुढे नेण्याची योजना आखत आहे. तुम्ही घरी प्रियजनांसोबत असाल किंवा मित्रांसोबत बाहेर असाल, गजक आणि तीळाच्या लाडूच्या अस्सल चवीचा आस्वाद घ्यायला विसरू नका आणि अर्थातच, ढोलाच्या तालावर भांगडाही करा. भूतकाळ विसरून भविष्याला आशेने स्वीकारण्याचा लोहरी हा सण आहे आणि यावर्षीचा कापणीचा हंगाम आणि प्रियजनांसोबत आनंद साजरा करण्यासाठी मी उत्सुक आहे.

झी टीव्हीवरील 'जागृति– एक नई सुबह' या मालिकेत कालिकांत ठाकूरची भूमिका साकारणारा आर्य बब्बर म्हणाला, भारताच्या अनेक भागात लोहरी साजरी केली जाते, परंतु पंजाबमध्ये या सणाचा अनुभव खरोखरच अनोखा आहे. एक पंजाबी असल्याने, मी हे सांगू शकतो की या काळातील उत्साही उर्जेची तुलना कशाशीही होऊ शकत नाही. यावेळेस घरे सुंदरपणे सजवलेली असतात, कुटुंबे शेकोटीभोवती एकत्र येतात आणि एकमेकांना शुभेच्छा देतात आणि सर्वत्र आनंदाचे वातावरण असते. या वर्षी, मी माझ्या मित्रांसोबत आणि कुटुंबियांसोबत लोहरी पेटवण्यासाठी आणि पारंपारिक लोकनृत्यांमध्ये भाग घेण्यासाठी एक भव्य उत्सव साजरा करण्याची योजना आखत आहे. त्या सर्वांसोबत गप्पा मारायला,घरी बनवलेल्या जेवणावर ताव मारायला, लाडू खाण्याचा आनंद घ्यायला आणि कायम माझ्यासोबत राहतील अशा नवीन आठवणी निर्माण करण्यास उत्सुक आहे. मी सर्वांना लोहरीच्या खूप खूप शुभेच्छा देतो.

झीटीव्हीवरील 'जाने अनजाने हम मिले' या मालिकेत रीतची भूमिका साकारणारी आयुषी खुराणा म्हणाली, ही लोहरी माझ्यासाठी थोडी खास आहे कारण लग्नानंतरची ही माझी पहिली लोहरी आहे. आपल्या नवीन कुटुंबासोबत ती साजरा करण्याचा उत्साह म्हणजे उबदारपणा आणि प्रेमाने भरलेल्या एका सुंदर अध्यायाची सुरुवात करण्यासारखे वाटत आहे. मला आठवतंय की मी लहानपणी माझ्या चुलत भावंसोबत लोहरीच्या गाण्यांवर नाचत असे आणि आता, माझ्या पती आणि कुटुंबासोबत तोच आनंद शेअर करताना खूप छान वाटत आहे. या सणाचा माझा आवडता भाग म्हणजे माझ्या आईने बनवलेले तीळाचे लाडू आणि गुळाचे गजक खाणे. माझा असा विश्वास आहे की लोहरी म्हणजे प्रेम, एकता आणि नवीन सुरुवात, आणि माझ्या प्रियजनांसोबत तो साजरा करण्यास मी खरोखरच भाग्यवान आहे. सर्वांना प्रकाश, आनंद आणि अनंत आशीर्वादांनी भरलेल्या लोहरीच्या शुभेच्छा!

झी टीव्हीवरील 'कैसे मुझे तुम मिल गये' या मालिकेत विराटची भूमिका साकारणारा अर्जित तनेजा म्हणाला, लोहरी हा नेहमीच माझ्या आवडत्या सणांपैकी एक राहिला आहे. दिल्लीत लहानाचा मोठा झाल्यामुळे हा उत्सव म्हणजे जादू होतीशेकोटी आणि ढोलाच्या लयबद्ध तालापासून ते प्रियजनांनी वेढलेल्या आनंदापर्यंत. लहानपणी मी उत्साहाने घरोघरी जाऊन तीळ आणि गुळाची रेवडी गोळा करायचो – त्या आठवणी माझ्यासाठी खूप खास आहेत! पणमला सर्वात जास्त आठवण येतेती म्हणजे माझ्या आईच्या घरी बनवलेल्या मक्के की रोटी आणि सरसों का साग यांची – तिच्या स्वयंपाकाची जादू कोणीही पुन्हा निर्माण करू शकत नाही आणि ते खाण्याची इच्छामला दररोज होते. या वर्षी, मी 'कैसे मुझे तुम मिल गये' च्या शूटिंगमध्ये व्यस्त असल्याने, मी दिल्लीतील माझ्या कुटुंबाला भेटू शकणार नाही आणि सणाचा आनंद नक्कीच मिस करेन. तुम्हा सर्वांची लोहरी प्रेम, ऊबदारपणा आणि आनंदाने भरलेली असावी. तुम्हा सर्वांना लोहरीच्या शुभेच्छा!

झी टीव्हीवरील 'वसुधा' या मालिकेत वसुधाची भूमिका साकारणारी प्रिया ठाकूर म्हणाली, पंजाब आणि चंदीगडमध्ये राहिल्यामुळे, लोहरीचे माझ्या हृदयात एक विशेष स्थान आहे. हा सण केवळ परंपरांबद्दल नाही तर तो एकता, उबदारपणा आणि उत्सवाचे प्रतीक आहे. आम्ही मक्की की रोटी, सरसों का साग आणि रेवडी आणि गजक सारख्या गोड मिष्टान्नांचा आस्वाद घेत उत्साही शेकोट्या, ढोल–ताशांचा ताल आणि मित्रमंडळी आणि कुटुंबियांसोबत साजरा केलेल्या उत्सवांच्या माझ्या अजूनही आठवणी आहेत. लोहरी नेहमीच कृतज्ञता आणि सकारात्मकतेची भावना घेऊन येते, हिवाळ्याचा शेवट आणि नवीन सुरुवातीचे स्वागत करते. या वर्षी, मी माझ्या 'वसुधा' शोसाठी मुंबईत असतानापारंपारिक पद्धतीने लोहरीचा सण साजरा करणे मिस करेन, परंतु उत्सवाची भावना नेहमीच माझ्यासोबत राहील. हा सुंदर सण साजरा करणाऱ्या सर्वांना, मी प्रेम, हास्य आणि आनंदाने भरलेल्या लोहरीच्या शुभेच्छा देतो. लोहरीच्या शुभेच्छा!



## लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याकडून वेदांत समूहाचे अध्यक्ष अनिल अगरवाल यांच्या कला आणि संस्कृतीला प्रोत्साहन देणाऱ्या दृष्टिकोनाची प्रशंसा



### लंडनस्थित अनिल अगरवाल रिव्हरसाइड स्टुडिओ ट्रस्टला लोकसभा अध्यक्षांची भेट

**नवी दिल्ली, ११ जानेवारी :** माननीय लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी १०० वर्षे जुन्या रिव्हरसाइड स्टुडिओ ट्रस्टला आंतरराष्ट्रीय स्तरावरील कला आणि संस्कृतीला प्रोत्साहन देणारे सर्वोत्तम केंद्र बनवण्याच्या वेदांत समूहाचे अध्यक्ष अनिल अगरवाल यांच्या दृष्टिकोनाचे कौतुक केले आहे. टेम्स नदीच्या उत्तरेकडील काठावर स्थित या सुप्रसिद्ध जागतिक कला केंद्रात बोलताना बिर्ला म्हणाले की, हा स्टुडिओ जगभरातील कलाकार आणि सादरकर्त्यांसाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ उपलब्ध करून देईल. सगळ्या खंडांना कला, संस्कृती आणि नाविन्यपूर्णता यांनी जोडणाऱ्या महत्त्वपूर्ण उपक्रमांतर्गत वेदांत समूहाचे संस्थापक आणि अध्यक्ष अनिल अगरवाल आता या नामांकित रिव्हरसाइड स्टुडिओचे सर्वेसर्वा असणार आहेत.

अशा प्रतिष्ठित व्यासपीठावर कला आणि संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी केलेल्या प्रयत्नांबद्दल अनिल अगरवाल यांचे मी आभार मानतो. जगभरातील कलाकारांना येथे लंडनमध्ये त्यांच्या भागातील संस्कृती आणि कलाकृती प्रदर्शित करण्याची संधी मिळेल, असे बिर्ला यांनी आपल्या भाषणात सांगितले. रिव्हरसाइड स्टुडिओ ट्रस्ट हे अशा कलाकारांना आपली कला सादर करण्यासाठी जागतिक मंच बनेल.

बिर्ला यांनी कला, संस्कृती आणि नाविन्यपूर्णतेचा अखंड समावेश असलेल्या आणि विविध संस्कृतींच्या आदान–प्रदानाचे प्रतीक म्हणून रिव्हरसाइड स्टुडिओचे कौतुक केले.

आपले मनोगत व्यक्त करताना वेदांत समूहाचे अध्यक्ष अनिल अगरवाल म्हणाले, रिव्हरसाइड स्टुडिओज येथे माननीय श्री. ओम बिर्ला यांचे स्वागत करणे हा आमच्यासाठी सन्मान होता. त्यांचा दृष्टीकोन आणि नेतृत्व आम्हाला केवळ आर्थिक सहयोगातून नव्हे तर सांस्कृतिक वारसा जपत आणि साजरा करत भारत आणि युनायटेड किंगडम यांच्यातील संबंध अधिक दृढ करण्यासाठी प्रेरित करते.

माननीय लोकसभा अध्यक्षांनी शिक्षण, महिला सक्षमीकरण आणि अंगणवाड्यांना नंदघरांमध्ये रूपांतरित करून मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी वेदांत समूह करत असलेल्या अग्रणी प्रयत्नांचेही कौतुक केले. नंदघर मुलांना विनामूल्य शिक्षण आणि पोषक आहार देतात. समाजातील वंचित घटकांच्या उन्नतीसाठी अशा उपाययोजना महत्त्वाच्या आहेत, असे त्यांनी नमूद केले.

रिव्हरसाइड स्टुडिओच्या या सुप्रसिद्ध वास्तूच्या गाईडेड टूरने या भेटीचा समारोप झाला. ओम बिर्ला यांनी कला आणि संस्कृतीला प्रोत्साहन देण्याच्या या स्थळाच्या समृद्ध वारशाचे कौतुक केले. सांस्कृतिक पातळीवरून राजनैतिक संबंध सुधारणे आणि लोकांमधील भावसंबंध अधिक दृढ करणे यात अशी सांस्कृतिक स्थळे खूप महत्वाची भूमिका बजावू शकतात या अनुषंगानेही यावेळी चर्चा झाली.

अनिल अगरवाल रिव्हरसाइड स्टुडिओला ओम बिर्ला यांनी दिलेली भेट ही भारत आणि युनायटेड किंगडममधील बळकट आणि विकसित होत असलेल्या संबंधांचे प्रतीक आहे. ही भेट दोन्ही राष्ट्रांच्या सांस्कृतिक पूल तयार करण्याच्या सामायिक दृष्टिकोनाला अधोरेखित करत परस्पर समृद्धतेच्या भविष्याची पायाभरणी करते.

## सानंद वर्मा यांनी १५० महिला पात्रं साकारण्याबाबत सांगितले मत!

**मुंबई, ११ जानेवारी :** एण्ड टीव्हीवरील लोकप्रिय विनोदी मालिका भाबीजी घर पर है' विनोदी एपिसोड्स आणि प्रतिभावान सानंद वर्मा साकारत असलेली भूमिका विलक्षण व अनपेक्षित अनोखे लाल सक्सेनासह आयकॉनिक पात्रांच्या माध्यमातून प्रेक्षकांचे मनोरंजन करत आहे. सर्वोत्तम विनोदी शैली आणि अद्वितीय आव्हानांना स्वीकारण्याची क्षमता असलेले सानंद यांनी मालिकेमध्ये १५० हून अधिक महिला पात्रं साकारत कॉमेडीमध्ये एक उल्लेखनीय टप्पा स्थापित केला आहे. त्यांच्या प्रवासामधील सर्वात उल्लेखनीय यश स्पेशल एपिसोड होता, ज्यामध्ये त्यांनी एकामागोमाग एक चार विशिष्ट महिलांचा पेहराव केला होता. या असाधारण यशाबाबत मत व्यक्त करत सानंद वर्मा ऊर्फ अनोखे लाल सक्सेना म्हणाले, मालिका भाबीजी घर पर है'चा भाग असणे माझ्यासाठी मोठ्या आशीर्वादासारखे आहे. या मालिकेने मला नेहमी अभिनेता म्हणून नवीन आकारमानांचा शोध घेण्यास प्रेरित केले आहे. १५० हून अधिक महिला पात्र साकारण्याचा अनुभव रोमांचक राहिला आहे. मला चार विभिन्न महिला पात्रांची भूमिका साकारण्याची गरज असलेल्या कथानकाबाबत सांगण्यात आले तेव्हा मी उत्साहित होण्यासह काहीसा नर्व्हस देखील झालो होतो. आकर्षक दिसण्यासोबत प्रत्येक पात्रामध्ये अद्वितीय विलक्षणता आणण्याची मोठी जबाबदारी असते, जेथे या भूमिका एकमेकांमध्ये गुंतून न जाण्याची खात्री घ्यावी लागते.'' महिला पात्र साकारण्याच्या आव्हानाबाबत सांगताना सानंद म्हणाले, महिलांचा पेहराव करणे हे कॉस्च्यूम घालणे किंवा मेकअप करण्याइतपत सोपे नाही. त्यामधील बारकावे, तसेच देहबोली व अभिव्यक्ती, तसेच आवाजातील चढ–उतार आणि वर्तणूक समजून घेणे व सादर करणे महत्त्वाचे आहे. साडी किंवा डेसेस परिधान करून हिल्समध्ये चालणे आणि सहजपपणे व आत्मविश्वासाने संवाद सादर करणे सोपे नसते. यासाठी मोठ्या संयमाची गरज असते, विशेषत: दीर्घकाळापर्यंत शूटिंग करताना अवधान केंद्रित ठेवावे लागते. कधी–कधी, मेकअपसाठी खूप वेळ लागू शकतो आणि त्यानंतर ऊर्जा व विनोदाचा स्तर कायम राखण्याची खरी परीक्षा असते.''

स्पेशल एपिसोडला उजाळा देत सानंद म्हणाले, मी साकारलेल्या चार भूमिकांमध्ये प्रत्येक भूमिकेचे व्यक्तिमत्त्व व स्टाइल विशिष्ट होती, ज्यामुळे संपूर्ण प्रक्रिया अधिक आव्हानात्मक व उत्साहवर्धक झाली. पारंपारिक भारतीय गृहिणीपासून आधुनिक दिवापर्यंत प्रत्येक भूमिकेचे पैलू वेगळे होते. माझे सह–कलाकार व टीमची प्रतिक्रिया धमाल होती. मला भूमिकांमध्ये बदल करताना पाहताना त्यांना हसू आवरता आले नाही. यासारखे क्षण अथक मेहनतीचे फळ मिळाल्याची भावना देतात. कॉमेडी आव्हानात्मक शैली आहे, पण तितकीच लाभदायी देखील आहे. प्रेक्षकांच्या चेहऱ्यांवर हास्य आणणे माझ्यासाठी मोठी प्रेरणा आहे. मी वैविध्यतेच्या कलेमध्ये निपुण असलेल्या दिग्गज कॉमेडीयन्सकडून प्रेरणा घेतो. माझ्या भूमिकांमध्ये वास्तविकता राखण्यासाठी मी आसपासच्या लोकांचे निरीक्षण करतो, त्यांची विलक्षणता जाणून घेतो आणि माझ्या परफॉर्मन्समध्ये त्यांचा समावेश करण्याचा प्रयत्न करतो.

## सोनी सबवरील वागले की दुनिया मालिकेत मनोज आणि विद्याच्या जुळ्या मुलांना वाचवण्यासाठी राजेशचे खतरनाक धाडस

**मुंबई, ११ जानेवारी :** सोनी सबवरील वागले की दुनिया: नई पीढी नए किस्से मालिकेत वागले या मध्यमवर्गीय कुटुंबाचा दैनंदिन संघर्ष आणि त्यांचे यशापयश यांचे चित्रण असते. अलीकडच्या भागांमध्ये वंदना (परिवा प्रणती)च्या भाचीच्या लग्नात एक मोठे विघ्न येते, जेव्हा त्यांनी लग्नासाठी भाड्याने ठेवलेली जागा आयत्या वेळी रद्द करण्यात येते. त्यांना मदत करण्यासाठी राजेश (सुमित राघवन) त्यांना लग्नासाठी साई दर्शन सोसायटीचा कम्युनिटी हॉल देऊ करतो. पण प्रकरण आणखी गुंतागुंतीचे होते, जेव्हा त्याच दिवशी सोसायटीतील एक अन्य सदस्य त्याच जागी एक प्रार्थना सभा योजतो. या गोंधळाच्या स्थितीत राजेश सर्वांना शांत करून सांगतो की, हे दोन्ही प्रसंग येथे सुरळीतपणे होऊ शकतात. प्रार्थना सभा लॉनवर आणि लग्न हॉलमध्ये करता येईल.

आगामी भागांमध्ये, एक धक्कादायक ट्विस्टमुळे वागले कुटुंब हादरून जाते. विद्या (सुकन्या सुर्वे) आणि मनोज (विपुल देशपांडे) यांच्या जुळ्या मुलांचे अपहरण होते. मुलांचा शोध घेता घेता घरचे लोक CCTV फुटेज तपासतात. ज्यात त्यांना दिसते की मुन्नी नावाच्या स्त्रीने त्यांचे अपहरण केले आहे. राजेश वागले प्रकरण आपल्या हाती घेतो. पोलिसांची मदत घेऊन आणि स्वतः इन्स्पेक्टरचा वेश घेऊन तो मुलांना वाचवण्यासाठी मुन्नीच्या अड्ड्यावर जातो. हे कथानक प्रेक्षकांची उत्कंठा वाढवणारे आहे. राजेश आपल्या हुशारीने मुलांना वाचवून घरी घेऊन येईल का? अशी उत्कंठा प्रेक्षकांना वाटत राहील.

राजेश वागलेची भूमिका करणारा सुमित राघवन म्हणतो, राजेश पोलीस इंस्पेक्टरचा वेश धरण करतो, हा एक अनपेक्षित आणि आकर्षक ट्विस्ट होता. त्याच वेळी तो एक भावनिक क्षण देखील होता कारण राजेशच्या मनात एका पित्याला वाटणारी काळजी दाटून येते. स्वतः एक पिता असल्यामुळे राजेश आपल्या भावाची व्यथा समजू शकतो. आणि त्याच्या मुलांना वाचवण्यासाठी तो काहीही करण्यास सज्ज होतो. आपल्या लोकांसाठी आपण काहीही करण्यास तत्पर असतो हे दाखवणारी ही कथा आहे. आणि मला आशा आहे की आम्ही जी तीव्रता आणि भावना यात दाखवल्या आहेत, त्या प्रेक्षकांच्या हृदयाला भिडतील.



## सोनी सबवरील तेनाली रामा मालिकेत राजा कृष्णदेवरायाची खात्री झाली आहे की तेनाली पुन्हा विजयनगरात परतला आहे

**मुंबई, ११ जानेवारी :** सोनी सबवरील तेनाली रामा मालिकेत तेनाली रामा या महान प्रज्ञावंताच्या गोष्टी सांगितल्या जातात. मालिकेत सध्या तेनाली (कृष्ण भारद्वाज) पुन्हा विजयनगर साम्राज्यात परतला आहे. राज्यावर आलेल्या संकटाचा सामना करून आपल्या हुशारीने साम्राज्याचे संरक्षण करण्याचे आव्हान त्याच्या पुढे आहे. अलीकडच्या भागांमध्ये तेनाली रामाचे भूत आपण पाहिले असा समज होऊन तथाचार्य (पंकज बेरी) हादरले आहेत, कारण तेनालीच्या मृत्यूची वार्ता सगळीकडे आधीच पसरलेली असते. दरम्यान, तेनाली आपल्या नावाला लागलेला कलंक धुवून काढण्यासाठी आणि आपले निरपराधित्व राजासमोर सिद्ध करण्यासाठी एक युक्ती करतो.

आगामी भागांमध्ये, तथाचार्य एका वृद्ध स्त्रीच्या जुन्या प्रकरणाचा छडा कसा लावावा या विवंचनेत आहेत. राजा कृष्णदेवरायाने (आदित्य रेडिज) त्यांना हे प्रकरण सोडवण्यासाठी २४ तासांची मुदत दिली आहे. त्याच वेळी तेनाली आपल्याला विजयनगरातून हद्दपार करण्यामागचे सत्य शोधण्यासाठी शक्कल लढवत आहे. त्यावेळी त्याला तथाचार्य निरपराध असल्याचे आश्चर्यकारक सत्य समजते. तथाचार्यांना गुप्तपणे त्यांच्या प्रकरणात मदत करत असताना त्याच्या अनोख्या पद्धतींमुळे राजाला त्याच्या अस्तित्वाचा सुगावा लागतो. यानंतर एक अनपेक्षित वळण येते. तेनाली जिवंत आहे का आणि तो तथाचार्यांच्या घरी आहे का याचा माग काढण्याचा निर्धार करून राजा कृष्णदेवराय तथाचार्यांच्या घरी येतो आणि प्रकरणाचा छडा लावल्याबद्दल त्यांना बक्षीस देतो.

विजयनगर साम्राज्यात तेनालीच्या आगमनाचे सत्य राजा कृष्णदेवरायाला समजेल का? आणि तेनाली अखेरीस आपले निरपराधित्व सिद्ध करून पुन्हा दरबारातील आपले स्थान परत मिळवू शकेल का?

राजा कृष्णदेवरायाची भूमिका करणारा अभिनेता आदित्य रेडिज म्हणतो, तेनाली विजयनगरात परत आला आहे का याचा छडा लावण्याचा कृष्णदेवरायाने निर्णय घेतला आहे. तेनालीच्या मृत्यूची बातमी साम्राज्यात पसरलेली असली, तरी राजाला ही खात्री असते की त्या म्हाताऱ्या बाईचे प्रकरण केवळ तेनालीच सोडवू शकतो. याचाच अर्थ तो जिवंत असला पाहिजे. राजा जेव्हा तेनालीच्या गायब होण्यामागचे गूढ उलगडण्यासाठी चंग बांधतो, तो एक थरारक क्षण आहे. हे दृश्य प्रेक्षकांना थरारक अनुभव देईल कारण तेनाली आणि राज्य कृष्णदेवराय यांच्यात मजेदार पाठलाग त्यांना बघायला मिळेल.

## राशीभविष्य

**मेष :** तुमच्या योजनांवर लक्ष केंद्रित करा. जर तुमचा काही खटला चालू असेल तर एखाद्या अनुभवी व्यक्तीचा सल्ला घ्या. तुमच्या प्रगतीचे मार्ग खुले होतील.

**वृषभ :** आजचा दिवस तुमच्यासाठी चांगलाही आणि वाईटही असेल. तुम्हाला कामाच्या निमित्ताने लांबचा प्रवास करावा लागेल. अनोळखी लोकांच्या बोलण्यावर विश्वास ठेवू नका.

**मिथुन :** आजचा दिवस तुमच्यासाठी थोडा उलटसुलट जाऊ शकतो. तुमच्या प्रियकरासोबत चांगला वेळ घालवाल. नवीन काम सुरू करण्याचा विचार करणा–यांना चिंता वाटू शकते.

**कर्क :** व्यवसाय करणा–या लोकांनी आपल्या कामावर पूर्ण लक्ष केंद्रित करावे. तुम्ही शेअर बाजारात गुंतवणूक करणा–यांनी सावधगिरी बाळगा. इतरांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करा.

**सिंह :** जर तुम्ही पूर्वी कर्ज काढले असेल तर त्याची आज परतफेड कराल. आज तुमच्या मनात नकारात्मक विचार आणू नका. तुम्हाला कामकाजाच्या क्षेत्रात मान–सन्मान मिळेल.

**कन्या :** कमाई वाढल्याने तुम्ही खूप आनंदी असाल. कोर्ट कचेरीची कामे मार्गी लागतील. जमिनीचा तुकडा विकण्याचा विचार कराल. प्रेयसीची नाराजी ओढवून घ्याल.

**तूळ :** आज तुम्हाला धार्मिक गोष्टींत रस असेल आणि तुम्ही खूप धैर्यवान व्हाल. पण, एखाद्या सहका ?यामुळे तुम्हाला थोडा त्रास होऊ शकतो. आज कोणतेही महत्त्वाचे काम इतरांच्या हाती देऊ नका.

**वृश्चिक :** आज घरातील भांडणांपासून कलहातून सुटका होईल. सरकारच्या काही योजनांमध्ये पैसा गुंतवायचा विचार करु शकता. घरात वाद होईल. व्यवसायात काही बदल करावे लागतील.


**धनु :** आजचा दिवस तुमच्यासाठी सुख–सुविधा वाढवणारा असेल. तुमच्या मान–सन्मानात वाढ होईल. ब–याच कालावधीनंतर तुमच्या काही मित्रांची भेट होईल. तुम्हाला वरिष्ठांकडून काही सल्ला मिळू शकतो.

**मकर :** नातेवाईकांसोबतचं नातं अधिक घट्ट होईल. आजचा दिवस तुमच्यासाठी धावपळ करणारा असेल. तुम्हाला जास्त काम करावे लागेल.

**कुंभ :** तुमच्या जोडीदाराबरोबर सुरु असलेले रुसवे–फुगवे दूर होतील. नोकरी शोधणा–यांना आनंदाची बातमी ऐकायला मिळेल. तुम्ही नवीन वाहन खरेदी करू शकता.

**मीन :** तुमच्या कामांमुळे जोडीदाराला कमी वेळ द्याल. त्यामुळे जोडीदार नाराज होईल. आज कुणाकडूनही पैसे उधार घेऊ नका. वाहन खरेदीचा योग आहे. आर्थिक स्थितीबद्दलची चिंता दूर होईल.

## शब्दकोडे क्रमांक २०१३



**आडवे शब्द :–**

१) जुना, प्राचीन
५) धोकादायक
९) वाळवी
११) गरजू नडलेला
१३) जागर, झोपेचे खोबरे
१५) किंमत
१६) दंत
१७) नर्तक (चेष्टेत)
१८) चौकशी, विचारपूस
२०) आश्रय
२२) पुरुष
२४) कॅल्क्युलेटरला मराठी शब्द
२५) एक भटकी जमात
२६) शिकारीचा प्राणी
२७) कुचेष्टा, उनाडपणा
३१) वेळ, मृत्यू
३२) रचलेले कारस्थान
३५) उंटाच्या पाठीवरील उंचवटा, भिस्त
३६) तारणपत्र
३९) चकचकीत
४२) निमग्न, रममाण
४३) मान्य करणे
४४) मार्गक्रमण
४६) हालचाल
४९) गोजी, पाडी,
५१) प्लॅटफॉर्मला मराठी शब्द
५२) बंदी
५३) गुरे राखणारा
५४) मैत्रीण
५५) पशू, श्वापद
५७) वनबाला, एका जुन्या नटीचे नाव
६०) शल्य, मनाला टोचणारी रुखरुख
६१) युद्धासाठी उतावीळ झालेला
६३) कामाची गर्दी
६५) थेट
६७) कप्पा, चोळीचे कापड
६८) मनाने घेतलेली भीती
७०) सोने
७२) भारतभर प्रवास
७४) उत्तराधिकारी
७६) मासे पकडणारी जमात
७७) नग, उंच डोंगर
७८) गोष्ट

**उभे शब्द :–**

२) रंगढंग करण्याचे विलासमंदिर
३) होडी
४) दृष्टी
५) झाडाचे टॉनिक
६) एखादी गोष्ट फुगवून सांगणे
७) साप
८) जे करावयास पाहिजे ते न करता नको ते करणाऱ्या वृत्तीचा
१०) सर्व, एकूणएक
१२) नमस्कार
१४) योग्य, उचित
१५) सेवक
१८) चावट
१९) अनेकवेळा
२१) श्रीरामाची चरित्रगाथा
२३) रसदार
२८) डावा
२९) खेकडा
३०) रत्नाकर
३१) सापाने सोडलेली त्वचा
३३) एकाग्र नजर
३४) नवऱ्याचा भाऊ
३७) जादू, हस्तलाघव
३८) खोदकाम
३९) जन्ममृत्यू
४०) पालट
४१) दरवाजा
४३) सामान
४५) चावणारा
४७) केसांची बट
४८) बढाई, बडबड
४९) कावळ्याचे ओरडणे
५०) मुख, चेहरा
५१) फसणे
५३) फुलांचा राजा
५५) पाणी
५६) जेवणातील दोन पदार्थ
५८) दुष्ट माणूस
५९) छोटा, लहान
६०) च्या सह
६२) च्या – – बद्दल
६४) इमारतीच्या पायात भरण्याचा दगडी प्रकार
६६) कोवळी फांदी
६९) हुक्की, लहर
७१) बशीचा जोडीदार
७३) भास
७४) वाचा, किराणा व्यापारी
७५) पडसे

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# भक्तिमार्ग

## काळ चातुर्मासाचा, आरोग्य जपण्याचा

आषाढी एकादशीनंतर चार्तुमासाला प्रारंभ होतो. आषाढातली ही एकादशी देवशयनी मानली जाते. म्हणजे यानंतरचे पुढचे चार महिने देव निद्रिस्त अवस्थेत असतात. कार्तिक महिन्यातल्या प्रबोधिनी एकादशीपर्यंतचा काळ चातुर्मास मानला जातो. चार्तुमासाच्या काळात श्रीविष्णू क्षीरसागरी योगनिद्रा घेत असतो. त्यामुळे या काळात विष्णूची उपासना करण्याबाबत सांगण्यात आलं आहे. हिंदू धर्मात या चातुर्मासाचं खूप महत्त्व आहे. या काळात कोणतीही शुभकार्यं केली जात नसली तरी व्रतवैकल्यं, सणवार यांची रेलचेल असते. या काळातली व्रतवैकल्यं, उपवास यांचं धार्मिक महत्त्व तर आहेच शिवाय वैज्ञानिक दृष्टीकोनातूनही याचा विचार करण्यात आला आहे. हा दृष्टीकोन समजून घेण्याचा प्रयत्न करायला हवा.

आयुर्वेदात ऋतूमानानुसार आहाराचं महत्त्व सांगण्यात आलं आहे. चातुर्मासाचा काळ हा पावसाळ्याचा असतो. या काळात शरीरातला अग्नी मंदावतो. पचनशक्ती क्षीण झालेली असते. एकंदरित काय, तर या काळात वातावरणात फारसं चैतन्य नसतं. याची प्रचिती आपल्याला ठायी ठायी येत असते. पावसाळ्यात बाहेरचं वातावरणही काहीसं मंद आणि कुंद असतं. चार्तुमासात काही गोष्टी निषिद्ध मानण्यात आल्या आहेत. तामसी, सामिष आहार या काळात वर्ज्य करण्याबाबत सांगण्यात आलं आहे. या काळात एक वेळ भोजन घेण्यास सांगण्यात आलं आहे. पावसाळ्यात अग्नी मंदावत असल्याने पचनसंस्थेचं कार्य मंदगतीने चालतं. एक वेळ उपवास केल्याने पचनसंस्थेवर ताण येत नाही आणि आरोग्य उत्तम राहतं. म्हणूनच या काळात साधा,



सात्त्विक आहार घेतला जातो. एक वेळ लंघन केल्याने शरीरातले दोष कमी होतात. शरीर हलकं होतं. शरीराचा समतोल राखला जातो.

**धार्मिक परंपरा**

चातुर्मासात मौनव्रताचं महत्त्व आहे. तसंच या काळात निंदानालस्ती करण्यासही मनाई करण्यात आली आहे. एखाद्याबद्दल वाईट बोलणं, वाईट विचार करणं याला फाटा द्यायला हवा. फक्त चातुर्मासातच नाही तर आयुष्यभर या व्रताचं पालन करायला हवं. चातुर्मासाच्या निमित्ताने निदान याची सुरूवात तरी करायला हवी. आजच्या आधुनिक जमान्यात पूर्ण मौनव्रत पाळणं शक्य नसलं तरी मोजकं बोलणं, वायफळ बडबड न करणं, आयुष्याबाबत तक्रारी न करणं, कोणावर टिका, निंदा, टिंगल न करणं एवढं तरी पाळता येऊ शकतं. चार महिन्यांची ही सवय हळूहळू आयुष्यभरासाठी अंगी बाणवता येऊ शकते. चातुर्मासात मंदावलेल्या शक्तीमुळे बोलण्यावरही मर्यादा ठेवण्यास सांगण्यात आलं आहे. आषाढ मासानंतर श्रावणाची सुरूवात होते. श्रावण म्हणजे सण आणि व्रतवैकल्यांचा महिना. या काळातल्या व्रतांमुळे आरोग्य उत्तम राहतं तसंच मंगळागौर, नागपंचमीसारख्या परंपरा आणि सणांनिमित्त महिला एकत्र जमतात. निरस वातावरणात थोडे रंग भरण्याचा प्रयत्न करतात. चातुर्मासाकडे फक्त धार्मिक दृष्टीकोनातून न पाहता त्याचं वैज्ञानिक आणि सामाजिक महत्त्व जाणून घेतलं पाहिजे. असं झालं तरच आपण आपल्या धार्मिक परंपरांची आजच्या काळशी सांगड घालू शकू.

## आता वंदू गुरूजन...

**कुठलंही ज्ञान ग्रहण करण्यासाठी गुरूची आवश्यकता असते. साहित्य, कला, विज्ञान, तंत्रज्ञान कुठल्याही क्षेत्रातील सखोल ज्ञान मिळवण्यासाठी गुरूला पर्याय नाही. संपर्काची अनेक साधनं आणि विद्याग्रहणाचे अनेक पर्याय समोर असले तरी आजही गुरूचं स्थान अबाधित आहे. गुरू कुठलंही ज्ञान सोप्या शब्दात आपल्यापर्यंत पोहोचवत असतो. ३ जुलै रोजी साजऱ्या होत असलेल्या गुरू पौर्णिमेनिमित्त...**



प्रत्येकाच्या आयुष्यात गुरूचं एक वेगळं स्थान असतं. गुरूपौर्णिमेच्या निमित्ताने गुरूचं स्मरण करण्याची, त्यांच्याप्रती आदरभाव व्यक्त करण्याची, त्यांचा सन्मान करण्याची संधी मिळते. कुठलंही ज्ञान ग्रहण करण्यासाठी गुरूची आवश्यकता असते. साहित्य, कला, विज्ञान, तंत्रज्ञान कुठल्याही क्षेत्रातील सखोल ज्ञान मिळवण्यासाठी गुरूला पर्याय नाही. संपर्काची अनेक साधनं आणि विद्याग्रहणाचे अनेक पर्याय समोर असले तरी आजही गुरूचं स्थान अबाधित आहे. गुरू कुठलंही ज्ञान सोप्या शब्दात आपल्यापर्यंत पोहोचवत असतो. ज्ञानावर त्याचे संस्कार झालेले असतात. एखाद्या विषयावर अभ्यास, मनन आणि चिंतन करुन त्याने तो विषय समजून घेतलेला असतो. असा स्वत:ला समजलेला विषय दुसऱ्यापर्यंत पोहोचवताना तो आनंदी असतो. दुसऱ्याला ते ज्ञान देण्यामागे त्याची तळमळ असते. आपल्याला आकलन झालेल्या विषयावर विद्यार्थ्यानं आणखी काम करावं, त्यावर अधिक संशोधन व्हावं आणि ज्योतीनं ज्योत प्रज्वलित होत रहावी ही सच्च्या गुरूची मनोधारणा असते. म्हणून शिष्य आपल्यापेक्षा मोठा व्हावा, त्यानं त्रिखंडात कीर्ती मिळवावी या उद्देशानं तो काम करतो. शिष्याच्या प्रगतीवर त्याच्या या सकारात्मक भावनांचा परिणाम स्पष्ट दिसून येतो. म्हणूनच काळ बदलला तरी गुरूला पर्याय नाही.

आता गुरूगृही राहून तपसाधना करण्याचे दिवस नाहीत. घरचे लाडकोड अनुभवत शैशव घालवल्यानंतर किशोरवयात व्यवहाराचे कटू धडे घेण्यासाठी गुरूगृही जाण्याची आज आवश्यकता नाही. तिथल्या कडक शिस्तीत, समवयस्कांसमवेत विद्याभ्यास करण्याचं आज काहीच प्रयोजन नाही. निसर्गाच्या सानिध्यात राहून आयुष्याचा अर्थ जाणून घेत उत्तम गृहस्थ होण्यासाठी पार पाडावा लागणारा हा महत्त्वाचा टप्पा आज आपल्या जीवनशैलीपासून दूर गेला आहे. आता विद्यार्थ्यांना घडवणाऱ्या, ज्ञानसंपन्न करणाऱ्या शिक्षण संस्था आहेत. पण त्यामुळे गुरू ही संकल्पना बदललेली नाही. एक नक्की की, आता परिस्थिती आमुलाग्र बदलली आहे. आजचं शिक्षण विद्यार्थी नव्हे तर परीक्षार्थी घडवत आहे. आता सगळ्याच घटांना एकसारख्या साच्यातून बाहेर काढलं जातंय. सर्वांना एकाच तागडीत तोलू पाहतंय. अर्थातच याचे तोटेही समोर दिसत आहेत. पूर्वी अशी परिस्थिती नव्हती. गुरूची रत्नपारखी नजर प्रत्येकातील विशेष गुण चाणाक्षपणे हेरत असे. प्रत्येक मातीचा कस लक्षात घेऊनच त्याला पूरक साच्यात घडवलं जात असे. म्हणूनच तयार होणाऱ्या प्रत्येकाचा आकार, रंग, रूप आणि अस्तित्व वेगळं असे. प्रत्येकाच्या अस्तित्वाला अर्थ देण्याचं काम असं विनासायास पार पडत असे. पण आता या संकल्पनेचं विकेंद्रीकरण झालं आहे. सकाळी शाळेत शिकायचं, दुपारी क्लासला जायचं, एखाद्या तिसऱ्याचं साहित्य अभ्यासाला पूरक म्हणूनच वापरायचं, गरज वाटल्यास घरातल्याचं सहाय्य घ्यायचं. म्हणजेच एक गुरू–एक शिष्य ही स्थितीच आता राहिलेली नाही.

**भक्ती विशेष**

मातापित्याचे संस्कार असतात तसेच गुरूंचे असतात. त्यांचं चारित्र्य, व्यासंग, वागणूक, व्यवहारज्ञान या सर्वांचा प्रभाव शिष्यावर पडतो. ही जाणूनबुजून नव्हे तर अप्रत्यक्षरित्या घडणारी क्रिया आहे. हे संस्कार त्या कोवळ्या वयात आदर्श निर्माण करत असतात. आयुष्यभर दीपस्तंभासारखी साथ देत असतात. पण काळाच्या प्रवाहात हा प्रघात मागे पडला आणि शिक्षणाचा बाजार मांडणारी एक व्यवहारी व्यवस्था अस्तित्वात आली. पण याचा अर्थ असा नव्हे, की आज गुरूपदी बसवावे असे लोकच नाहीत. सगळीकडे पसरलेली भेसळीची कीड इथेही पसरली असली तरी अनेक ऋषीतुल्य व्यक्तिमत्त्वं आपल्या आयुष्यात येतात. त्यातील काही लोक तर निरिच्छ भावनेनं विद्यार्थ्यांच्या भल्यासाठी झटत असतात. आज गुरूप्रती आदर कमी होतोय ही वस्तूस्थिती आहे. गुरूला एकेरी संबोधण्यापर्यंत ऱ्हास झालाय हे देखील वास्तव आहे. पैसा मिळवणं हे इप्सित समोर ठेवून विद्यादान करणाऱ्यांची संख्या वाढतीये हे नाकारण्यात अर्थ नाही. पण म्हणून सगळं संपलं असं नाही. कल्पना आणि वास्तव या दोन विरुद्ध बाबी असतात. त्या सांधणं हे कर्मकठीण काम. पण काहींना ही किमया साधते आणि बदलत्या प्रवाहातही स्वत्त्व टिकवून प्रवास सुरू ठेवला जातो. आजही असे अनेक आदर्श आहेत.

म्हणूनच आजही शाळेत असताना चिडके वाटायचे ते शिक्षक रस्त्यात भेटले की नकळत पायाला हात लावून नमस्कार केला जातो, जातीनं विचारपूस केली जाते. एखादी जुनी कविता वाचताना प्राध्यापकांनी वर्गात केलेलं रसग्रहण स्मरतं. तोंडी हिशेब करताना, पाढा चुकल्यावर शिक्षकांनी हातावर दिलेली छडी आठवते. वय आणि प्रगल्भता वाढताना शिक्षकांचा आठव अधिक गहिरा होत जातो.

आजच्या पिढीलाही या अनुभूतीचा आनंद घेता यावा अशी इच्छा आहे. गुरूपौर्णिमा इव्हेंट होता कामा नये. किमती भेटवस्तू, हार–फुलांचे गुच्छ, महागडी ग्रिटिंग देऊन गुरूपौर्णिमेचा इव्हेंट साजरा होईल, पौर्णिमा नाही. ही व्यासपौर्णिमा साजरी करायची तर दोघांची मने विशुद्ध हवीत. मनात प्रेमभाव दाटून यायला हवा आणि हा वसा पुढे चालवण्याचा संकल्प सोडायला हवा. दिल्यानं वाढणारी ही एकमेव संपत्ती आहे. वाटल्यानं वृद्धिंगत होणारा हा एकमेव खजिना आहे. तो जपू या. गुरूपौर्णिमा आनंदाने साजरी करू या.



## अशी करावी आरती

भगवंताच्या पूजेनंतर आपण आरती करतो. आरती ही भगवंताची स्तुती असते. यामुळे देव प्रसन्न होतो, असं म्हटलं जातं. आरती करताना देवाला ओवाळलं जातं. आरतीचे विविध प्रकार आहेत. कर्पूर आरती, पंचारती याद्वारे परमेश्वराचं ध्यान केलं जातं. आरती करताना निरंजन लावलं जातं. तमिळमध्ये आरतीला 'दीप आराधनई' असं म्हटलं जातं. आरती म्हणल्यानेच नाही तर यात सहभागी झाल्यानेही खूप पुण्य मिळतं. आरती करताना काही नियमांचं पालन करायला हवं. आरतीदरम्यान देवतेला तीन वेळा पुष्प अर्पण करायला हवं. आरती करताना झांजा, तबला, ढोल, वाजवले जातात.

आरती म्हणताना भक्ताच्या मनात विशेष भावना असली पाहिजे. आरती करताना देवाच्या ठायी पंचप्राण एकवटायला हवेत. मन परमेश्वराच्या चरणी लीन व्हायला हवं. मनात भक्तीभाव उमटायला हवा. आरती करताना लावलेल्या निरंजनाची ज्योत म्हणजे आपल्या आत्म्याच्या ज्योतीचं प्रतिक असतं. म्हणूनच आत्म्याची ज्योत परमेश्वराशी एकरूप व्हायला हवी. भक्ताने अंर्तमनाने साद घातली तर परमेश्वर प्रसन्न होतो, असं म्हणतात. आरती करताना आपण दिवा लावतो. हा दिवा विषम संख्येत असायला हवा. म्हणजे ३, ५ किंवा ७ दिव्यांनी देवाला ओवाळायला हवं. सर्वसाधारणपणे पाच दिव्यांनी देवाला ओवाळलं जातं. आरती करताना विविध माध्यमांचा वापर करता येतो. देवाला दिव्याने ओवाळता येतं. पाण्याने भरलेल्या शंखानेही आरती केली जाते. आरती करण्यासाठी पवित्र अशा रेशमी वस्त्राचा वापर केला जातो. आंबा आणि पिंपळाच्या पानांनीही आरती करता येते. तर

**आराधना**

साष्टांग म्हणजे मेंदू, हृदय, खांदे, हात आणि गुडघे अशा अवयवांनीही देवाची आरती करता येते. आरती हे मानवी देहातल्या पंचप्राणांचं प्रतिक मानली जाते. त्यामुळे येत्या सणासुदीच्या काळात किंवा दैनंदिन पुजेदरम्यान आरती करताना हे नियम लक्षात ठेवले तर अधिक लाभ होऊ शकतील.

## संयमात सामर्थ्य दडलंय

संयम हा महत्त्वपूर्ण गुण आहे. या गुणामुळे आयुष्यातील खडतर प्रसंगांना तोंड देण्याची क्षमता येते. मौन हा संयमाचाच एक पैलू आहे. शब्द वाणीच्या रुपात प्रकट होतात तेव्हा मोठा प्रभाव सोडून जातात. हे शब्द चांगले असतात तेव्हा साहजिकच प्रभाव चांगला असतो. उलटपक्षी, शब्द कटू, अमंगल आणि उग्र असले की प्रभावही वाईटच असतो. म्हणूनच आयुष्याचं अंतिम सत्य मृत्यू आहे अगदी त्याच प्रकारे वाणीचा शेवट मौन आहे. आपल्याकडे अक्षरांना ब्रह्म समजण्यात येतं. या शब्दब्रह्माचा उचित मान ठेवणं प्रत्येकाचं कर्तव्य आहे. वाणीचं माध्यम म्हणजे जीभ... वाणी मधूर असेल तर समोरच्या व्यक्तीपर्यंत माधुर्य पसरतं. मात्र जीभेद्वारे चुकीच्या शब्दांचा उच्चार झाला तर समोरची व्यक्ती कायमची दुरावते. हे सगळे शब्दांचे खेळ आहेत. मन आणि मस्तिष्कावर शब्दांचा थेट परिणाम होतो हे सत्य आधुनिक मानसशास्त्रानेही मान्य केलं आहे. एखादी व्यक्ती अपशब्द उच्चारत असेल तर समोरची व्यक्ती उत्तेजित होऊन त्याच अविर्भावात प्रत्युत्तर देते. समोरच्याची वाणी समजूतदार असेल तर प्रत्युत्तरही तसंच येतं. म्हणूनच जगातल्या प्रत्येक धर्माने ऊर्जावान शब्दाचा संचय करण्याचं सूचित केलं



**स्वबोध**

आहे. कुठल्याही धर्माची प्रार्थना पाहिली तर त्यात मधूर, मंगल, ऊर्जावान शब्दच दिसतात. आपल्या मंत्रांमध्येही असेच शक्ती प्रदान करणारे, समन्वय साधणारे आणि संघटित होण्याची शिकवण देणारे शब्द आढळतात. हेच सामर्थ्य जगण्याला नवं बळ देतं. संगीतामध्ये शब्द आणि सुरांचा मेळ असल्यामुळे मनुष्यांवरच नव्हे तर वनस्पतींवरही त्याचा प्रभाव दिसतो. म्हणूनच शब्दांचा नेटका वापर शिकायला हवा. महावीरांनीदेखील सम्यक वाणीचं महत्त्व सांगितलं आहे. गुरुनानक सांगतात, सतत चांगलं बोला आणि ते शक्य नसेल तेव्हा मौन राखा. आपल्या भावना नियंत्रणापलिकडे जातात, शब्दांनी मन दुखवण्याची शक्यता समोर दिसते, वाणीने शत्रू निर्माण होतील हे स्पष्ट होतं तेव्हा काही काळासाठी मौन राखणं केव्हाही चांगलं. कारण हा ही तपसाधनेचा एक भाग आहे.

## श्रीविष्णूची पावन तीर्थक्षेत्रे


उत्तराखंडमधलं बद्रीनाथ मंदिर

चातुर्मासाच्या काळात श्रीविष्णूच्या आराधनेला महत्त्व आहे. यानिमित्ताने श्रीविष्णूच्या प्रसिद्ध मंदिरांची ही ओळख...

* चार धामांपैकी एक म्हणजे उत्तराखंडमधलं बद्रीनाथ मंदिर. अलकनंदा नदीच्या किनारी हे मंदिर वसलं आहे. या मंदिरात श्रीविष्णूची काळ्या पाषाणापासून घडवलेली मूर्ती आहे.
* पुरीचं जगन्नाथ मंदिरही चार धामांपैकी एक. या ठिकाणी श्रीकृष्ण, सुभद्रा आणि बलराम यांच्या मूर्ती आहेत. जगन्नाथाची रथयात्रा जगभरात प्रसिद्ध आहे.
* तिरूपतीचं बालाजी मंदिर हे श्रीविष्णूचं अत्यंत महत्त्वाचं स्थान आहे. बालाजी मंदिर श्रीमंत देवस्थानापैकी एक. देश–विदेशातले भक्त तिरूपतीला येतात. इथे केस अर्पण करण्याची परंपरा आहे.
* तमिळनाडूतल्या कांचीपुरममध्ये उलागलंडा पेरूमल मंदिर आहे. हे स्थान विष्णूच्या १०८ दिव्यधामांपैकी एक आहे.
* केरळच्या थिरूअनंतपुरममध्ये पद्मनाभ स्वामींचं मंदिर वसलं आहे. हे जगातलं सर्वात श्रीमंत हिंदू मंदिर आहे.
* तमिळनाडूतल्या मदुराईमध्ये कोडालअझहगर मंदिर आहे. हे स्थानही विष्णूच्या १०८ दिव्यधामांपैकी एक आहे. कोडाल हे मदुराईचंच एक नाव आहे तर अझहगर म्हणजे सुंदर. म्हणूनच या मंदिराला कोडालअझहगर असं म्हटलं जातं.

**तीर्थक्षेत्र**

* तमिळनाडूमधल्या कांचीपुरममध्ये श्री वरदराजा पेरूमला मंदिर आहे. विष्णूचे भक्त या स्थानाला अत्यंत पवित्र मानतात.
* गुवाहाटीमध्ये अस्वक्रंता मंदिर आहे. हे मंदिरही बरंच प्रसिद्ध आहे.
* तमिळनाडूतल्या श्रीरंगममध्ये श्रीरंगनाथस्वामी मंदिर आहे. या मंदिराची रचना अनोख्या पद्धतीने करण्यात आली आहे. इथे भाविकांची वर्दळ असते.

## जन्माचं सोनं करा

चौऱ्याऐंशी लक्ष योनींमधून फिरल्यानंतर मनुष्यजन्म मिळतो, असं हिंदू धर्म सांगतो. भूतलावरच्या सर्व प्राणीमात्रांमध्ये माणूस श्रेष्ठ मानला जातो. माणसाकडे बुद्धी आहे, जाणीवा आहेत. तो हसू शकतो, रडू शकतो, बोलू शकतो. सर्व प्राणीमात्रांमध्ये हे वरदान केवळ मनुष्यालाच मिळालं आहे. म्हणूनच मनुष्य जन्म मिळणं भाग्याचं मानलं जातं. या जन्माचं सोनं करायचं की मातेरं हे ज्याच्या त्याच्या हाती असतं. समर्थ रामदास स्वामी दासबोधामधील पहिल्या दशकामधील दहाव्या समासामध्ये नरदेह स्तवन करतात. यात ते नरदेहाचं महत्त्व विषद करतात. ते म्हणतात,

धन्य धन्य हा नरदेहो। येथील अपूर्वता पाहो। जो जो किजे परमार्थालाहो। तों तों पावे सिद्धीतें।।१।। या नरदेहाचेनि लागवेगें। येक लागले भक्तीसंगें। येकीं परम वीतरागें। गिरिकंदरे सेविलीं।।२।।

याचा अर्थ असा की, हा नरदेह खरंच धन्य आहे. नरदेह प्राप्त झाल्यावर परमार्थ करता येतो. हीच याची अपूर्वता म्हणावी लागेल. जे परमार्थाला लागतात ते सिद्धीस जातात. नरदेह प्राप्त झाल्यानंतर काहीजण भक्तीमार्गाला लागतात. परमेश्वराची निस्सिम भक्ती करू लागतात. काहीजण वैराग्य पत्करतात. विरक्त होऊन ते डोंगरकपारीत राहू लागतात. नरदेह मिळाल्यानंतर विविध मार्गांनी देवाची भक्ती केली जाते. याबद्दल ते म्हणतात की, येक फिरती तीर्थाटणें। येक करिती पुरश्वचरणे। येक अखंड नामस्मरणें। निष्ठावंत राहिले।।३।।

याचा अर्थ असा की नरदेह मिळाल्यानंतर कोणी तीर्थयात्रा करतात तर कोणी पुनश्चरण करतात. काहीजण स्वत:ला अखंड नामस्मरणात गुंगवून टाकतात. नामस्मरणाची शक्ती ते जाणतात. आपल्या भगवंताप्रती ते निष्ठा आणि श्रद्धा राखतात. भगवंताचे नामस्मरण केल्यानंतर परलोकप्राप्ती होते, मोक्ष मिळतो पण हे सगळं नरदेहातच साध्य करता येतं.




याबाबत समर्थ दासबोधात म्हणतात की, पशुदेहीं नाही गती। ऐसे सर्वत्र बोलती। म्हणून नरदेहींच प्राप्ती परलोकाची ।।२१।। पशुदेही आत्म्याला गती मिळत नाही. यासाठी नरदेहच मिळावा लागतो. ही बाब सर्वश्रुत आहे. सर्वजण हे जाणतात. त्यामुळे नरदेह मिळाल्यानंतर परलोकप्राप्ती होऊ शकते. त्या दृष्टीने आपण प्रयत्न करायला हवेत. समासाच्या अखेरीस समर्थ म्हणतात, देह परमार्थी लाविले। तरिच याचे सार्थक जालें। नाहीं तरी हें वेर्थचि गेलें। नाना आघातें मृत्यूपंथे।।६१।।

**दासबोधातून**

याचा सरळ साधा अर्थ म्हणजे नरदेह परमार्थासाठी दिला तरच त्याचे सार्थक होते. नाही तर जन्म व्यर्थ जातो. त्याला काहीही अर्थ उरत नाही. परमार्थाकडे दुर्लक्ष केलं तर मनुष्य अनेक प्रकारच्या आघातांनी मृत्यूपंथाला लागतो. त्यामुळे मनुष्यदेहाचं सार्थक करून मोक्ष मिळवायचा असेल तर परमार्थ करायला हवा.

## राशी आणि रत्ने

मानवी आयुष्यावर रत्नांचा मोठा प्रभाव दिसून येतो, असं ज्योतिषशास्त्र मानतं. राशीनुसार रत्नं परिधान केल्यास व्यक्तीचं वर्तन आणि स्वभावामध्ये सकारात्मक परिणाम दिसून येतात. म्हणूनच राशीनुसार रत्न धारण करावं आणि यशवंत व्हावं. आज याविषयी माहिती घेऊ. राशीचक्रातील पहिली रास म्हणजे मेष.

**मेष:** ही अग्नितत्त्वाची रास आहे. या राशीच्या लोकांनी हिरा घालावा. यामुळे उत्कर्ष होतो.

**जाणून घ्या**

**वृषभ** : या राशीचा स्वामी शुक्र असून भाग्यरत्न पाचू हे आहे. या राशीच्या लोकांनी पाचू धारण केल्यास त्यांच्या विचारांमध्ये संतुलन बघायला मिळतं.

**मिथुन** : बुध राशीस्वामी असणाऱ्या मिथुन राशीच्या लोकांनी मोती धारण करावा. यामुळे आर्थिक स्थिती सुधारते त्याचबरोबर नातेसंबंधांमधील तणाव निवळतो.

**कर्क** : राशीचक्रातील या चौथ्या राशीच्या लोकांनी माणिक हे रत्न धारण करावं. हे रत्न या लोकांचा स्वभाव, जनसंपर्क आणि आर्थिक स्थितीवर प्रभाव दाखवतं.

**सिंह** : सिंह या राशीचा स्वामी सूर्य आहे. ही अग्नितत्त्वाची रास आहे. या राशीच्या लोकांना पेरीडॉट नामक रत्नाचा सकारात्मक परिणाम दिसून येतो.

**कन्या** : कन्या रास असणाऱ्या लोकांचं भाग्यरत्न नीलम आहे. चमकदार निळ्या रंगाचं हे रत्न या लोकांच्या आयुष्यात अत्यंत सकारात्मक बदल घडवून आणू शकतं.

**तुळ** : तुळ राशीचा स्वामी शुक्र असून या राशीच्या लोकांना ओपल या रत्नाचा विशेष लाभ मिळतो.

**वृश्चिक** : जलतत्त्वाच्या या राशीचे लोक अतिशय संवेदनशील असतात. ते अधिक चिकित्सक असतात. या गुणांमध्ये संतुलन निर्माण करण्यासाठी वृश्चिक राशीच्या लोकांनी टोपाझ हे रत्न धारण करावं.



**धनु** : अग्नितत्त्वाची ही रास चिकित्सक स्वभावासाठी ओळखली जाते. या लोकांना वारंवार आरोग्याच्या तक्रारी जाणवतात. ही नकारात्मकता दूर करण्यासाठी लाजव्रत नावाचं रत्न उपयुक्त ठरतं.

**मकर** : मकर राशीच्या लोकांनी गार्नेट नामक लाभदायी रत्न धारण करावं. क्रिस्टल स्वरुपात असणारं हे रत्न शुभ फलदायी ठरतं.

**कुंभ** : या राशीचे लोक अग्नितत्त्वाने प्रभावित असतात. जीवनात संतुलन निर्माण करण्यासाठी त्यांनी एमेथिस्ट नामक रत्न धारण केल्यास चांगले परिणाम दिसून येतात.

**मीन** : भावनातिरेक हे स्वभाववैशिष्ट्य असणाऱ्या लोकांनी ॲक्वामरीन स्टोन नामक रत्न धारण करावं. हे रत्न आयुष्यातील नकारात्मकता घालवतं.

# वाल्मीक कराडलाही 'मकोका' लावा



आमदार सुरेश धस यांची मागणी

■ महासागर प्रतिनिधी
धाराशिव, दि. ११ :

बीड मधील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात सात आरोपींना मकोका लावण्यात आला आहे. मात्र उरलेल्या आठव्या आरोपीला सुद्धा मकोका लावला पाहिजे. त्याच्यावर देखील ३०२ चा गुन्हा दाखल झाला पाहिजे. या हत्येमध्ये आका सुद्धा आहे. तोच मेन असल्याचा आरोप भाजप आमदार सुरेश धस यांनी केला आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणात आरोपींना कडक शिक्षा करण्याच्या मागणीसाठी धाराशिव जिल्ह्यामध्ये सर्वपक्षीय मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी धस बोलत होते.

या प्रकरणातील वरच्या आकाने १९ऑक्टोंबर रोजी स्वतःच्या सातपुडा या बंगल्यावर बैठक घेतली. त्यामुळे तो यामध्ये आरोपी का नाही? असा सवाल धस यांनी उपस्थित केला.

संतोष देशमुख यांची हत्या केवळ दीड कोटी रुपयांसाठी केली गेली. दीड कोटी नाही तर आम्ही तीन कोटी गोळा करून तुम्हाला दिले असते. मात्र आमच्या माणसाला अशा पद्धतीने तुम्ही मारायला नको होते, असे देखील धस यांनी म्हटले आहे. संतोष देशमुख आणि सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबाला न्याय मिळवण्यासाठी या मार्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चात कोणत्याही प्रकारचा जातिवाद केला जात नसल्याचा दावा सुरेश धस यांनी केला आहे. मंत्री धनंजय मुंडे यांचे ड्रग्ज प्रकरणातील आरोपींसोबत फोटो आहेत. त्यामुळे अजित पवारांनी धनंजय मुंडेंना मंत्रिपदावरुन दूर करून त्यांच्या जागी मनोज कायंदे यांना संधी द्यावी, अशी मागणी आमदार सुरेश धस यांनी यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे केली. तुमच्या पक्षातील अनेक आमदार निवडून आले आहेत. त्यातील कोणालाही संधी द्या, मात्र, यांना मंत्रिमंडळातून बाजूला करा, अशी मागणी देखील धस यांनी केली. त्यांनी भर दिवसा हत्या केली पुढील काळात ते सकाळी देखील हत्या करतील, असा इशारा देखील धस यांनी दिला आहे.

आज ७ जणांना मकोका लागला. एकाला बाजूला ठेवण्यात आले आहे. त्याच्यावरही मकोका लावण्यात आला पाहिजे. आका सध्या आपला या प्रकरणाशी कोणताही संबंध नसल्याचा दावा करत असेल, पण तोच मुख्य आहे. वरच्या आकानेही १९ ऑक्टोबरला आपल्या सरकारी सातपुडा बंगल्यावर बैठक घेतली होती. ही बैठक घेणारा मंत्री या प्रकरणात आरोपी कसा नाही? हे मला पोलिसांनी समजावून सांगावे, असे सुरेश धस म्हणाले.

अॅट्रोसिटी दाखल करू नका म्हणून आकाने पोलिसांना फोन केला होता. त्यानंतर आका त्याच्या आकाशी बोलला असेल. या दोघांनाही बिनभाड्याच्या खोलीत टाकले पाहिजे. यांना जिल्ह्याच्या गरम बराकीत जाऊ द्या, अशी माझी पोलिसांना विनंती आहे. या लोकांनी बाहेर कितीही टारटूर केली तरी या गरम बराकीत गेले की देव आठवतात, असेही सुरेश धस म्हणाले.

# राजकारण कुठे नेऊन बसवेल याचा भरवसा नाही : मुख्यमंत्री फडणवीस

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :



राजकारणात काहीही होऊ शकते. उद्धव ठाकरे महाविकास आघाडीत गेले, अजित पवार महायुतीत आले. राजकारणात काहीही होऊ शकते, असे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शरद पवार कधीही सोबत येऊ शकतात असे स्पष्ट संकेत दिले. नागपुरात झालेल्या जिव्हाळा पुरस्कार वितरण कार्यक्रमात झालेल्या मुलाखतीत फडणवीसांनी रोखठोक उत्तरे दिली. सुप्रसिद्ध प्रवचनकार व ज्येष्ठ संपादक विवेक घळसासी यांनी ही मुलाखत घेतली.

फडणवीस म्हणाले की, २०१९ नंतर २०२४ पर्यंत घडलेल्या घडामोडीतून मला नेव्हर से नेव्हर ही एक गोष्ट लक्षात आली. म्हणजे कुठलीही गोष्ट होणार नाही असे समजून कधी चालायचे नाही. झाले पाहिजे असे नाही.

असे व्हावे असे बिलकुल नाही किंवा ते होणेही फार चांगले आहे या मताचा मी नाही. शेवटी राजकारणात हे लक्षात ठेवले पाहिजे की, खूप ठामपणे असे होणारच नाही, असे आपण म्हणतो. त्या वेळी राजकीय परिस्थिती तुम्हाला कुठे नेऊन बसवेल याचा काही भरवसा नसतो. मयार्दाहीन पातळी सोडून वैयक्तिक टीका झाली तरी संयमी राहिलो.

शरद पवारांनी त्यांच्या पक्षाच्या बैठकीत रा. स्व. संघाच्या कामाचे कौतुक केले. याविषयी फडणवीस म्हणाले की, शरद पवार अतिशय चाणाक्ष आहेत. फेक नॅरेटिव्हचे वातावरण पंक्चर करणारी शक्ती कोण याचा त्यांनी निश्चितच अभ्यास केला असेल. ही शक्ती नियमित राजकारण करणारी नव्हे तर राष्ट्रकारण करणारी शक्ती आहे. हे त्यांच्या लक्षात आल्याने त्यांनी रा. स्व. संघाचे कौतुक केले असावे असे वाटते. शेवटी प्रतिस्पध्यार्चेही कौतुक करावे लागते, असेही फडणवीस म्हणाले.

# पोलीस आणि न्यायालयास पासपोर्ट जप्त करण्याचा अधिकार नाही : हायकोर्ट

## सत्र न्यायालय, सीबीआय कारवाई ठरवली अवैध

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ११ :



पोलिस व न्यायालयाला पासपोर्ट जप्त करण्याचा अधिकारच नाही, असे मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या न्यायमूर्ती ऊर्मिला जोशी-फलके यांनी एका निकालात स्पष्ट केले आहे.

२ जून २०१७ रोजी सीबीआयच्या आर्थिक गुन्हे शाखेने बँक ऑफ बडोदाच्या फसवणूक प्रकरणामध्ये नागपुरातील गोकुळपेठ येथील चित्रपट लेखक व निर्देशक संदीप केवलानी याच्यासह इतर आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान, सीबीआयने फौजदारी प्रक्रिया संहितेमधील कलम १०२ अंतर्गतच्या अधिकाराचा वापर करून केवलानीचा पासपोर्ट जप्त करून विशेष सत्र न्यायालयात सादर केला. त्यानंतर या न्यायालयाने फौजदारी प्रक्रिया संहितेमधील कलम १०४ अंतर्गतचे अधिकार वापरून पासपोर्ट स्वतःच्या ताब्यात घेतला. पासपोर्ट हा प्रवासाचा एक दस्तऐवज आहे. हा मुख्यत्वे आंतरराष्ट्रीय प्रवासाच्या उद्देशाने त्याच्या धारकाची ओळख आणि राष्ट्रीयत्व प्रमाणित करतो.

सीबीआयने फौजदारी प्रक्रिया अधिकाराचा वापर करून केवलानीचा पासपोर्ट जप्त करून न्यायालयात सादर केला. न्यायालयाने याच संहितेतील कलम १०४ चे अधिकार वापरून पासपोर्ट स्वतःच्या ताब्यात घेतला. उच्च न्यायालयाने सीबीआय व सत्र न्यायालयाची ही कारवाई अवैध ठरवली. फौजदारी प्रक्रिया संहितेमधील कलम १०२ अंतर्गत पोलिसांना व कलम १०४ अंतर्गत फौजदारी न्यायालयाला गुन्ह्याशी संबंधित वस्तू जप्त करण्याचा अधिकार आहे. परंतु, पासपोर्ट जप्तीकरिता पासपोर्ट कायदा लागू होतो. हा विशेष कायदा आहे. त्यामुळे या कायद्याचीच अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे. या कायद्यातील कलम १० (३) (ई) अनुसार केवळ पासपोर्ट अधिकारीच पासपोर्ट जप्त करू शकतात, असे उच्च न्यायालयाने नमूद केले.

# मालवण शिवपुतळा दुर्घटना प्रकरण

## जयदीप आपटे याला उच्च न्यायालयाकडून जामीन

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :

मालवण येथील शिवपुतळा दुर्घटनाप्रकरणी अटकेत असलेला शिल्पकार जयदीप आपटे याला उच्च न्यायालयाने शुक्रवारी जामीन मंजूर केला. या प्रकरणाचा तपास पूर्ण झाल्याने आपटे याला कोठडीत ठेवण्याची गरज नाही. शिवाय, या दुर्घटनेत कोणीही जखमी झालेले नाही.

त्यामुळे, हत्येचा प्रयत्न केल्याचे कलम या प्रकरणी लागू होऊ शकत नाही, असे सकृतदर्शनी निरीक्षण नोंदवून न्यायमूर्ती नितीन बोरकर यांच्या एकलीपीठाने आपटे याला जामीन मंजूर केला. तत्पूर्वी, निविदेतील अटीनुसार पुतळ्याच्या बांधकामाकरिता लागणाऱ्या साहित्यासाठी आपटे याने ४० लाख रुपयांचे कर्ज घेतले होते. त्यामुळे, पुतळा दुर्घटनाग्रस्त व्हावा, अशी तजवीज याचिकाकर्ता का करेल, असा प्रश्न आपटे याच्या वतीने युक्तिवाद करताना वकील गणेश सोवनी यांनी केला.




नागपूर : प्राणघातक नायलॉन मांजा विरोधात नागरिकांचा मोर्चा

# पर्यटकांसाठी मार्गदर्शक तत्त्वे समितीची स्थापना

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

उमरेड-कऱ्हांडला अभयारण्यात एफ-२ नावाची वाघीण आणि तिच्या पाच बछड्यांचा रस्ता पर्यटकांनी अडवला होता.

या प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दखल घेत स्वतःहून जनहित याचिका दाखल केली आणि वन विभागाच्या अधिकाऱ्यांची कानउघाडणी केली. शुक्रवारी या प्रकरणी अतिरिक्त प्रधान मुख्य वनसंरक्षक यांनी न्यायालयाची माफी मागितली. भविष्यात अशा प्रकारच्या घटना होऊ नये यासाठी जिप्सी चालक, मार्गदर्शक आणि पर्यटकांसाठी मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यासाठी विशेष समिती तयार केल्याची माहितीही त्यांनी न्यायालयाला दिली.

उमरेड-कऱ्हांडला अभयारण्यात ३१ डिसेंबरला पर्यटकांनी वाघांचा रस्ता अडवला होता. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने ६ जानेवारी रोजी स्वतःहून जनहित याचिका दाखल करण्याचा निर्णय घेतला.

शुक्रवारी न्या. नितीन सांबरे आणि न्या. वृषाली जोशी यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. अतिरिक्त प्रधान मुख्य वनसंरक्षक यांनी न्यायालयात शपथपत्र सादर केले.

अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी विभागीय वन अधिकारी, सहायक वनसंरक्षक, परिक्षेत्र वन अधिकारी यांची समिती नेमण्यात आली आहे.

# सामाजिक ऋणानुबंधनातून दिले जाणारे पुरस्कार लोकाश्रयाचे प्रतीक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :



राजाश्रय आणि लोकाश्रय या दोन माध्यमांमधून पुरस्कार दिले जातात. अनेक तात्विक तडजोडीतून तसेच चरणचुंबन व नवनीत लेपणाच्या आवरणातून राजाश्रयाचे पुरस्कार अंकित होत असतात पण समाजाचे ऋणानुबंध जेव्हा पुरस्काराच्या रूपाने अधोरेखित होतात तेव्हा ते लोकाश्रयाचे प्रतीक असतात असे वक्तव्य कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस कराडचे सल्लागार डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांनी केले.

अवचित्य होते विदर्भ गौरव प्रतिष्ठान नागपूर द्वारा आयोजित सोहळा कृतज्ञतेचा या सोहळ्याचे. बाबुराव धनवटे सभागृह येथे आयोजित या कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार व माजी माहिती आयुक्त राहुल पांडे, डॉ. गिरीश गांधी, प्रशांत वऱ्हाडे, अतुल दुरुगकर, निलेश खांडेकर यावेळी उपस्थित होते. या सोहळ्याच्या निमित्ताने नागपूर शहराचे भूतपूर्व पोलीस आयुक्त डॉ.भूषणकुमार उपाध्याय, केंद्रीय लिंबूवर्गीय संशोधन संस्था चे संचालक तसेच नवनवीन सायट्रस जातींचा शोध लावणारे डॉ.दिलीप घोष, कोरोना काळात नागपूरचे जिल्हाधिकारी म्हणून ज्यांची कारकीर्द उल्लेखनीय ठरली असे रवींद्र ठाकरे, डॉक्टर सिद्धार्थ काने, सामाजिक जाणिवेतून वकिली व्यवसाय करणारे अॅड. फिरदोस मिर्झा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाचे माजी कुलसचिव डॉ. पुरण मेश्राम, ९६ वर्षीय तरीही ताठ मानेचे अविरत योग तपस्वी विठ्ठल जिभकाटे, विज्ञान शिक्षक, विनोदी नाटककार, कथाकार उदयन ब्रह्म, सुप्रसिद्ध नाट्यकर्मी संजय जीवने, विद्यार्थ्यांच्या समस्या सोडविणारे म्हणून ख्यातनाम असणारे रमेश बोरकुटे, स्त्री शिक्षणासाठी व उन्नतीसाठी धडपडणाऱ्या व उत्कृष्ट संचालिका रेखा दंडीगे घीया, परोपकारी उपक्रमशील माणूस म्हणून ओळख असणारे राम गावंडे यांचा यावेळी शाल, श्रीफळ, पुष्पहार व सन्मानचिन्ह देऊन डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

यावेळी डॉ. वेद प्रकाश मिश्रा पुढे म्हणाले की पु.ल. देशपांडे म्हणाले होते की आपण अशा सामाजिक पोकळीत राहतो की ज्यांच्या पायावर डोके ठेवावे असे पाय नाहीत व आशीर्वाद देणारे हात नाहीत. पण सुदैवाने आज ज्या सत्कारमूर्तींचा सन्मान होतो आहे यांच्या रूपात समाजाला दिग्दर्शित करणारे खरे दस्तऐवज आपल्याला मिळालेले आहेत. मानव एकतर पुरस्काराचा हकदार असतो किंवा तिरस्काराला पात्र असतो. या दोन सामाजिक बिंदूमध्ये कोणताही जीवनाचा हर्ष नाही. असे यावेळी त्यांनी मार्गदर्शन केले. यावेळी गिरीश गांधी आपल्या प्रास्ताविकेत म्हणाले की सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक, आरोग्य, कृषी, प्रशासन अशा विविध क्षेत्रांमध्ये आपल्या परोपकारी सेवा भावनेतून सामाजिक उत्थान करणारे आजचे हे सत्कारमूर्ती म्हणजे आजच्या काळातील संत आहेत. त्यांचं ऋण आपण फेडू शकत नाही पण फुल नाही तर फुलाची पाकळी या सूत्रातून आपण त्यांचं काही देणं लागतो या भावनेतून आजचा हा सत्कार समारोह आहे.

# पैशांच्या वादातून तरुणाचा खून

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. ११ :

हातउसने दिलेल्या पैशांच्या वादातून तरुणाला बेदम मारहाण केल्याने त्याचा मृत्यू झाला. तरुणाच्या खून प्रकरणी विश्रामबाग पोलिसांनी एकाला अटक केली. नवी पेठेतील राजेंद्रनगर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या वसाहतीत ही घटना घडली. आनंद परमेश्वर डोलारे (वय ३०, रा. एसआरए वसाहत, राजेंद्रनगर, नवी पेठ) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी मन्या सोनावणे (रा. राजेंद्रनगर) याला अटक करण्यात आली. याबाबत आनंद डोलारेची आई वनिता (वय ५७) यांनी विश्रामबाग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ५ जानेवारी रोजी तो कामावरुन रात्री घरी आला. दारु पिऊन तो वसाहतीच्या परिसरात थांबला होता. आरोपी मन्या याने आनंदला हातउसने पैसे दिले होते.

# आज खासदार क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन

## खासदार कंगना रणौत यांची उपस्थिती



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

नागपूर आणि विदर्भातील खेळाडूंसाठी महत्वाचे व्यासपीठ ठरलेल्या खासदार क्रीडा महोत्सवाच्या सातव्या पर्वाला रविवार १२ जानेवारी २०२५ रोजी सुरुवात होत आहे.

खासदार क्रीडा महोत्सवाचे प्रेरक केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांच्या अध्यक्षतेत व खासदार, सिने अभिनेत्री कंगना रणौत यांच्या विशेष उपस्थितीत रविवारी १२ जानेवारी रोजी सकाळी ७ वाजता यशवंत स्टेडियम येथे महोत्सवाचा शुभारंभ होईल. मान्यवर अतिथींच्या हस्ते क्रीडा ज्योत प्रज्वलित केली जाईल. यावेळी खासदार क्रीडा महोत्सवाचे ध्वजारोहण होईल, अशी माहिती खासदार क्रीडा महोत्सवाचे सचिव डॉ. पीयूष आंबुलकर यांनी शनिवारी (ता.११) पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी डॉ. पद्माकर चारमोडे, प्रकाश चांद्रायण, सचिन देशमुख, अशफाक शेख, सतिश वडे, लक्ष्मीकांत किरपाने, नवनीतसिंग तुली, विनय उपासनी उपस्थित होते. केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या खासदार क्रीडा महोत्सवाच्या सातव्या पर्वाचे आयोजन १२ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०२५ या कालावधीमध्ये करण्यात येणार आहे. महोत्सवाच्या २० दिवसांमध्ये शहरातील ७३ क्रीडांगणांवर ५८ खेळ खेळले जातील.

यात विविध ५८ खेळांच्या तब्बल २९०० चमू, ६००० ऑफिसियल्स, ८० हजार खेळाडूंचा समावेश असेल. एकूण १३१०० स्पर्धा खेळविण्यात येणार असून यात खेळाडूंना १२३१७ मेडल्स आणि ७६२ ट्रॉफी देण्यात येतील. स्पर्धेतील विजेत्यांना १ कोटी ५० लक्ष रुपयांचे बक्षीस प्रदान करण्यात येणार आहेत.

रविवारी १२ जानेवारी रोजी सकाळी ५ वाजता यशवंत स्टेडियम येथून मॅरेथॉन आणि सकाळी ६.३० वाजता युवा दौडला सुरूवात होणार आहे. यानंतर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी व खासदार, सिने अभिनेत्री कंगना रणौत व अन्य मान्यवर अतिथींच्या हस्ते खासदार क्रीडा महोत्सवाचा शुभारंभ होईल.

मॅरेथॉन पुरूष, महिला आणि १६ वषार्खालील मुले व मुली या गटामध्ये होणार आहे तर ३ किमी अंतराची युवा दौड सर्वांसाठी खुली असणार आहे. युवा दौडमध्ये सहभागी प्रत्येक स्पर्धकाला मेडल्स, प्रमाणपत्र आणि टी-शर्ट प्रदान करण्यात येणार आहे.

महोत्सवाच्या आयोजनासाठी खासदार क्रीडा महोत्सवाचे संयोजक माजी महापौर संदीप जोशी, सचिव डॉ. पीयूष आंबुलकर, कोषाध्यक्ष आशीष मुकीम, नागेश सहारे, डॉ. पद्माकर चारमोडे, डॉ. संभाजी भोसले, डॉ. विवेक अवसरे, सचिन देशमुख, अशफाक शेख, अमित संपत, सतिश वडे, सचिन माथने, सुनील मानेकर, लक्ष्मीकांत किरपाने, डॉ. सौरभ मोहोड, रमेश भंडारी, प्रकाश चांद्रायण, नवनीतसिंग तुली आदी परिश्रम घेत आहेत.

## खासदार क्रीडा महोत्सवाचे वेळापत्रक

**१२ जानेवारी** : खो-खो (विदर्भ स्तरीय), अॅथलेटिकस, कबड्डी (विदर्भ स्तरीय), सॉफ्टबॉल, बास्केटबॉल
**१३ जानेवारी** : टेनिस बॉल क्रिकेट, प्रोफेशनल टेनिस बॉल क्रिकेट, ज्युडो (विदर्भ स्तरीय), बॅडमिंटन (विदर्भ स्तरीय), पंजा कुस्ती, लॉन टेनिस
**१५ जानेवारी** : तलवारबाजी, वुशू, तायक्वांडो
**१६ जानेवारी** : तिरंदाजी, मल्लखांब, रस्सीखेच, व्हॉलिबॉल
**१७ जानेवारी** : टेबल टेनिस
**१८ जानेवारी** : ब्रिज, हॉकी, हँडबॉल (विदर्भ स्तरीय), जलतरण
**१९ जानेवारी** : सायकलिंग (विदर्भ स्तरीय), क्वान की डो मार्शल आर्ट
**२० जानेवारी** : मास्टर अॅथलेटिक्स, आट्या पाट्या, रायफल शूटिंग, ट्रायथलॉन
**२२ जानेवारी** : अष्टेडू, दिव्यांग स्पर्धा, बॉक्सिंग
**२३ जानेवारी** : कुस्ती, लेदर बॉल क्रिकेट, कॅरम राज्य मानांकित, कोशिकी मटेरियल आर्ट, कराटे, मिनी गोल्फ
**२४ जानेवारी** : व्हॉलिबॉल जिल्हा आंतर क्लब, बुद्धिबळ, थ्रो बॉल, फ्लोअर बॉल, लंगडी
**२५ जानेवारी** : रोप स्किपींग, ज्येष्ठ नागरिक स्पर्धा
**२६ जानेवारी** : स्केटिंग, बॉडी बिल्डिंग (विदर्भ स्तरीय)
**२७ जानेवारी** : बेंच प्रेस पॉवरलिफ्टिंग, किड्स क्रॉस कंट्री, पिठ्ठू, ओ वूमनिया, अॅरोबिक्स अँड फिटनेस
**२८ जानेवारी** : मल्लविद्या

# ईपीएस-९५ वाढीव पेन्शन धोक्यात

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

खासगी कंपन्यातील कर्मचाऱ्यांनी ईपीएस-९५ च्या वाढीव पेंशनसाठी कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेकडे (ईपीएफओ) अर्ज केल्यानंतर कंपनी मालकांनी ईपीएफओकडे कर्मचाऱ्यांची माहिती पाठवायची आहे. परंतु अनेक कंपन्यांनी माहिती पाठवलेली नसल्याने ईपीएस-९५ च्या वाढीव पेंशनसाठी अर्ज करणाऱ्यांची वाढीव पेंशनची संधी हुकण्याची शक्यता आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर १ सप्टेंबर २०१४ नंतर निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांनी तसेच सध्या सेवेत असलेल्यांनी वाढीव पेंशनसाठी अर्ज केला आहे. देशभरात सुमारे १७ कर्मचाऱ्यांनी अर्ज केले आहेत. त्यापैकी ३ लाख कर्मचाऱ्यांची माहिती मालकांनी ईपीएफओकडे पाठवलेली नाही. कर्मचाऱ्यांचे वेतन किती होते किंवा आहे, किती वर्ष सेवा झाली आणि वेतनातून भविष्य निर्वाह निधीसाठी किती रक्कम कपात केली गेली किंवा जात आहे. यासंदभार्तील माहिती ईपीएफओकडे ३१ जानेवारी २०२५ पर्यंत पाठवायची आहे. अनेक कंपन्यांनी अद्याप माहिती पाठवलेली नाही. ३१ जानेवारी २०२५ पर्यंत माहिती न पाठवल्यास वाढीव पेंशनसाठीचा अर्ज नाकारण्यात येईल. त्यामुळे कर्मचाऱ्यांनी कंपनीकडे याबाबत पाठपुरावा करावा, असे ईपीएफओने कर्मचाऱ्यांना सूचित केले आहे.

शासकीय उपक्रम, महामंडळ, खासगी कंपन्या, असंघटित क्षेत्रातील कर्मचाऱ्यांनी वाढीव पेन्शन अर्ज केले आहेत. ईपीएफओने १ सप्टेंबर २०१४ च्या नंतर निवृत्त झालेले कर्मचारी आणि सध्या सेवेत असलेल्यांकडून ऑनलाईन अर्ज भरून घेतले आहे. आता कंपनीच्या मालकांना ऑनलाईन अर्ज ईपीएफओकडे सादर करावयाचे आहे. यासंदर्भातील लघुसंदेश कर्मचाऱ्यांना येत आहेत. ईपीएफओला कंपन्यांकडून निवृत्त कर्मचाऱ्यांची सविस्तर माहिती मिळणे आवश्यक आहे.

त्यानंतरच निवृत्तीनंतर कर्मचाऱ्यांनी किती रकमेची उचल केली आणि वाढीव पेंशनसाठी किती रक्कम आवश्यक आहे हे कळू शकणार आहे. ही संपूर्ण माहिती प्राप्त झाल्यानंतर ईपीएफओ निवृत्त कर्मचाऱ्यांकडे आवश्यक रक्कम भरण्यासंदर्भात मागणीपत्र (डिमांड) पाठवू शकणार आहे, असे निवृत्त कर्मचारी (१९९५) समन्वय समितीचे राष्ट्रीय कायदेविषयक सल्लगार दादा तुकाराम झोडे यांनी सांगितले.

दिल्ली विधानसभेची निवडणूक अपेक्षेप्रमाणे जाहीर झाली. गेल्या २७ वर्षांपासून दिल्लीत सत्ता मिळवण्याची आस असलेला भाजप, गेल्या एका तपापासून सातत्याने जनाधार गमावत असलेली काँग्रेस आणि मोदी लाटेतही सत्ता टिकवून ठेवण्यात यशस्वी झालेला 'आप' यांच्यात दिल्लीमध्ये तिरंगी लढत होत असली, तरी पक्षातील अनेक नेत्यांची तुरुंगवारी अनुभवणाऱ्या 'आप'पुढे या वेळी सत्ता राखण्याचे मोठे आव्हान आहे.

# 'आप'ची कसोटी



राही भिडे
ज्येष्ठ पत्रकार

निवडणूक आयोगाने दिल्लीच्या निवडणुकीच्या तारखा जाहीर केल्या असल्या, तरी आधीच दिल्लीच्या निवडणुकीच्या रणधुमाळीला सुरुवात झाली होती. आता त्याला आणखी वेग येईल. लोकसभेच्या तुलनेत या वेळी दिल्लीतील निवडणुकीचे चित्रही थोडे बदलले आहे. लोकसभा निवडणुकीत आम आदमी पक्ष आणि काँग्रेसने भाजपविरोधात एकत्रितपणे निवडणूक लढवली होती. आता 'आप' आणि काँग्रेसमध्ये एवढे शत्रुत्व आले आहे की काँग्रेसने अरविंद केजरीवाल यांचा उल्लेख देशद्रोही असा केला आहे. 'आप' विधानसभेच्या निवडणुकीला स्वबळावर सामोरा जात आहे. 'आप'च्या लोकानुनयी योजनांना आडकाठी घालण्याचे काम काँग्रेसने केले. काँग्रेसचे माजी खासदार संदीप दीक्षित यांनी उपराज्यपालांकडे तक्रार करून 'महिला सन्मान योजने'च्या सर्वेक्षणाची चौकशी करायला लावली. 'आप' आणि काँग्रेसमधील वैर एवढ्या टोकाला गेले आहे की, त्यातून 'इंडिया' आघाडीचे अस्तित्व पणाला लागले आहे. या दोन पक्षांमधील वादाचा फायदा भाजपच्या पथ्यावर पडण्याची शक्यता आहे. भाजपला १९९८ नंतर दिल्लीची सत्ता मिळवता आलेली नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची देशभर लाट असतानाही केजरीवाल यांनी ती थोपवली. मोठ्या नेत्यांना थेट आव्हान देऊन त्यांच्याविरोधात निवडणूक लढवण्याचे धक्कातंत्र केजरीवाल यांनी यशस्वी करून दाखवले. आता त्याच तंत्राचा वापर करून त्यांना अडकवून ठेवण्याची व्यूहनीती काँग्रेस आणि भाजपने आखली आहे. माजी मुख्यमंत्री शीला दीक्षित यांचे चिरंजीव संदीप यांना काँग्रेसने तर माजी मुख्यमंत्री साहिंबसिंह वर्मा यांचे चिरंजीव प्रवेश वर्मा यांना भाजपने केजरीवाल यांच्याविरोधात निवडणुकीच्या रिंगणात उतरवले आहे.

निवडणूक जाहीर होण्याआधीच सर्वच उमेदवार जाहीर करून 'आप'ने प्रचारात आघाडी घेतली आहे. भाजपचा बूथ मजबुतीकरणाचा फॉर्म्युला केजरीवाल यांनीही वापरला आहे; परंतु दहा वर्षांपासून अधिक काळ सत्तेत असल्याने त्यांना सत्ताविरोधी नाराजीचा काही प्रमाणात फटका बसण्याची शक्यता आहे. उमेदवारबदल आणि मतदारसंघातील बदल असे काही पर्याय 'आप'ने अवलंबले असले, तरी दिल्लीकर जनता किती विश्वास ठेवते, यावर या पक्षाचे यश अवलंबून आहे. सलग चौथ्यांदा सत्ता मिळवण्यासाठी आम आदमी पक्ष मैदानात उतरला आहे. त्यांनी आपले सर्व उमेदवार जाहीर केले आहेत. काँग्रेसचेही ४८ उमेदवार रिंगणात आहेत. भाजपने आतापर्यंत केवळ २९ उमेदवारांची घोषणा केली आहे. कालकाजी विधानसभा मतदारसंघातून या वेळीही मुख्यमंत्री आतिशी रिंगणात आहेत. त्यांच्या विरोधात काँग्रेसने राष्ट्रीय महिला मोर्चाच्या अध्यक्ष अलका लांबा यांना रिंगणात उतरवले आहे. भाजपने माजी खासदार रमेश बिधुरी यांना येथून उमेदवारी दिली आहे. श्री. बिधुरी निवडणुकीआधीच वादग्रस्त वक्तव्यामुळे चर्चेत आले आहेत. स्वच्छ प्रतिमा आणि राजकारणाचे शुद्धीकरण करण्यासाठी 'आप' मैदानात उतरला. लोकांच्या आशा-आकांक्षाचा विचार करून सुरुवातीला चांगली धोरणे राबवणाऱ्या या पक्षाच्या अनेक नेत्यांना दिल्ली मद्य घोटाळ्यासह अन्य अनेक आरोपांवरून तुरुंगात जावे लागले.

'आप' आपल्यावरील आरोपांचेच भांडवल करत असला, तरी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची गेल्या आठवड्यातील दिल्लीतील भाषणे पाहिली, तर ज्या मुद्यावरून 'आप'चा राजकीय उदय झाला, त्याच मुद्याचा म्हणजे गैरव्यवहाराचा आधार घेत 'आप'ची कोंडी करण्याची भाजपची व्यूहनीती दिसते. निवडणूक जाहीर होण्याआधी एक दिवस अगोदर प्रसिद्ध झालेला 'कॅग'चा अहवाल भाजपच्या हातात कोलित देणारा आहे. केजरीवाल स्वतःला एकदम साधे समजत असताना मुख्यमंत्री निवासस्थानावर केलेला खर्च आता प्रचाराचा मुद्दा बनला असून त्यावर 'आप'ला योग्य तो प्रतिवाद करता येत नाही. माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांनाही तुरुंगवारी करावी लागली. आता ते जंगपुरा येथून निवडणूक लढवत आहेत. पटपरगंजच्या हक्काच्या जागेवरून हलवून त्यांना जंगपुरमधून उमेदवारी दिली गेली आहे. त्यांना कोंडीत पकडण्यासाठी काँग्रेसने माजी महापौर फरहाद सुरी यांना तर भाजपने तीन वेळा आमदार राहिलेल्या तरविंदर सिंग मारवाह यांना उमेदवारी दिली आहे. आतापर्यंत सर्वच पक्षांनी इतर पक्षांतून येणाऱ्या नेत्यांना तिकीटवाटपात प्राधान्य दिले आहे. भाजपच्या उमेदवारांच्या पहिल्या यादीत पक्ष बदललेल्या सात नेत्यांची नावे आहेत. 'आप'ने इतर पक्षाच्या ११ नेत्यांवर विश्वास दाखवला असून काँग्रेसने आतापर्यंत तीन पक्षबदलू नेत्यांच्या उमेदवारीची घोषणा केली आहे.

लोकपाल आणि भ्रष्टाचाराच्या आंदोलनातून 'आप'चा २०१२ मध्ये उदय झाला. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांचे बोट धरून समाजकारणात आलेल्या केजरीवाल यांनी राजकीय पक्ष स्थापन करताना मात्र हजारे यांचे बोट कधी सोडले हे त्यांनाही कळले नाही. २०१३ च्या निवडणुकीमध्ये २८ जागा जिंकणारा हा पक्ष काँग्रेसच्या पाठिंब्याने सत्तेवर आला. काँग्रेसने पाठिंबा काढून घेतल्याने अवघ्या ४८ दिवसांमध्ये सत्ता गेल्याचे शल्य अजूनही केजरीवाल यांच्या मनात आहे, तर 'आप'चे वाढणे काँग्रेसच्या मुळावर येते, हे देशभरातील अनेक ठिकाणच्या उदाहरणांवरून पुढे आले आहे. दिल्लीकरांना मोफतच्या घोषणांची दोनदा भुरळ पडली. आताही महिलांसाठी दरमहा २,१०० रुपये आणि वृद्धांसाठी मोफत उपचार यासह अन्य आश्वासनांच्या आधारे 'आप' निवडणूक प्रचारात आघाडीवर आहे. १९९८ पासून भाजप दिल्लीतील सत्तेपासून दूर असून तीन निवडणुकांमध्ये त्याचा काँग्रेसकडून पराभव झाला. २०१३ मध्ये ३३ जागा जिंकूनही पक्ष सत्तेपासून दूर राहिला. २०१४ आणि २०१९ मध्ये लोकसभेच्या सात जागा जिंकूनही काही महिन्यांनी झालेल्या दोन विधानसभा निवडणुकांमध्ये पक्षाला मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले. मागील लोकसभा निवडणुकीतही 'आप' आणि काँग्रेस एकत्र असतानाही सातही जागा जिंकण्यात भाजपला यश आले. यामुळे पक्षाचे नेते या निवडणुकीबाबत आशावादी दिसत आहेत.

अलीकडेच पंतप्रधानांचा एक सरकारी कार्यक्रम आणि त्यानंतरच्या रॅलीमुळे भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला आहे. केजरीवाल विरुद्ध अशी मोदी अशा दोन प्रतिमांमध्ये लढत करण्यावर भाजपचा भर आहे. काँग्रेस राजकीय वर्चस्व मिळवण्याचा प्रयत्न करत आहे. दिल्लीमध्ये 'आप'च्या उदयानंतर काँग्रेसचे वाईट दिवस सुरू झाले. सलग १५ वर्षे दिल्लीत सत्तेत असलेल्या काँग्रेसच्या २०१३ मध्ये आठ जागा कमी झाल्या. त्यानंतरच्या दोन निवडणुकांमध्ये पक्षाला खातेही उघडता आले नाही. काँग्रेसची व्होट बँक आता आपसोबत गेल्याचे मानले जात आहे. ती परत मिळवण्यासाठी गेल्या दोन विधानसभा निवडणुकांच्या तुलनेत या वेळी काँग्रेस अधिक आक्रमक दिसत आहे. संदीप दीक्षित यांना मैदानात उतरवून आणि केजरीवाल यांच्याविरोधात धारदार वक्तव्ये करून काँग्रेसने आपले इरादे स्पष्ट केले आहेत. 'आप'ला प्रत्युत्तर म्हणून पक्षाने महिलांना दरमहा अडीच हजार रुपये देण्याची घोषणा केली आहे. दिल्लीतील कथित दारू घोटाळ्यात ताब्यात घेतले गेल्यानंतर तुरुंगातून सुटल्यानंतर केजरीवाल यांनी गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला. जनतेचा निकाल मिळेपर्यंत मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीवर बसणार नाही, अशीही घोषणा केली. केजरीवाल तेव्हापासून दिल्लीतील लोकांमध्ये आहेत, सभा घेत आहेत, यात्रा काढत आहेत आणि नवनवीन घोषणा करत आहेत. त्यात 'पुजारी ग्रंथी सन्मान योजना' आणि 'महिला सन्मान योजना' चर्चेत आहेत.

दिल्लीतील ही निवडणूक रंजक असणार आहे. कारण राष्ट्रीय राजकारणावर त्याचे परिणाम होतील. मुख्य म्हणजे आम आदमी पक्षाचे भवितव्य ठरवतील. गेल्या चार वर्षांमध्ये केजरीवाल, सिसोदिया, माजी आरोग्यमंत्री सत्येंद्र जैन यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप झाले आणि त्यांना तुरुंगात जावे लागले. 'आप'चे राज्यसभा खासदार संजय सिंह यांनाही अटक करण्यात आली होती. हे सर्व लोक जामिनावर बाहेर असले, तरी भाजपने हा मुद्दा बनवून भ्रष्टाचाराविरुद्ध लढणारा पक्षच भ्रष्टाचाराच्या गाळात रुतल्याची प्रतिमा उभी करण्याचा प्रयत्न केला आहे. या निवडणुकीत केजरीवालांसाठी बरेच काही पणाला लागले आहे. आम आदमी पक्षाचा मध्यम आणि कनिष्ठ मध्यमवर्गीयांमध्ये प्रवेश हा केजरीवाल यांच्या विजयात महत्त्वाचा घटक आहे. याशिवाय महिला मतदारांचा कल निर्णायक भूमिका बजावेल. केजरीवाल काळानुरूप आपली रणनीती बदलत आहेत. भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावर त्यांनी भाजपचे कथन रुजू दिले नाही; मात्र मध्यमवर्गातील त्यांचा जनाधार कमी झालेला असू शकतो. या पार्श्वभूमीवर ही लढाई कशी रंगते, ते आता पहायचे.




✦✦✦

मागील वर्षापेक्षा नवीन वर्षामध्ये आयुष्याला स्पर्शणाऱ्या विविध क्षेत्रांमध्ये वेगळे चित्र पहायला मिळेल याची शाश्वती नाही, पण अपेक्षा खूप आहेत. येत्या वर्षावर २०२४ मधील राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील घडामोडींचा आणि भविष्यातील भाकितांचा दरवर्षीप्रमाणे प्रभाव असेल हे निश्चित. मात्र विविध क्षेत्रांसाठी हे वर्ष कसे राहील, याचा आढावा बोलका आहे.

# विविध क्षेत्रांसाठी कसे असेल नववर्ष?

वर्तमान

शंतनु चिंचाळकर

अखेर नव्या अपेक्षांनिशी नवे वर्ष अवतरले आहे. या वर्षात जाणवणाऱ्या नानाविध आव्हानांची, घडामोडींची चर्चा एव्हाना सुरु झाली आहे. सहाजिकच २०२५ मध्ये महागाई, बेरोजगारी, अर्थकारण, शैक्षणिक विश्व, माहिती तंत्रज्ञान, आंतरराष्ट्रीय संबंध, कृषीविषयक समस्या आदी पातळ्यांवर काय काय घडणार, हे जाणून घेणे महत्वाचे आहे. या महत्वाच्या आव्हानांबरोबरच मथुरा, श्रीकृष्ण जन्मभूमी आणि ज्ञानवापी मस्जिद सारखे इतरही सामाजिक विषय काय वळण घेतात, हे पाहणे महत्वाचे आहे. सर्वप्रथम राजकीय चौकटीतून आढावा घेऊ. केंद्रातले सरकार सध्या हिंदुत्ववादी नसलेल्या दोन महत्वाच्या पक्षांच्या आधारावर सत्तेत आहे. त्यामुळे एकीकडे हिंदुत्ववादी संघटनांचा दबाव तर दुसरीकडे पाठिंबा देणाऱ्यांना सांभाळणे, हे आव्हान म्हणजे केंद्र सरकारची तारेवरची कसरत असेल. राज्य सरकारांचा विचार करता लाडकी बहिण वा तत्सम महिलाकेंद्री योजना वाढीव मदतीद्वारे सुरू ठेवणे आणि विविध जातींचा, समुदायांचा आरक्षणाचा आग्रह समजून घेणे, हा एक महत्वाचा मुद्दा असेल.




'एक राष्ट्र एक निवडणूक' विधेयक मंजूर करून घ्यायला पूर्ण बहुमत नसलेल्या केंद्र सरकारला अशाच दिव्याला सामोरे जावे लागणार आहे. बड्या विरोधी पक्षांचा या विधेयकाला तीव्र विरोध आहे. 'एक देश, एक कर, एक बाजारपेठ' हे तत्व अंगीकारून सात वर्षे उलटून गेली तरी जीएसटीबाबत काही तक्रारी आहेत. करदात्यांसह करनियोजन करणाऱ्यांना सोपी जाईल, अशी कार्यप्रणाली राबवण्याचे आव्हान केंद्र सरकारला पेलावे लागणार आहे. महागाई, बेरोजगारी आणि शेतकरी वर्गाचे प्रश्न दर वर्षीसारखेच प्रलंबित आहेत. २०२५ च्या सुरुवातीलाच दिल्लीमध्ये होऊ घातलेल्या निवडणुकीच्या तोंडावर असे प्रश्न महत्वाचे ठरणार आहेत.



२०२४ च्या उत्तरार्धात पार पडलेल्या अमेरिकेच्या राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीनंतर ट्रम्प सरकार सत्तेत आले. ज्यांच्यामुळे कोणत्याही क्षणी महायुध्दाच्या भडका उडू शकतो, अशा रशिया-युक्रेन आणि इस्रायल-आखाती देशातील युध्दांना त्यामुळे फारसा काही फरक पडेल असे आता दिसत नाही. कारण, रशिया आणि इस्रायल ही अमेरिकेच्या दबावापुढे झुकणारी राष्ट्रे नव्हेत. इस्रायलला अमेरिकेचा तर युक्रेनला पाश्चात्य देशांचा छुपा पाठिंबा आहे. त्यामुळे या युध्दांपासून दूर राहून आपले राजकीय महत्व कायम ठेवण्याचा अमेरिकेचा प्रयत्न असेल. भारत-चीन सीमावाद हा तात्पुरता थंड होणारा आणि कधीही गंभीर होणारा मुद्दा २०२५ लाही 'पुनश्च: हरी ओम' म्हणत पुढे चालूच राहील अशी चिन्हे आहेत. ३७० वे कलम रद्द करून केंद्र सरकारकडून काश्मीर प्रश्न आणि दहशतवादावर कायमस्वरुपी तोडगा काढण्याचे प्रयत्न केले गेले. पुढील काळात विभाजनवादी शक्तींना होणाऱ्या देशांतर्गत अर्थ आणि मनुष्यबळ पुरवठ्यावर बऱ्याच अंशी अंकुश ठेवण्यात केंद्र सरकार यशस्वी ठरेल, अशी आशा आहे.



५ जून २०२४ रोजी नासाच्या अंतराळ मोहिमेवर गेल्यावर फ्लाइटमधील हेलियम गळती आणि थ्रस्टर निकामी झाल्यामुळे अंतराळात अडकलेल्या भारतीय वंशाच्या सुनीता विल्यम्स यांच्या पृथ्वीतलावर परत आणण्याकडे अनेकांचे लक्ष लागून राहिले आहे. यापूर्वी १९ नोव्हेंबर १९९७ रोजी अंतराळ मोहिमेवर गेलेल्या कल्पना चावला यांचा १ फेब्रुवारी २००३ रोजी पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश करताना झालेल्या अंतराळयान अपघातामध्ये दुर्दैवी मृत्यू झाला होता. त्या पार्श्वभूमीवर ही मोहीम महत्वाची असेल. दरम्यान, यंदा महिला अंतराळवीराचे पहिल्यांदाच चंद्रावर पाऊल पडणार आहे. अमेरिकेच्या 'नॅशनल एरोनॉटिक्स अँड स्पेस ॲडमिनिस्ट्रेशन' (नासा) या संस्थेने नव्या अंतराळ मोहिमेची तयारी सुरू केली आहे. ही मोहीम जगाच्या दृष्टीने औत्सुक्याची आहे.




अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी १ फेब्रुवारी २०२४ रोजी सादर केलेला अंतरिम केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये शाश्वत कृषी परिसंस्था जोपासण्याच्या उद्देशाने अनेक उपक्रम प्रस्तावित केले. पीक विम्यामध्ये हस्तक्षेप, नॅनो खतांच्या वापराला प्रोत्साहन, तेलबिया उत्पादनात स्वयंपूर्णतेला चालना देणे आणि सूक्ष्म अन्न प्रक्रियेतील गुंतवणूक वाढवून कृषी क्षेत्रातील उत्पादकतेला समर्थन देणे हे केंद्र सरकारचे उद्दिष्ट्य आहे. याबाबत या वर्षामध्ये राज्य सरकारलाही महत्वाची भूमिका पार पाडावी लागेल. भारतीय तंत्रज्ञान झपाट्याने बदलत आहे. २०२४ हे वर्ष क्लाउड कंप्युटिंग, सायबर सुरक्षा आणि शाश्वत तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे गाजले. २०२५ मध्ये भारतीय तंत्रज्ञानाचा लँडस्केप विकसित होत आहे, कारण व्यवसाय स्पर्धात्मक राहण्यासाठी तंत्रज्ञानाशी जुळवून घ्यावे लागेल. संस्था समाकलित करून, बहु-क्लाउड रणनीतींचा अवलंब करून आणि सायबर सुरक्षेला प्राधान्य देऊन लवचिक आणि नाविन्यपूर्ण इकोसिस्टीम तयार केली जात आहे. एआय आणि मशीन लर्निंग इंटिग्रेशन प्रोग्राम मशीन लर्निंग ऑपरेशन्सचा अविभाज्य घटक बनत आहेत. २०२५ मध्ये व्यवसायांनी निर्णय घेण्याची क्षमता वाढवण्यासाठी, पुनरावृत्ती होणारी कार्ये स्वयंचलित करण्यासाठी आणि वैयक्तिकृत ग्राहक अनुभव प्रदान करण्यासाठी नवे उपाय स्वीकारणे अपेक्षित आहे. उत्पादन, आणि वित्त यांची उद्योगपुरवठा साखळी उत्तम प्रकारे वापरण्यासाठी, जोखीम व्यवस्थापन करण्यासाठी आणि कार्यक्षमता सुधारण्यासाठी भविष्यसूचक विश्लेषणे आणि एआयचालित अंतर्दृष्टीचा फायदा घेण्यावर नव्या वर्षात उद्योगक्षेत्राचा भर असायला हवा.

शिक्षण प्रक्रियेतील तंत्रज्ञान अधिक समावेशक आणि परिणामाभिमुख बनवण्याचे उद्दिष्ट २०२५ मध्ये समोर असणार आहे. डिजिटल क्लासरूमपासून ऑनलाइन संसाधनांपर्यंत, शहरी-ग्रामीण भेद दूर करण्यासाठी तंत्रज्ञानाचे एकत्रीकरण महत्त्वाचे आहे. त्यामुळे दुर्गम भागातील विद्यार्थ्यांनाही दर्जेदार शिक्षण मिळेल. हे नवीन शैक्षणिक धोरणाच्या उद्दिष्टांशी पूर्णपणे जुळते. आकर्षक शैक्षणिक वातावरण तयार करण्यासाठी उच्च तंत्रज्ञान वापरण्यावर २०२५ मध्ये जोर दिला जाणे अपेक्षित आहे. या शैक्षणिक परिवर्तनाला पाठिंबा देण्यासाठी सायबर स्कूल व्यवस्थापनाद्वारे येत्या वर्षात प्रयत्न होणे अपेक्षित आहे. शाळा व्यवस्थापन सॉफ्टवेअर २०२५ चे नवीन शैक्षणिक धोरण प्रभावीपणे अंमलात आणण्यासाठी शाळांना मदत होईल अशा प्रकारे डिझाइन केलेले आहे. शिक्षक शिक्षण सुलभ करण्यासाठी, विविध कार्ये आणि प्रकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी या सोफ्टवेअरचा वापर करू शकतात. ते व्यावहारिक आणि वास्तविक प्रयोगांवर आधारित धोरणे संरेखित करतात. सायबर स्कूल मॅनेजर शिक्षकांना सक्षम करण्यासाठी आणि शिक्षणाच्या या नवीन युगात विद्यार्थ्यांचा शिकण्याचा अनुभव उन्नत करण्यासाठी येत्या वर्षात प्रयत्नशील राहतील. वाढत्या बेरोजगारीच्या समस्येबरोबर २०२५ मध्ये जाताना टाळेबंदी, महागाई या अनुषंगाने तरुणांमध्ये अनिश्चितता आणि अस्थिरता दिसून येते. परिस्थितीशी जुळवून घेण्यास आणि विकसित होण्यास इच्छुक असलेल्यांसाठी आव्हाने आणि संधीदेखील निर्विवाद आहेत. मार्केट ट्रेंड समजून घेऊन, धोरणात्मक तयारी करून नोकरी शोधणारे नव्या वर्षात यश मिळवू शकतात.

माहिती तंत्रज्ञान आणि नवीन तंत्रज्ञान ही २०२५ मधील अतिशय महत्त्वाची क्षेत्रे असतील. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंग यामुळे अनेक संधी उपलब्ध होणार आहेत. काही नोकऱ्या व्यापार, विज्ञान, राजकारण, किंवा पर्यावरणाशी थेट निगडीत आहेत. त्या अपारंपारिक ऊर्जेचा विकास, उर्जेचे नवीन स्रोत, बॅटरी, तसेच लुप्त झालेल्या प्रजातींचे संवर्धन, बिझनेस सल्लागार किंवा कायदेशीर सल्ला तसेच पर्यावरण संरक्षण कायदे या क्षेत्रात निर्माण होऊ शकतात. जागतिक पातळीवरील लोकसंख्या आता वृद्धावस्थेत पोहोचली आहे तसेच आयुमर्यादाही वाढली आहे. त्यामुळे त्यांची काळजी घेण्याची आणि उपचारांची गरज लागणार आहे. त्यामुळे आरोग्यक्षेत्रात काम करणाऱ्यांना पुढच्या काळात मागणी असणार आहे. आरोग्यसेवक फक्त औषधेच नाही तर नैतिक आधार देतील, हे ही पहावे लागणार आहे.

मेकॅनिक, रिपेअरमन, इलेक्ट्रिशियन, बिल्डर यांचीही गरज येत्या काळात भासणार आहे. वेगवेगळ्या परिस्थितीत किरकोळ किंवा कौशल्यपूर्ण कामे करायची असल्यास माणसांना पर्याय नाही. मात्र मागणी कायम रहावी यासाठी या लोकांनाही आपले ज्ञान सतत अपडेट करावे लागेल आणि नवीन गोष्टी शिकाव्या लागतील. ग्राहक सेवा (कॅशिअर, विक्रेते, सल्लागार इत्यादी), कार्यालय व्यवस्थापन (रिमोट वर्किंग वाढल्यामुळे), डेटा एंट्री (अर्थ, आकडेवारी, टायपिस्ट, टेक्निकल ट्रान्सलेटर), अकाऊंटिंग आणि एकच काम वारंवार करणारे फॅक्टरी वर्कर्स यांचा त्यात समावेश असेल. ही गरज या वर्षात अधोरेखीत होईल.

एकूणच २०२५ कडून अपेक्षा खूप आहेत. सलग तीन वर्षे कोविडसारख्या महामारीशी, वाढत्या महागाईशी आणि सामान्यांच्या समस्यांशी अव्याहतपणे दोन हात केल्यावर समाजातील विविध वर्गांसाठी यंदा जगभर आशादायक परिस्थिती निर्माण होण्याची आशा आहे.

✦✦✦

# अर्थसंकल्पाचे पडघम आणि अपेक्षा

**भारताची अर्थव्यवस्था सध्या वाढीचा वेग गमावत आहे. २०२४ मध्ये दुसऱ्या तिमाहीम ध्ये तर अर्थव्यवस्था नीचांकी पातळीवर पोहोचली. भारतीय रिझर्व्ह बँकेने वर्तवलेल्या सात टक्क्यांच्या अंदाजापेक्षा ही आकडेवारी खूपच कमी आहे. अलीकडच्या वर्षात अर्थव्यवस्थेसाठी अतिशय महत्त्वाचा असलेला सरकारी खर्चदेखील कमी झाला आहे. याखेरीज जागतिक निर्यातीम ध्ये भारताचा वाटा फक्त दोन टक्के राहिला आहे.**






**हेमंत देसाई**
ज्येष्ठ पत्रकार

भारताची अर्थव्यवस्था सध्या वाढीचा वेग गमावत आहे. जुलै–सप्टेंबर २०२४ दरम्यान अर्थव्यवस्था ५.४ टक्के अशा सात तिमाहींमधील नीचांकी पातळीवर पोहोचली आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने वर्तवलेल्या सात टक्क्यांच्या अंदाजापेक्षा ही आकडेवारी खूपच कमी आहे. अलीकडच्या वर्षात अर्थव्यवस्थेसाठी अतिशय महत्त्वाचा असलेला घटक म्हणजे सरकारी खर्च. हा खर्चदेखील कमी झाला आहे. याखेरीज जागतिक निर्यातीमध्ये भारताचा वाटा फक्त दोन टक्के राहिला आहे. आर्थिक घडामोडींचे तपशिल जाणून घ्यायचे झाल्यास अलिकडच्या काळात फास्ट मूव्हिंग कन्झ्युमर गुड्स, म्हणजेच गृहोपयोगी वस्तू बनवणाऱ्या कंपन्यांच्या विक्रीमध्ये फारशी भर पडलेली नाही, हे दिसते. वित्तीय कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनातही घट होत आहे. २०२४–२५ या आर्थिक वर्षासाठी रिझर्व्ह बँकेने तर फक्त ६.६ टक्के वाढीचा अंदाज वर्तवला आहे. भारत झपाट्याने आपला विकास साध्य करत असून जगाला आपले कौतुक वाटत आहे, अशी कितीही पाठ थोपटून घेतली, तरी वस्तुस्थिती वेगळीच दिसत आहे. केंद्र सरकार मात्र हे कठोर वास्तव स्वीकारायला तयार आहे, असे वाटत नाही. गेल्या तिमाहीमध्ये सार्वजनिक खर्चात कपात झाली. सार्वत्रिक निवडणुकीच्या काळात सरकारी खर्च कमी झाल्यामुळे प्रगतीचा वेग मंदावला, असा युक्तिवाद याबाबत केला जात आहे. मुळात वेगवेगळे प्रकल्प तसेच सर्व प्रकारचा भांडवली खर्च करण्याचा सरकारचा वेग मंदावला आहे. केवळ निवडणुकांवर याचे खापर फोडणे योग्य नाही. त्याचप्रमाणे उच्च व्याजदरांमुळे सर्वसामान्य लोकांना तसेच उद्यो–व्यवसायिकांना कर्ज घेणे परवडत नाही. ते त्यांना महाग वाटते.

ऑक्टोबरमध्ये तर देशांतर्गत भाववाढीचा दर ६.२ टक्क्यांच्या वर पोहोचला होता. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने ठरवलेल्या चार टक्के दराची मर्यादा ओलांडली गेली होती. याचे कारण, अन्नधान्याच्या तसेच भाज्यांच्या किमती प्रचंड भडकल्या होत्या. भाववाढ आटोक्यात येत नसल्यामुळे रिझर्व्ह बँकेने गेल्या दोन वर्षांपासून व्याजदर स्थिर ठेवले आा–हेत. व्याजदर कमी होत नाहीत, तोपर्यंत व्यापारी आणि उद्योजकांना मोठ्या प्रमाणात कर्ज घेणे शक्य नाही. त्याचप्रमाणे सामान्य लोकही कमी प्रमाणात कर्ज घेऊन अल्प खर्च करत आहेत. म्हणूनच बाजारपेठेतील एकूण मागणी कमी झाली आहे. भारतात असंघटित क्षेत्र, लघु आणि मध्यम उद्योगधंदे, शेती आणि पारंपारिक व्यवसाय या 'ओल्ड इकॉनोमी'मध्ये आवश्यक तेवढ्या आर्थिक सुधारणा झालेल्या नाहीत. उलट, नवीन अर्थव्यवस्थेचा चांगला विकास होत आहे. उदाहरणार्थ, भारत आता 'ग्लोबल कॅपॅसिटी सेंटर'साठी जगातील सगळ्यात मोठे केंद्र म्हणून उदयास येत आहे. जगातील पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त ग्लोबल कपॅसिटी सेंटर्स आता भारतात आहेत. त्याचप्रमाणे भारतातील कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आयटी उद्योग झपाट्याने वाढत आहे. म्हणजेच नवीन अर्थव्यवस्थेचा किंवा न्यू इकॉनॉमीचा चांगला विस्तार होत आहे.

सध्या जुनी आणि नवीन, अशा दोन करपद्धतींनुसार प्राप्तिकर आकारणी केली जाते. दोहोंपैकी एका पद्धतीची निवड करावी लागते. जुन्या पद्धतीत विमा, प्रॉव्हिडंट फंड आणि गृहकर्जासाठी वजावटीची सवलत मिळते. यात अडीच लाख रुपयांचे उत्पन्न करमुक्त आहे. अडीच ते पाच लाखांपर्यंत पाच टक्के कर भरावा लागतो. तर पाच ते दहा लाख रुपयांवर २० टक्के आणि दहा लाखांच्या वर ३० टक्के कर द्यावा लागतो. नव्या पद्धतीत कोणतीही वजावट अथवा सूट मिळत नाही. यात तीन लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न संपूर्णपणे करमुक्त आहे. देशातील वस्तू विक्रीला प्रोत्साहन देण्यासाठी २०२५–२६ या अर्थसंकल्पात १५ लाख रुपयांपर्यंतचे वैयक्तिक उत्पन्न करमुक्त करावे, असा निर्णय घेतला जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तसे घडल्यास भारतातील मध्यमवर्गाला मोठाच दिलासा मिळेल. तसेच उपभोग्य वस्तूंच्या मागणीलाही पाठबळ मिळेल. सध्या आर्थिक मंदी आणि राहणीमानाचा वाढता खर्च यामुळे देशातील मध्यमवर्गीयांना विविध आर्थिक समस्यांचा सामना करावा लागत आहे. करकपातीचा सर्वाधिक लाभ नोकरदार वर्गाला होईल आणि त्यांच्या हातात अधिक पैसा खेळू लागेल. त्यामुळे ग्राहकखर्चात वाढ होऊन अर्थव्यवस्था नरमाईतून बाहेर पडेल, असा मतप्रवाह आहे. मध्यमवर्ग ही देशाची ताकद आहे, अशा आशयाचे वक्तव्य पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले होते. त्यामुळे या अर्थसंकल्पात मध्यमवर्गास अधिक सवलती मिळतील, अशी शक्यता नक्कीच दिसते.

गेल्या वर्षीचा अर्थसंकल्प हा तात्पुरत्या स्वरूपाचा होता. कारण त्यानंतर तीन महिन्यांनी लोकसभा निवडणुका होणार होत्या. परंतु आता निवडणुकांचा हंगाम संपला आहे. काही राज्यांमधील विधानसभा निवडणुकाही पार पडल्या आहेत. नवी दिल्लीची निवडणूक वगळता तूर्तास तरी कोणत्याही राज्यात निवडणुका नाहीत. त्यामुळे सवंग लोकप्रियता मिळवून देणारे निर्णय न घेता, धाडसी अर्थसंकल्प सादर करण्याची संधी अर्थमंत्र्यांना मिळाली आहे. एकीकडे अर्थव्यवस्थेचा वेग कमी होत चालला आहे तर दुसरीकडे देशातील सामान्य लोकांच्या डोक्यावरचे कर्ज वाढत चालले आहे. त्याचबरोबर बचतीचे प्रमाणही चिंताजनकरीत्या कमी झाले आहे. मागणी कमी झाली आहे. त्यामुळे सरकारला करापासून उत्पन्न कमी झाले आहे. त्यातच मध्यमवर्गावरील शाश्वत करापासून मिळणाऱ्या उत्पन्नावर सरकार पाणी सोडेल की नाही, याबाबत साशंकता व्यक्त केली जात आहे. मागणी वाढावी, म्हणून बाजारात चलन फिरले पाहिजे, त्याचबरोबर नागरिकांची बचतही वाढली पाहिजे आणि मध्यमवर्गाला सवलतही दिली पाहिजे, अशा परस्परविरोधी बाबीतून सरकारपुढे काय निर्णय घ्यावा, याचा पेच आहे. नियोजित अर्थसंकलातून सरकार मध्यमवर्गीयांनाही प्राप्तिकरात सूट देऊ शकते, असा अंदाज अर्थसंकल्पाआधी व्यक्त होत आहे. १ फेब्रुवारीला सादर होणाऱ्या सर्वसाधारण अर्थसंकल्पात सरकार यासंदर्भात घोषणा करू शकते, असे मानले जात आहे. वार्षिक १५ लाख रुपये कम वणाऱ्यांनाही सरकार प्राप्तिकरात सूट देऊ शकते, असे सांगण्यात आले आहे.

सरकारला मध्यमवर्गीयांना करात सवलत द्यायची आहे. मंदीमुळे खप वाढवण्याची सरकारची योजना आहे. या कारणांमुळे सरकार १५ लाखांपर्यंत कमावणाऱ्या मध्यमवर्गीयांना प्राप्तिकरात सूट देण्याचा विचार करत आहे. असे झाल्यास लाखो करदात्यांना त्याचा फायदा होईल. दुसरीकडे, अवघ्या तीन टक्के करदात्यांकडून शाश्वत उत्पन्न मिळते. आता कोणतीही निवडणूक नसताना अशा करदात्यांपासून मिळणाऱ्या उत्पन्नाला मुकायचे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. मध्यमवर्ग हा भाजपचा हक्काचा पाठिराखा आहे. तो कुठेही जात नाही, अशी भाजपची पक्की धारणा आहे. दिल्ली आणि बिहार विधानसभेच्या निवडणुकांचा विचार करून प्राप्तिकरात सूट देण्याचा अंदाज असला, तरी सरकार खरेच हा निर्णय घेईल का, याबाबत साशंकता आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, कोणत्याही कटच्या आकारावर अद्याप कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही. याबाबत जो काही निर्णय घेतला जाईल, त्याची घोषणा १ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या सर्वसाधारण अर्थसंकल्पात केली जाईल. सरकारने मध्यमवर्गीयांसाठी प्राप्तिकर कमी केल्यास अशा लोकांच्या हातात अधिक पैसा येईल. या पैशातून देशाच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळू शकते. आज महागाईचा सर्वाधिक फटका मध्यमवर्गीयांना बसत आहे. महागाईच्या तुलनेत पगारवाढ मंदावली आहे. साबण, शाम्पूपासून कार–दुचाकीपर्यंत सर्वच वस्तूंची मागणी कमी झाली आहे. या परिस्थितीत सरकारला प्राप्तिकरात सूट देऊन मध्यमवर्गाला खूश करायचे आहे.

अर्थसंकल्पात प्राप्तिकराच्या कलम ८० सी अंतर्गत कर सूट देण्याबाबत काही घोषणा केली जाईल का, याकडेही लक्ष लागले आहे. प्राप्तिकराच्या कलम ८० सी अंतर्गत एकूण उत्पन्नातून १.५ लाख रुपयांच्या कपातीचा दावा केला जाऊ शकतो. कलम ८० द्वारे एकूण करपात्र उत्पन्न १.५० लाख रुपयांपर्यंत कमी करता येते. मुदत विमा, पाच वर्षांची मुदत ठेव आणि ज्येष्ठ नागरिक बचत योजनेसह इतर योजनांमध्ये गुंतवणूक करून याचा लाभ घेता येऊ शकतो. यावरील सूट बऱ्याच काळापासून वाढवण्यात आलेली नाही. प्राप्तिकराच्या कलम ८० सीव्यतिरिक्त बजेटमध्ये विमा प्रीमियमवरद–खील सूट दिली जाऊ शकते. टर्म इन्शुरन्स आणि हेल्थ इन्शुरन्सला प्रोत्साहन देण्यासाठी अर्थ मंत्रालय उद्योगांकडून आलेल्या सूचनांवर विचार करत आहे. महिलांना विशेष सूट देण्याची मागणी करण्यात आली आहे. सरकार ही मर्यादा तीन लाखांपर्यंत वाढवण्याचा विचार करत आहे, जेणेकरून करदात्यांना अधिक कर सवलत मिळू शकेल. तथापि या सर्व शक्यता आणि अनुमान आहेत, हे लक्षात घेणे महत्वाचे आहे.

✦✦✦



**शेजारी अशांतता असली तर आपणही घरात स्वस्थ राहू शकत नाही. वाड्या–वस्त्यांमध्ये लागू होणारा हा नियम जागतिक पातळीवरही लागू होतो. अफगाणिस्तान आणि पाकिस्तानमधील तणावाकडे, परिणामांकडे आणि संभाव्य घडामोडींकडे आपण सजगतेने बघत आहोत. या दोन देशांदरम्यान झालेल्या ताज्या चकमकीला कोणतेही संबोधन वा कारण दिले गेले तरी सीमेवरचा तणाव ताण वाढवणारा आहे.**

# शेजारी धुसफूस वाढतीये

**विश्वसंचार**

**आरिफ शेख**

जगाच्या अनेक भागांमध्ये युद्धे वा युद्धजन्य परिस्थिती असताना अगदी अलिकडे बघायला मिळालेला अफगाणिस्तान आणि पाकिस्तानमधील तणाव जगाबरोबरच भारतासाठीही काळजीचा विषय ठरतो आहे. या दोन्ही शेजारी देशांमधील संघर्ष तीव्र झाल्यास झळ बसण्याची शक्यता नाकारता येत नाही. विशेषत: भारतावर अनेक पातळ्यांवर परिणाम होऊ शकतो. यामध्ये सुरक्षा, अर्थव्यवस्था, स्थलांतर तसेच राजकीय आणि कूटनीतिक परिणामांचा समावेश होतो. त्यामुळेच पुढील बराच काळ याविषयी चर्चा रंगणार आहे.

अफगाणिस्तान आणि पाकिस्तानमधील तणावाच्या परिणामांबद्दल सविस्तर बोलायचे तर पाकिस्तानमधील अस्थिरता भारत–पाकिस्तान सीमेवरचा तणाव वाढ्वू शकते, हेलक्षात घेत–ले पाहिजे. पाकिस्तानमधील अस्थिर परिस्थितीचा फायदा घेत दहशतवादी गट भारतावर हल्ले करू शकतात. दुसरीकडे, अफगाणिस्तानमध्ये तालिबान सत्तेत असल्यामुळे दहशतव–ादी गटांना आधार मिळण्याची शक्यता वाढली आहे. या गटांचा प्रभाव भारतातील जम्मू–काश्मीरमध्ये बघायला मिळू शकतो. त्यातच अफगाणिस्तान हा जगातील प्रमुख अफू उत्पादक देश आहे. स्वाभाविकच युद्धजन्य परिस्थितीमध्ये भारतामध्ये ड्रग्ज आणि शस्त्रांची तस्करी वाढू शकते. खेरीज चीन हा पाकिस्तानचा जवळचा मित्र असणारा देश या तणावाचा फायदा घेत दक्षिण आशियात वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करू शकतो. इथे लक्षात घ्यायला हवे की, अफगाणिस्तान हा भारताला मध्य आशियाशी जोडणारा दुवा आहे. स्वाभाविकच अफगाणिस्तानम धील तणावामुळे भारताचा मध्य आशियातील व्यापार आणि संपर्क बिघडू शकतो. भारताच्या चाबहार पोर्ट प्रकल्पाला अफगाणिस्तानमार्गे मध्य आशियाशी जोडण्याचा उद्देश आहे. तणाव वाढला तर या मार्गावर काम करणे कठीण होऊ शकते. खेरीज अफगाणिस्तान–पाकिस्तान तणावामुळे मध्य आशियातील ऊर्जा स्रोतांवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे भारतात तेल आणि वायूच्या किमती वाढण्याची शक्यता बळावते.

दक्षिण आशियातील अस्थिरतेमुळे संपूर्ण व्यापार आणि आर्थिक विकासावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. जसे की, अफगाणिस्तान आणि पाकिस्तानमधून स्थलांतरित होणारे शरणार्थी भारताकडे येण्याची शक्यता आहे. यामुळे भारतावर सामाजिक आणि आर्थिक ताण पडू शकतो. प्रादेशिक अस्थिरता भारताच्या विकासासाठी अडथळा ठरू शकते. अफगाणिस्तानचा भारताशी ऐतिहासिक सांस्कृतिक संबंधही आहे. त्यामुळेच अलिकडच्या तणावामुळे भारताचे सांस्कृतिक वारसा क्षेत्रांवरील प्रकल्प आणि संबंध बिघडू शकतात. हे सर्व मुद्दे लक्षात घेता अफगाणिस्तान आणि पाकिस्तानमधील तणावाकडे भारत तटस्थ वा त्रयस्त नज रेतून पाहू शकत नाही हे स्पष्ट होते. त्यामुळेच या तणावाचा साम ना करण्यासाठी भारताला कूटनीतिक, आर्थिक आणि संरक्षणात्म क स्तरावर ठोस पावले उचलावी लागतील, असे तज्ज्ञांचे मत आहे.

या दोन देशांमध्ये अलिकडे झडलेल्या चकमकीत किमान शंभरहून अधिक लोक ठार झाले आहेत. अफगाण तालिबानने अलिकडेच पाकिस्तानच्या हवाई हल्ल्याचा बदला घेतला. अफगाणिस्तान–पाकिस्तानला विभाजित करणारी ड्युरंड रेषा ओलांडून तालिबानी सैन्याने मोठा हल्ला केला. अफगाण तालिबान सैन्याने शेजारील पाकिस्तानमधील अनेक चौक्यांना लक्ष्य केले. तालिबान आता पाकिस्तानी भूभाग काबीज करण्याच्या तयारीत आहे, असे अफगाणिस्तान सरकारच्या प्रवक्त्याने सांगितल्याने पाकिस्तानमधील तणाव वाढला. अफगाणिस्तानचे सरकार ड्युरंड रेषेला दोन देशांमधील विभाजन रेषा मानत नाही. ते तिला काल्पनिक रेषा म्हणतात. तालिबान पाकिस्तानमधील भागाला अफगाणिस्तानचा भाग मानतात. यापूर्वीही सीमारेषेवरून दोघांमध्ये अनेक संघर्ष झाले आहेत.

त्यामुळे ताज्या संघर्षाकडे जगाचे लक्ष आहे. इथे लक्षात घ्यायला हवे की, अफगाणिस्तान स्विकारण्यास नकार देत असणारी ड्युरंड लाइन १९ व्या शतकात ब्रिटनच्या राजवटीत अफगाणिस्तान आणि पाकिस्तानमधील पर्वतीय आणि आदिवासी प्रदेशातून रेखाटण्यात आली होती. १८९६ मध्ये एका कराराद्वारे ती मान्य करण्यात आली होती. ती पश्तून आदिवासी भागातून आणि दक्षिणेकडील बलुचिस्तानमधून जाते. अशा प्रकारे ही रेषा पश्तून आणि बलूच या दोन प्रदेशांमध्ये विभागते. भू–राजनीती आणि भू–रणनीतीच्या दृष्टिकोनातून ड्युरंड रेषा जगातील सर्वात धोकादायक सीमा मानली जाते.

ही रेषा आखताना स्थानिक जमाती आणि भौगोलिक परिस्थिती पूर्णपणे विचारात न घेतल्याने वाद चिघळत गेला. ड्युरंड रेषेजवळ दोन प्रमुख आदिवासी गट राहतात. हे गट पंजाबी आणि पश्तून आहेत. बहुतेक पंजाबी आणि पश्तून हे सुन्नी मुस्लिम आहेत. पंजाबी हा पाकिस्तानमधील सर्वात मोठा वांशिक गट आहे तर पश्तून अफगाणिस्तानमधील सर्वात मोठा आदिवासी गट आहे. पाकिस्तान आणि अफगाणिस्तान सीमेजवळ राहणाऱ्या पश्तूनांचा आरोप आहे की, या सीमेमुळे त्यांच्या घरांमध्ये फूट पडली आहे. नियोजनाचा भाग म्हणून, ब्रिटिश सरकारने पश्तूनबहुल भागांमध्ये एक रेषा आखली. त्यामुळे पश्तून दोन देशांमध्ये विभागले गेले. तालिबान सत्तेत आल्यापासूनच अफगाणिस्तानमध्ये ड्युरंड रेषेवर तणाव वाढला. तालिबान या रेषेला अफगाणिस्तानच्या सार्वभौमत्वाचे उल्लंघन मानते. पाकिस्तान आणि अफगाणिस्तान हे दोन्ही देश आपापल्या सीमेवर दावा करतात. येथूनच तालिबान समर्थित दहशतवादी संघटना पाकिस्तानमध्ये हल्ले करत राहतात. त्यामुळे दोन्ही देशांमधील तणाव वाढत आहे.

या पार्श्वभूमीवर अफगाण आणि तालिबानची लष्करी ताकद किती आहे, हेदेखील जाणून घ्यायला हवे. आजमितीस तालिबानकडे ८० हजार सैनिक आहेत आणि अफगाण सैन्यात पाच ते सहा लाख सैनिक आहेत. याशिवाय अफगाणिस्तानकडे हवाई दल आहे. तथापि, या दाव्यानंतरही तालिबान जमिनीवर मजबूत असल्याचे सिद्ध करणारी अनेक तथ्ये आहेत. तालिबानचे मनुष्यबळ स्त्रोत आदिवासी भागात स्थायिक झालेल्या जमाती आणि त्यांचे लढवय्ये आहेत. याशिवाय कट्टरतावादी धार्मिक संस्था आणि मदरसेही त्यांच्या कल्पनेला पाठिंबा देत आा–हेत. पाकिस्तानी लष्कर आणि 'आयएसआय'ची गुप्त मदत तालिबानसाठी उपयोगी ठरत आहे. पाकिस्तानकडे तालिबानींपेक्षा जास्त सैन्य, हवाई दल आहे. अमेरिका आणि चीनची अद्ययावत शस्त्रे त्यांच्याकडे आहेत; परंतु जगातील अनेक देशांच्या सैन्याला तालिबानने यापूर्वी जेरीस आणले असल्याचे लक्षात घेता दोन्ही देशांमध्ये खरेच युद्ध होईल का, हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो. दोन्ही देश त्यांच्या त्यांच्या देशातील अंतर्गत परिस्थिती, आर्थिक स्थिती, महागाई, मध्ययुगीन फतव्यांमुळे समाजात असणारा रोष कमी करण्यासाठी तर सीमेवर चकमकी घडवत नाही ना, अशीही शंका घेतली जाते.

थोडक्यात, पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमधील वाढता तणाव हे एक मोठे आव्हान आहे. या संकटाचा सामना करण्यासाठी दोन्ही देशांना तातडीने पावले उचलावी लागतील. सीमावाद–ावर शांततापूर्ण तोडगा काढावा लागेल. दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी दोन्ही देशांना एकत्र काम करावे लागेल. दोन्ही देशांमधील तणाव निवळण्यासाठी नेत्यांनी दीर्घकालीन समस्या सोडवण्याचे धाडस दाखवणे आवश्यक आहे. कारण प्रश्न चिघळला, संघर्ष तीव्र झाला आणि त्यात रशियाने उडी घेतली तर अमेरिकाही मागे राहण्याची शक्यता नाही. स्वाभाविकच ही बाब जागतिक शांतता धोक्यात आणण्यास कारक ठरु शकते, याबाबत दुमत असणार नाही. तसेच पाकिस्तान आणि चीनचे जवळचे संबंध लक्षात घेता, चीन या परिस्थितीत पाकिस्तानला मदत करू शकतो, ज्यामुळे भारतासाठी कूटनीतिक पेच निर्माण होऊ शकतो. दुसरीकडे, अमेरिका, रशिया, आणि इतर जागतिक शक्ती या युद्धात मध्यस्थी करण्यासाठी भारतावर दबाव आणू शकतात. म्हणूनच या प्रश्नी आपला सावध राहण्याचा पवित्रा असेल.

✦✦✦

# नवतंत्रज्ञानाच्या अद्भूत आविष्कारांसाठी सज्ज व्हा!

नुकत्याच सरलेल्या वर्षाने जगाला तंत्रज्ञानाच्या बाबतीत प्रचंड वेगाने पुढे नेले. जगण्याशी संबंधित प्रत्येक क्षेत्रावर नवे शोध आणि मानवी नवोन्मेषाचा प्रभाव पडला. आता नव्या वर्षात विज्ञान-तंत्रज्ञानाचा हा विस्तार काही पटींनी वाढेल आणि त्या गतीमुळे आपल्या आयुष्यातही आमूलाग्र बदल घडू लागतील. जगभरात २०२४ मध्ये अनेक नव्या गोष्टी, अतर्क्य, अनपेक्षित घडामोडी घडल्या. त्यातही सर्व स्तरांतील लोकांच्या जगण्यावर प्रभाव टाकणारा, त्यांच्यासाठी औत्सुक्याचा ठरलेला आणि त्यामुळेच चर्चेतही राहिलेला विषय म्हणजे नवतंत्रज्ञानाची झेप! त्यामुळे सरलेल्या वर्षात विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रात काय घडले याचा धांडोळा घेतानाच, त्यातून या नव्या वर्षात आणखी काय घडू शकते, याचाही वेध घ्यायला हवा.

**जेन - एआयमुळे नवी क्रांती**

गेल्या वर्षी झपाट्याने विकसित झालेल्या तंत्रज्ञानाकडे पाहताना अर्थातच पहिले नाव समोर येते, ते जग बदलून टाकणाऱ्या एआय म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्तेचे! एआयच्या क्षेत्राकडे गेल्या वर्षीपर्यंत लोक कुतूहलमिश्रित आश्चर्याच्या नजरेने बघायचे.

आता एआयमध्ये नव्याने अक्षरशः वाटेल ते करू शकण्याची क्षमता निर्माण झाल्यामुळे लोक त्याकडे काहीशा भीतीच्या नजरेने पाहू लागले आहेत. जनरेटिव्ह एआय (जेन- एआय) अर्थात नवनिर्मितीक्षम कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे हवी ती माहिती, सॉफ्टवेअर, त्रिमितीय प्रारुपे, अगदी खऱ्या वाटतील अशा लेखन-चित्रकृती, चित्रफिती, ध्वनिफिती असं काहीही निर्माण करण्याची क्षमता या तंत्रज्ञानात आली आहे.

त्यातून आणखी किती आणि कोणते बदल घडतील, हे आज कुणालाही नेमकेपणे सांगता येणार नाही. जगभरात जवळपास प्रत्येक तंत्राधारित कामात आणि उद्योगात आता जेन-एआयचा समावेश होत आहे. यामुळे भविष्यात माणसाची उत्पादकता व क्षमता यामध्ये प्रचंड वाढ होईल.

**क्वांटम कॉम्प्युटरच्या दिशेने...**

दुसरी मोठी घडामोड क्वांटम संगणकांच्या संदर्भातील आहे. आयबीएम आणि गुगल या कंपन्यांनी त्या बाबतीत आघाडी घेतली आहे. या विषयी सोप्या शब्दांत सांगायचं तर सध्या संगणकांची भाषा बायनरी म्हणजे ० आणि १ ची असते. अशा ० किंवा १ ला बिट म्हणतात. जणू एखादा दिवा बंद असणे किंवा चालू असणे, अशी ही स्थिती असते.

क्वांटम संगणकांत मात्र बिटऐवजी क्युबिट वापरतात. म्हणजेच दिवा फक्त बंद किंवा चालू असण्याऐवजी एकाच वेळी बंद आणि चालूही असू शकेल, अशी स्थिती. यामुळे संगणकाची माहिती साठवण्याची, त्यावर काम करण्याची क्षमता कैकपटींनी वाढते. २०२५ मध्ये ही प्रगती आणखी पुढे जाऊन प्रत्यक्षात क्वांटम संगणक तयार होण्याच्या दिशेने मोठे पाऊल पडेल.

**सिक्स-जी बदलेल रिॲलिटी**

दूरसंचार क्षेत्रात फाइव्ह-जी पाठोपाठ सिक्स-जी तंत्रज्ञान अवतरत आहे.



त्यामुळे अतिवेगाने संदेश, डेटा पाठवला जाण्याबरोबरच आभासी जगामध्ये रममाण होण्यासाठीच्या व्हर्च्युअल रिॲलिटी आणि ऑगमेंटेड रिॲलिटी यांसारख्या क्षेत्रांत प्रचंड बदल होतील.

**अतुल कहाते**

सिक्स-जीमुळे मनोरंजन, आरोग्यसेवा, चालकविरहित गाड्या, विविध यंत्रांचे किंवा यंत्रणांचे एकमेकांसोबतचे संदेशवहन यांमध्ये आमूलाग्र बदल घडतील. या तंत्रज्ञानाच्या विकसनाबाबत २०२४ मध्ये मोठ्या घडामोडी घडल्या, आता नव्या वर्षात ते प्रत्यक्षात अवतरण्यासाठीची परिस्थिती तयार झाली आहे.

**माणसासोबत काम करतील कोबोट**

गेल्या वर्षी एआय आधारित यंत्रमानव अनेक आव्हानात्मक कामे करताना आपल्याला दिसले. अवघड शस्त्रक्रिया करणे, वृद्धांची काळजी घेणे, कारखान्यांतील धोकादायक कामे, हॉटेलमधील कामे अशा अनेक गोष्टी ते करत आहेत.

साहजिकच, नव्या वर्षात अनेक कंपन्या आणि आस्थापना आपले काम सोपे करुन खर्च कमी करण्यासाठी या रोबोट तंत्रज्ञानाची मोठ्या प्रमाणात मदत घेतील. या तंत्राच्या बाबतीत घडलेली अत्यंत रोमहर्षक घडामोड म्हणजे ‘कोबोट’ अर्थात कोलॅबरेटिव्ह रोबोट. यामध्ये माणसासोबत यंत्रमानव एकत्र काम करतात आणि जिथे एकसारखे किंवा धोकादायक काम असेल, तिथे ते माणसाची जागाही घेतात.

**जनुकांनुसार उपचार**

जैवतंत्रज्ञानाच्या क्षेत्रातही २०२४ मध्ये बरीच प्रगती झाली. नव्या औषधांची निर्मिती तसेच जनुकांचे गुणधर्म बदलणे अशा अत्यंत मूलभूत कामांमध्ये या तंत्राचा वापर महत्त्वाचा ठरला. त्यातही एआयचा मोठा वाटा होता. उदाहरणार्थ, वैयक्तिक पातळीवर कर्करोगावरचे औषधोपचार शक्य होतील, अशी घोषणा गेल्या वर्षी पहिल्यांदाच झाली. एखाद्याच्या शरीरातील जनुकांनुसार त्याच्या आजारावर उपचार करण्याची ही अत्यंत महत्त्वाची, संजीवक संकल्पना नव्या वर्षात मूर्त स्वरूपात येऊ शकते.

**शाश्वत उर्जेकडे...**

शाश्वत उर्जेच्या बाबतीतही गेल्या वर्षी आशादायी वाटचाल सुरू होती. क्षमतेत वाढ आणि खर्चात घट अशा दोन्ही आघाड्यांवर ही प्रगती होत आहे. सौरऊर्जेसाठी पेरोव्हस्काइट नावाचे खनिज वापरण्याविषयी बरेच संशोधन सुरू आहे.

या खनिजाची ऊर्जा निर्मितीक्षमता जास्त असते आणि वाढत्या उत्पादनामुळे त्याच्या किमतीही आवाक्यात येत आहेत. त्याचबरोबर, वातावरणातील कार्बन गोळा करुन ऊर्जा निर्मितीसाठी त्याचा वापर करण्यासाठीच्या संशोधनातही २०२४ मध्ये मोठी प्रगती झाली.

टेस्ला, वायमो, क्रूझ आदी कंपन्या चालकविरहित वाहनांच्या निर्मितीत पुढे गेल्या आहेत. भारतामध्ये नजीकच्या भविष्यात अशा गाड्या येणे कदाचित कठीण असेल; पण अमेरिका आणि इतर काही देशांमध्ये मात्र त्या लवकरच रस्त्यांवर धावताना दिसतील.

**प्राण्यांच्या स्टेम सेलपासून कृत्रिम मांस**

मांसाहारामुळे निसर्गाची हानी होत असल्याची टीका होते. त्यावर उपाय म्हणून प्रयोगशाळेत कृत्रिमरीत्या मांस तयार करण्याची भन्नाट संकल्पना आता निर्णायक टप्प्यावर पोहोचली आहे.

उदाहरणार्थ, नेदरलँडची मीटेबल ही कंपनी जिवंत प्राण्यांतील स्टेम सेल काढून, त्यांना कृत्रिमरीत्या पोषण देऊन जिवंत प्राण्याच्या शरीरात असतात तसे स्नायू आणि स्निग्ध पदार्थ बनवते.

अशा प्रकारे प्रयोगशाळेत बनलेले हे मांस फक्त चार दिवसांत खाण्यायोग्य स्थितीमध्ये तयार होते. यामुळे मांसाहारावर निर्बंध न आणताही निसर्गाची हानी टाळणे शक्य होईल, असा दावा केला जात आहे.

**वजन घटवणे ते दीघार्यु होण्यापर्यंत...**

जीवनशैली आणि आहारातील बदलांमुळे जगातील मोठ्या लोकसंख्येला वाढत्या वजनाची समस्या भेडसावत आहे. त्यामुळे आपोआप भूक नियंत्रित करून वजन घटवण्याच्या गोळ्यांबद्दल गेल्या वर्षी प्रचंड कुतूहल निर्माण झाले.

जगातील अनेक कंपन्या अशा गोळ्यांची निर्मिती करत असल्या, तरी ऑझेम्पिक या गोळीची बरीच चर्चा झाली. एलॉन मस्क यांच्यापासून जगभरातील अनेक सेलिब्रिटी ही गोळी घेतात.

एकीकडे या गोळ्यांच्या दुष्परिणामांविषयी इशारा दिला जात असतानाही येत्या काळात अशा प्रकारच्या औषध - गोळ्यांचे प्रमाण वाढण्याचीच शक्यता आहे. त्याचवेळी, चिरतरूण राहणे किंवा दीडशे-दोनशे वर्षे जगणे, अमरत्व प्राप्त करणे अशा गोष्टींवर २०२४ मध्ये खूप चर्चा होत होती. आता प्रत्यक्षात अशक्य वाटणाऱ्या अशा संकल्पनांवर बरेच संशोधन होत आहे आणि नव्या वर्षात ते आणखी पुढे जाईल.

●●●●●●

# विजयचे मारेकरी कोण?

माझ्या मुंबईतील नरिमन पॉईंटच्या कार्यालयामधून मी बाहेर पडलो. स्टेट्स हॉटेलमध्ये बारामतीचे शिक्षक लक्ष्मण जगताप मला भेटण्यासाठी माझी वाट पाहत होते. मी खुर्चीत बसताच जगताप सर माझा हात हातामध्ये घेऊन म्हणाले, भाई, रविवारचा लेख पुन्हा सुरू करा. लेख बंद झाल्यापासून आयुष्यात काहीतरी चुकल्यासारखे वाटते. मी एका क्षणाचाही विलंब न लावता म्हणालो, ५ जानेवारीपासून मी पुन्हा भ्रमंती १५० वर्तमानपत्रांत लिहितोय. तेही मराठी, हिंदी, इंग्लिश, उर्दू, गुजराथी भाषिक पेपरमध्ये येणार आहे.

जगताप सरांनी माझा धरलेला हात सोडत भुवया उंचावल्या. मी, जगताप सर यांच्याशी बोलत असताना मला पुण्यावरून राधिका वहिनीचा फोन आला. वहिनी फोनवर जोरजोराने रडत होत्या. भावजी विजय आम्हाला सोडून गेला, असे म्हणत त्यांनी फोन ठेवला.

काय करावे काही सुचेना. समोर असलेला पाण्याचा ग्लास मी तोंडाला लावला. पाणी पिऊन झाल्यावर मला अश्रू अनावर झाले. झालेला प्रकार जगताप सर यांना सांगितला. त्यांनी मला धीर दिला. क्षणाचाही विलंब न करता मी पुण्याच्या दिशेने निघालो. परभणीचा असलेला विजय निकम आणि माझी मैत्री नांदेडच्या प्रतिभा निकेतन महाविद्यालयामधली. पुढे तो संभाजीनगरलाही उच्च शिक्षणासाठी सोबत होता. पुण्याला एका अभियांत्रिकी महाविद्यालयात विजयला प्राध्यापक म्हणून नोकरी लागली. तेव्हापासून विजय पुण्यात स्थायिक झाला. मी मुंबईतून पुण्याला गेल्यावर नेहमी विजयकडे जायचो. नेहमी भेटीगाठी व्हायच्या.

सर्व चांगले चालले असताना अशी वाईट बातमी आल्यामुळे मला धक्का बसला. विजयसोबतचे सर्व प्रसंग माझ्या डोळ्यांपुढे येत होते. विजयच्या जाण्याने मलाही प्रचंड धक्का बसला होता. माझ्या डोळ्यांतील अश्रू थांबत नव्हते. मी घरी पोहचलो आणि वहिनीने एकदम हंबरडा फोडला. मी स्वतःला सावरत बाहेर पडलो. विजयच्या घरी संपर्क केला.

मन घट्ट करून विजयला गावाकडे घेऊन जाण्यासाठी ॲम्ब्युलन्स घेऊन आलो. विजयचे पुण्यातले सर्व नातेवाईक, मित्र खूप बीझी. जसे त्यांनाच जगात काम आहे. आमच्या सोबत येण्यासाठी कुणी हिंमतही दाखवली नाही. राधिका वहिनीचा चुलत भाऊ म्हणाला, मला डेडबॉडी जवळ भीती वाटते. त्याला आता काय बोलावे मला काही सूचेना.

आम्ही पुण्यातून निघालो. विजयचा मुलगा श्रीकांत अकरा वर्षांचा. मुलगी श्रीजया चार वर्षांची. मुलगी माझ्याजवळ बसली होती. मुलगा एका हाताने विजयच्या 'डेडबॉडी'ला आधार देत राधिका वहिनीला सावरण्याचे काम करत होता. पुणे सोडल्यावर एक दीड तासाने वहिनींनीही आता मन घट्ट करायला सुरू केली होती.

रडून रडून त्यांच्या डोळ्यातले अश्रू आटून गेले होते. वहिनीच्या नजरेला नजर देण्याची माझी हिंमत होत नव्हती. त्या ॲम्ब्युलन्समध्ये मन हेलावून टाकणारे अजून एक दृश्य वारंवार डोळ्यांसमोर होते. विजयची मुलगी श्रीजया मला सतत म्हणत होती, काका मला बाबांसोबत जाऊन झोपायचे आहे. माझ्या बाबाला उठवा ना काका.? मला त्यांच्याशी बोलायचं आहे. माझे बाबा असे का झोपलेत काका, ते माझ्याशी बोलत का नाहीत काका. ती छोटी मुलगी केविलवाण्या आवाजात मला विनंती करत होती, आणि मी तिचा एकही शब्द माझ्या कानात घेत नव्हतो.

माझ्या मनाची अवस्था फार वाईट होती. विजय या जगातून का निघून गेला. कुठला ताण-तणाव विजयच्या मागे होता.? याचं कारण मलाही माहीत होतं आणि वहिनींनाही माहिती होतं. गेल्या आठ महिन्यांपासून विजयचे कुटुंब अत्यंत वाईट परिस्थितीमध्ये चाललं होतं. त्या सगळ्यांमधून सावरताना आणि ती घडी बसवताना विजयला कठोर होता आलं नाही आणि त्यातून विजयला हृदयविकाराचा झटका आला, हे निमित्त झालं.

मी आता सांगतोय हा प्रसंग आहे चार वर्षांपूर्वीचा. विजय नागपूरच्या एका चांगल्या महाविद्यालयामध्ये नोकरीसाठी होता. विजयच्या आईला कॅन्सर झाला होता. आईला पुण्यात सतत दवाखान्यात न्यावे लागायचे. आई-वडिलांची होत असलेली फरपट विजयला पाहावत नसे. त्यांनी मला सल्ल्यासाठी फोन केला आणि विचारलं, मी नागपूरचे महाविद्यालय सोडून पुण्याला येणार आहे. मला पुण्यामध्ये एखाद्या इंजिनिअरिंग महाविद्यालयामध्ये नोकरी पाहा.

आमच्या दोघांच्याही प्रयत्नाने एका महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून विजयचे काम झाले. आईची सेवा करत, पुण्यासारख्या शहरात एका नावाजलेल्या महाविद्यालयामध्ये सेवेची संधी मिळाली. हे दोन्ही विषय घेऊन विजय आनंदी होता. पण तो काम करत असलेल्या महाविद्यालयात तो जसे जसे दिवस घालवत होता, तसे तसे त्या कॉलेजमध्ये नाव मोठे आणि लक्षण खोटे अशीच परिस्थिती आहे, हे विजयच्या लक्षात येऊ लागले.

त्या महाविद्यालयात चार-पाच महिन्यांनंतर पगार व्हायचा. तोही एखाद्या महिन्याचा. विजयकडे कुठून पैशांची आवक नव्हती. महाविद्यालयामध्ये असणारं काम इतकं मोठ्या स्वरूपात होतं की, महाविद्यालयायाच्या कामाशिवाय इतर ठिकाणी चार पैसे मिळतील यासाठी हातपाय हलवायची संधीच नव्हती.

दुसरीकडे काम मिळण्याची संधी येत होती, पण या महाविद्यालयामध्ये दोन-चार महिने थकलेला पगार दुसरीकडे गेल्यावर मिळत नाही.

**श्रमंती लाईव्ह स्टोरी**



**संदीप काळे**

sandip98868@gmail.com

9890098868

असे अनेक किस्से विजय त्या महाविद्यालयाच्या बाबतीमध्ये ऐकून होता. विजय अत्यंत स्वाभिमानी, कोणाला उसने पैसे मागील तर नवल. मागच्या महिन्यात मला राधिका वहिनीचा फोन आला. त्यांनी मला सारी परिस्थिती सांगितली.

त्या म्हणाल्या, आठ महिन्यांपासून विजयचा पगार झाला नाही. मुलांच्या शिक्षणासाठी, संसारासाठी लागणारा खर्च कुठून करायचा, म्हणून विजय फार टेन्शनमध्ये होता. वहिनीच्या फोननंतर मी त्या महाविद्यालयाशी संबंधित असणाऱ्या काही लोकांशी बोललोही होतो. पण काही झाले नाही. मी चार पैशांची मदतही विजयला केली होती.

गेल्या दोन महिन्यांपासून विजय प्रचंड टेन्शनमध्ये आहे असं राधिका वहिनी मला वारंवार फोन करून सांगायच्या. बीपी, शुगर, थायरॉईड सारख्या आजारांनी विजय भोवती विळखा घातला होता, हेही मला वहिनीने सांगितलं. बरे हा प्रश्न एका विजयचा नव्हता, तर त्या महाविद्यालयाशी संबंधित असणाऱ्या हजारो जणांचा होता.

त्या महाविद्यालयात प्रवेशासाठी विद्यार्थ्यांकडून घेतली जाणारी फीस, वेगवेगळ्या स्वरूपात मिळणारी मदत, त्या महाविद्यालयावर असलेला राजकीय वरदहस्त हे सगळं पाहता, त्या प्राध्यापकांची पगार दर महिन्याला करायला त्या संस्थाचालकाला काहीच अडचण नव्हती, पण तरीही तिथे पगार का होत नव्हते याचे उत्तर कोणालाही सापडत नव्हते. आठ दिवसांनी बोलता बोलता विजयने मला सांगितलं होतं की, राज्यामध्ये अडीच हजार संस्था अशा आहेत.

ज्या संस्थांमध्ये काम करणारे साडेचार लाखांहून अधिक शिक्षित माणसे, ज्यांना त्यांच्या कामाचा मोबदला वेळेत मिळत नाही. अनेक ठिकाणी तो बुडवला जातो. हे या राज्यातले कटू सत्य आणि वास्तव आहे. माझ्या डोक्यात विचारांचे काहूर माजवत होते. आज विजय गेला. उद्या कोणीतरी जाईल. परवा कोणीतरी जाईल. हे कधी थांबणार आहे की नाही?

आम्ही विजयच्या घरी पोचलो. अख्खी गल्ली विजयसाठी थांबली होती. आमची गाडी थांबताच विजयचे अनेक नातेवाईक छाती आपटू आपटू रडत होते. विजयची आई मागच्या वर्षीच गेली. तीन बहिणी, एक भाऊ, काका, आत्या सारे जण माझ्याकडे पाहत होते. त्या प्रत्येकाच्या नजरा मला सांगत होत्या, मी ठरवलं असतं तर यातून काहीतरी मार्ग काढला गेला असता.

कोणाचीही समजूत घालण्याची माझी हिंमत होत नव्हती. विजयच्या काकाने विजयचा मुलगा श्रीकांतला घराबाहेर नेलं. श्रीकांतच्या डोक्यावरचे केस काढले. त्याच्या पाठीवर घोंगडी पांघरली गेली.

श्रीकांत तिरडी घेऊन अनवाणी पायाने विजयच्या डेडबॉडी समोर रस्त्याने चालत होता. खूप उशीर झाल्यामुळे विजयच्या डेडबॉडीचा वास सुटला होता. तसाच वास राज्यातल्या शोषण करणाऱ्या अनेक संस्थाचालकांच्या लालचीपणाचा सुटलाय, असा विचार माझ्या मनात ते सारे दृष्य पाहून येत होता.

मी विचार करत होतो, विजयचे मारेकरी नेमके आहेत तरी कोण? विजयच्या अख्या कुटुंबाला रस्त्यावर आणायला कोण जबाबदार आहे? विजयच्या त्या लहान लहान मुलांना अनाथ करायला जबाबदार कोण आहे. ज्या बापाने विजयला त्याच्या मांडीवर लहानाचे मोठे केले, त्याच्या मांडीवर विजयचा मृतदेह होता. हे सारे प्रश्न एका विजयला घेऊन नव्हते. हा प्रश्न राज्यातल्या त्या शोषित असणाऱ्या उच्चशिक्षितांचा आहे. जो निमूटपणे हे शोषण सहन करतो, त्या सर्व शोषितांना हे माहीतच नाही, या शोषणाला प्रचंड राजाश्रय आहे. हे शोषण मुद्दाम जाणून-बुजून केले जाते. या शोषणामध्ये प्रचंड अर्थकारण आहे. ज्या अर्थकारणातून संस्थाचालकांच्या आणि राजकारण्यांच्या घरातून सोन्याचा धूर निघतो. किती सारे प्रश्न होते आणि त्यांची धक्कादायक उत्तरेही होती.

दुसऱ्या दिवशी आम्ही विजयच्या अस्थी गोळा करायला स्मशानात गेलो. त्या राखेमध्ये फार अस्थी नव्हत्याच. असे वाटत होते, त्या संस्थाचालकाने खूप सारे शोषण करून विजयची हाडे शिल्लक ठेवलेच नाहीत. इतकं शोषण विजयचे केलं होतं. दोन दिवस विजयकडे राहून मी पुन्हा परभणीवरून मुंबईला जायला निघालो.

या काळात विजय सारख्याच असणाऱ्या अनेक केस स्टडी मी अभ्यासल्या. अनेक दिग्गजांशी मी बोललो. मला वाटत होते, आपण समजतो, तेवढा हा विषय साधासुधा नव्हता, तर हा विषय अत्यंत गंभीर होता. ज्यांच्याकडे भरभरून आहे तिथेही शोषण होतं.

ज्यांच्याकडे जेमतेम आहे तिथेही शोषण होतं. अशा परिस्थितीमध्ये अडकलेल्या उच्चशिक्षित वर्गाला मदत करण्यासाठी, त्यांचे कुटुंब वाचवण्यासाठी कोणीतरी वाली म्हणून पुढे येणार आहे की नाही? असा प्रश्न मला पडला होता. हाच प्रश्न तुम्हालाही पडला असेल बरोबर ना..

●●●●●●

*चोहीकडे पोहचू दे*
*तुज्या कार्याची कीर्ती*
*स्त्री तूच आहे खरी*
*वात्सल्याची मूर्ती*

# घे कवेत आसमंत..!

**सौ. चैताली संगोपाल वरघट**

**मूर्तिजापूर, जि अकोला.**

**9834583685**

आई, बहिण, मुलगी, पत्नी, प्रियसी व मैत्रीण अशा रूपात आपण स्त्रीला ओळखतो. परंतु तिचे रूप एवढ्या पुरतेच मर्यादित नाही. तर या स्त्रीयत्त्वाची व्याख्या याहीपेक्षा अधिक मोठी आहे.

परंतु पुरुषप्रधान संस्कृतीच्या प्रभावामुळे ती कदाचित आपल्यापैकी अनेक पुरुष आणि स्त्रियांनाही माहिती नसण्याची शक्यता आहे. तिच्या रूपाचा ठाव लागणे खरेच इतके सोपे नाही.

स्त्री ही समाजाचा पाया आहे. पायदळी तुडवली जाणारी वस्तू नाही. झाशीची राणी ही एक स्त्री होती. झाशीच्या राणीने गाजवलेले शौर्य प्रोत्साहनात्मक आहे. इतिहासातील तिचे कार्य स्त्री जातीसाठी नवीन दिशा व प्रेरणा देणारे आहे. मध्ययुगीन काळात भारतीय महिलांचा काळ बदलला. आपल्या समाजात अनेक वाईट प्रथा पसरू लागल्या आणि स्त्रियांचे महत्त्व कमी होऊ लागले.

स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. मनातील इच्छा नसलेल्या गोष्टी बद्दल विरोध करण्याचा, प्रत्यक्ष बोलण्याचा ही अधिकार नव्हता. माणसाच्या कोणत्याही कामात स्त्रीला ढवळाढवळ करता येत नव्हती. स्त्री कोणत्याही जातीची असली तरी तिची इतकी अधोगती झाली की ती स्वतःलाच विसरली. तिलाही समाजात काही महत्त्व आहे.

हे स्वतः स्त्रीच्या लक्षातही आले नाही. विकासाची भावना तिच्या मनातून नाहीशी झाली. नवऱ्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी प्रत्येक योग्य अयोग्य इच्छा समोर डोके टेकवायचे जणू निर्मात्याने तिला यासाठी निर्मित केले आहे. अशी समजूत व्हावी लागली.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीला भारताच्या राष्ट्रीय चळवळी बरोबर सामाजिक चळवळ ही सुरू झाली. समाजात प्रबोधनाची लाट उसळली. राजा राम मोहन रॉय आणि महर्षी दयानंद यांनी समाजातील वाईट प्रथा नष्ट केल्या. महिला समाजाकडे विशेष लक्ष दिले गेले. पुढे महात्मा ज्योतिबा फुले सावित्रीबाई फुले यांच्या नेतृत्वाखाली सामाजिक क्रांती झाली. जनतेला स्त्रीचे महत्त्व समजायला लागले आणि तिचे बंधन सैल होऊ लागले.

शिक्षण आणि समाज दोन शब्दात महात्मा फुलेंचे जीवन कार्य साठवले आहे. महात्मा ज्योतिबा फुले यांनी स्त्री शिक्षणाचा पाठपुरावा केला. पुणे येथे मुलींची शाळा स्थापन करून स्त्री शिक्षणाची सर्वप्रथम मुहूर्तमेढ रोवली. मुलींना प्रथम स्वतः शिकविले पण मुलींना शिकवण्यासाठी शिक्षिका मिळत नव्हत्या म्हणून धर्मपत्नी सावित्रीबाई यांना स्वतः शिकवून त्यांना शिक्षिका केले. तसेच सर्व समाजातील मुलींना शिक्षण मिळावे म्हणून शाळा काढल्या. ती शिकू लागली. राष्ट्रीय चळवळीतही अनेक महिलांनी महत्त्वाचे कार्य केले. सरोजिनी नायडू आणि विजयालक्ष्मी पंडित यांच्यासारख्या मान्यवर महिलांनी पुढे जाऊन स्त्री समाजाची वाट दाखवली. 1947 मध्ये भारत स्वातंत्र झाला. तेव्हापासून भारतात सर्व क्षेत्रात विकासाची कामे सुरू झाली. समाजातील दोष दूर करण्यासाठी सर्वतोपरि प्रयत्न सुरू झाले. सर्वात महत्त्वाची घटना अशी घडली की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लिखित संविधानामुळे भारतातील सर्व जाती जमातीतील मुलींना शाळेमध्ये बसून शिक्षण घेण्याचा अधिकार मिळाला. सोबतच महिलांविषयक हक्काचा पुनर्विवाह करण्याचा अधिकार, घटस्फोट घेण्याचा अधिकार, महिला व पुरुषांना समान अधिकार, वारसा हक्क, पोटगी मागण्याचा अधिकार, हे हक्क स्त्रियांना मिळालेले आहे.

भारतीय संविधान यात असलेल्या स्त्री शिक्षण अधिकारामुळे चांगले आणि वाईट यामध्ये फरक तिला समजायला लागला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे तिला हक्काचे संविधानच मिळाले. भारतीय राज्यघटनेत महिलांना पुरुषाप्रमाणे समान अधिकार देण्यात आले आहे. अशा प्रकारचे कायदेशीर समानता बहुदा पहिल्यांदा स्त्रियांना दिली गेली. स्त्रियांना पुरुषाच्या बरोबरीने अधिकार वाट्याला आले समाजातील प्रगती ही शिकलेल्या मुलींमुळे होते. समाज बळकट होतो.

देशाच्या विकासासाठी स्त्री खूप महत्त्वाची आहे. पुरुषा इतकेच भविष्याची सकारात्मक वाटचाल स्त्रीच्या शिक्षणावर, स्त्री बळकटी करणावर अवलंबून आहे. आणि स्त्रीने हे करूनही दाखवले आहे. आजची स्त्री ही शिक्षणामुळे विविध पदभार सांभाळत आहे. आज महिलांनी शिक्षण, कला, विज्ञान, राजकारण या क्षेत्रात प्रवेश केला आहे. स्त्रिया कोणत्याही बाबतीत पुरुषापेक्षा कमी नाहीत. आज आपण पाहतो की महिलांमुळे समाजात वेगाने प्रबोधन होत आहे.

पुरुषांनाही महिलांचे महत्त्व कळू लागले आहे. महिलांनी अल्पावधीतच हे सिद्ध केले आहे. महिला ही शिक्षण, बुद्धिमत्ता, सौंदर्य कोणत्याही क्षेत्रात कमी नाही. महिलांच्या स्थितीत बरीच सुधारणा झाली आहे. हे बरोबर आहे. पण हा विकास अजून पूर्ण झाला असे म्हणता येणार नाही. शिक्षणाशिवाय देशाचा विकास होणे अशक्य आहे. आशा आहे की लवकरच भारतातील सर्व मुलं-मुली शिक्षित होतील.

सुशिक्षित समाज स्त्री पुरुष एकमेकांचे महत्त्व समजून घेतील. तो दिवस दूर नाही जेव्हा भारतात स्त्री पुरुष दोघेही समानतेने प्रगतीच्या मार्गावर चालतील आणि शाळा, कार्यालय, प्रयोगशाळा आणि लष्करातही मोठ्या प्रमाणात समानतेने काम करताना आढळतील. मुलींनीही आपल्या हक्कासाठी लढले पाहिजे. सावित्रीबाई यांनी त्रास सहन करून स्त्रियांना शिक्षित केले. स्त्रियांच्या हातात वही आणि पेन दिला आहे. त्याच्या चांगला वापर करून शिक्षण घेऊन यशाच उंच शिखर गाठलं पाहिजे..!

●●●●●●

महासागर
# ग्लॅम वर्ल्ड
रविवार ■ दि. १२ जानेवारी २०२५

# दीपिका पदुकोण @ ३९



लोकांच्या मनात एक मोठा गैरसमज आहे की जीवनात सर्वकाही ठीक चालले असेल तर नैराश्य कसे येईल? हे कोणालाही होऊ शकते. याची अनेक कारणे असू शकतात. एका रिॲलिटी शोदरम्यान दीपिकाने हे सांगितले होते. आता ती ३९ वर्षांची झाली आहे.

दीपिका पदुकोणचे वडील प्रकाश पदुकोण हे प्रसिद्ध बॅडमिंटनपटू आहेत. यापूर्वी दीपिकाचाही कल बॅडमिंटनकडे होता. ती राष्ट्रीय स्तरावरील बॅडमिंटनपटूही आहे. ८ व्या वर्षी दीपिकाने पहिल्यांदा एका जाहिरातीत काम केले. तेव्हा तिला बॅडमिंटनमध्ये रस नसल्याचे लक्षात आले.

दीपिका पदुकोणचे आई-वडील, तिची धाकटी बहीण आणि स्वतःच्या नावांचा अर्थ एकच आहे. प्रकाश पदुकोण, उज्ज्वला पदुकोण, दीपिका आणि अनिशा या नावांचा अर्थ एकच आहे, प्रकाश.

दीपिका पदुकोणच्या पालकांना विश्वास होता की ती स्वतःची काळजी घेऊ शकते. अलीकडेच, एका मुलाखतीदरम्यान तिने बालपणातील एका घटनेचा उल्लेख केला. ती म्हणाली, मी १४ वर्षांची असताना आई-वडिलांसोबत जेवण करून रेस्टॉरंटमधून परत येत होते. माझी बहीण आणि माझे वडील पुढे चालत होते आणि मी माझ्या आईसोबत मागे चालत होते. तेवढ्यात एक माणूस आला आणि माझ्याशी गैरवर्तन करू लागला, मला हवे असते तर मी त्या सर्व गोष्टींकडे दुर्लक्ष करू शकले असतो, पण मी मागे वळून त्या माणसाजवळ गेले, त्याची कॉलर पकडली आणि भर रस्त्यात त्याला थप्पड मारून परत आले.

दीपिका पदुकोणला मॉडेलिंगच्या जगात आणण्याचे श्रेय फॅशन गुरू प्रसाद बिडापा यांना जाते. 2004 मध्ये दीपिकाने लिरिल साबणाच्या जाहिरातीत काम केले होते. या जाहिरातीद्वारे तिने लोकप्रियता मिळवली. ती किंगफिशर कॅलेंडर गर्ल देखील राहिली आहे.

दीपिका पदुकोण 'ओम शांती ओम' ऐवजी संजय लीला भन्साळींच्या 'साँवरिया' चित्रपटातून डेब्यू करणार होती, असे म्हटले जाते. नंतर भन्साळींनी दीपिका पदुकोणऐवजी सोनम कपूरला संधी दिली. 2007 मध्ये 'साँवरिया' आणि 'ओम शांती ओम' एकाच दिवशी रिलीज झाले होते. ओम शांती ओम हा चित्रपट हिट ठरला, तर साँवरिया फ्लॉप ठरला.

करीना कपूर खान यापूर्वी संजय लीला भन्साळी यांच्या 'गोलियों की रासलीला-रामलीला' या चित्रपटात काम करणार होती. करिनाला वाटले की रणवीर सिंगची भूमिका तिच्यापेक्षा जास्त ताकदीची आहे. त्यामुळे चित्रपटाच्या शूटिंगच्या अवघ्या 10 दिवस आधी तिने तो सोडला.

करिनानंतर हा चित्रपट दीपिका पदुकोणकडे गेला. येथून दीपिका पदुकोणचे नशीब चमकले. 'गोलियों की रासलीला-रामलीला'नंतर दीपिका पदुकोणने संजय लीला भन्साळींसोबत 'बाजीराव मस्तानी' आणि 'पद्मावत'सारखे ब्लॉकबस्टर चित्रपट दिले.

'गोलियों की रासलीला-रामलीला'च्या शूटिंगदरम्यान दीपिका आणि रणवीर सिंग यांच्यात जवळीक वाढली आणि दोघांनी 2018 मध्ये लग्न केले. दोघेही 9 सप्टेंबर 2024 रोजी पालक झाले. दुआ पदुकोण सिंग असे मुलीचे नाव आहे.

2013 हे वर्ष दीपिका पदुकोणसाठी खूप लकी ठरले. या वर्षी त्याचे गोलियों की रासलीला राम-लीला, ये जवानी है दिवानी, चेन्नई एक्सप्रेस आणि रेस 2 हे चित्रपट हिट झाले. एकीकडे दीपिका सतत यशाच्या पायऱ्या चढत होती. त्याच वेळी ती हळूहळू डिप्रेशनमध्ये जाऊ लागली.

दीपिकाला 2014 मध्ये नैराश्याचा सामना करावा लागला होता. या मुद्द्यावर दीपिका अनेकदा बोलली आहे. तिच्या नैराश्याच्या दिवसांबद्दल दीपिकाने सांगितले होते की, त्या दिवसांत ती आत्महत्येचा विचार करू लागली.

दीपिका पदुकोणने एका मुलाखतीत खुलासा केला होता की तिच्या आईने तिला नैराश्यातून बाहेर येण्यास मदत केली होती. माझी अवस्था पाहून आईने मला काही सामान्य प्रश्न विचारले की हे माझ्या प्रियकरामुळे होते का? उद्योगात काही घडले आहे का? कोणी काही बोलले आहे का? माझ्याकडे या प्रश्नांची उत्तरे नव्हती कारण असे काहीही झाले नव्हते. माझ्या आत फक्त एक शून्यता होती. माझे आई-वडील बंगळुरूमध्ये राहतात आणि जेव्हा ते मला भेटायला यायचे तेव्हा मी नेहमी स्वतःला खंबीर दाखवायचे. सर्व काही ठीक चालले होते, पण एके दिवशी माझे आई-वडील परत जात असताना मी त्यांच्यासमोर तुटून पडले आणि अचानक रडू लागले.

दीपिका सांगते की आई म्हणाली की तू व्यावसायिक मदत घे. मी मानसोपचार तज्ज्ञाकडे गेले. डॉक्टरांनी मला औषधे लिहून दिली आणि माज्या जीवनशैलीत काही बदल करण्याचा सल्ला दिला. प्राधान्य झोप, निरोगी खाणे, व्यायाम आणि सजगता. या प्रक्रियेमुळे मी कोण आहे याची मला अधिक जाणीव झाली. या वेळी मला जाणवले की इतर लोक देखील अशाच मानसिक आरोग्याच्या समस्यांमधून जात असतील. याबाबत लोकांमध्ये प्रबोधन होणे गरजेचे आहे.

दीपिकाने देशात आणि परदेशात अनेक प्लॅटफॉर्मवर नैराश्य आणि मानसिक आरोग्याबाबत जागरुकता निर्माण करण्याचे काम केले. 2015 मध्ये 'द लिव्ह लव्ह लाफ फाउंडेशन' ची स्थापना केली, जे जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि मानसिक आरोग्यासाठी आवश्यक समर्थन प्रदान करण्यासाठी कार्य करते. तिची संस्था महिलांच्या शिक्षणासाठी आणि त्यांच्या आरोग्यासाठीही काम करते. दीपिकाने महाराष्ट्रातील आंबेगाव दत्तक घेतले आहे. दीपिका त्या गावातील वीज आणि पाण्याचा खर्च उचलते.

दीपिका पदुकोणने आई झाल्यानंतरच्या मानसिक आव्हानांबद्दल मोकळेपणाने सांगितले होते, ज्यामध्ये तिने या नवीन भूमिकेत तिला अनेक भावनिक आणि मानसिक आव्हानांना कसे सामोरे जावे लागले हे सांगितले. आई झाल्यानंतर ती बर्नआऊटचा सामना करत होती. त्यामुळे झोपेचा अभाव आणि थकवा याचा थेट परिणाम तिच्या निर्णय क्षमतेवर होत होता. या प्रवासात आपल्याला स्वतःला समजून घेण्यासाठी आणि संतुलित राहण्यासाठी नवीन मार्ग शिकावे लागत आहेत.

दीपिका सांगते की, मला पुरेशी झोप मिळत नव्हती आणि जर मी स्वतःची काळजी घेतली नाही तर माझ्या निर्णय क्षमतेवर परिणाम होईल. या समस्येला बर्नआउट म्हणतात. प्रत्येक नवीन आईला यातून जावे लागते. हा आजार नसून एक भावना आहे.

दीपिका पठाण 2, फायटर 2, ब्रह्मास्त्र 2, 'कल्की 2898 एडी'चा दुसरा भाग याशिवाय द इंटर्नमध्येही दिसणार आहे.

■ ■ ■

# आमिर खानचे सलग ८ चित्रपट फ्लॉप



आमिर खानने आपल्या फिल्मी करिअरमध्ये अनेक हिट सिनेमे दिले आहेत, पण एक वेळ अशी होती की त्याचे 8 सिनेमे फ्लॉप झाले होते. मात्र, त्यानंतर इंद्र कुमार दिग्दर्शित ह्यदिलह्न या चित्रपटाने त्यांचे नशीब बदलले. आपल्या नुकत्याच झालेल्या मुलाखतीत इंद्र कुमारने दिलबद्दल बोलले आणि सांगितले की हा चित्रपट आमिर आणि त्याच्या (इंद्र) करिअरसाठी वरदान ठरला.

इंद्र कुमार म्हणाले, 'कयामत से कयामत तक' या चित्रपटानंतर आमिरचे 8 चित्रपट फ्लॉप झाले होते. आमिर खूप मेहनत करत होता, पण चित्रपटाचे यश अभिनेत्यावर नाही तर दिग्दर्शकावर अवलंबून आहे. हा चित्रपट चालला नसता तर दोघांच्याही करिअरवर परिणाम झाला असता. जर दिल चालला नसता तर आमच्या कारकिर्दीवरही प्रश्न निर्माण झाले असते.

इंद्र कुमार म्हणाले की, आमिरमध्ये नेहमीच प्रतिभा होती, त्याला फक्त एका चांगल्या संधीची गरज असते. यानंतर त्यांना दिल हा चित्रपट मिळाला आणि त्यानंतर त्याची कारकीर्द अशी पुढे गेली की त्याला मागे वळून पाहावे लागले नाही.

आमिर खानचा दिल हा चित्रपट 1990 मध्ये रिलीज झाला होता. हा चित्रपट इंद्र कुमार यांनी दिग्दर्शित केला होता. हा त्या वर्षातील सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट ठरला. या चित्रपटात आमिर खानसोबत माधुरी दीक्षित दिसली होती.

आमिर खानचा 2022 मध्ये रिलीज झालेला लाल सिंग चड्ढा हा शेवटचा चित्रपट होता.

हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर चांगलाच फ्लॉप झाला, त्यानंतर आमिर खानने चित्रपटातून ब्रेक घेण्याची घोषणा केली. यानंतर आमिरने लापता लेडीजची निर्मिती केली, जो खूप गाजला. हा चित्रपट त्याची माजी पत्नी किरण राव हिने दिग्दर्शित केला होता. अभिनेते आणि स्टार्स लवकरच पुनरागमन करणार आहेत. या चित्रपटात वीरेंद्र भारद्वाजची भूमिका साकारण्यासोबतच आमिरने या चित्रपटाची निर्मितीही केली आहे.

■ ■ ■

# कोल्डप्लेला नोटीस

कोल्डप्लेचा अहमदाबाद कॉन्सर्ट 25-26 जानेवारीला होत आहे. कॉन्सर्टपूर्वी अहमदाबादच्या चाइल्ड प्रोटेक्शन युनिटने गायक ख्रिस मार्टिन आणि कोल्डप्ले संस्थेला नोटीस बजावली आहे.

युनिट चेतावणी देते की मुलांचा कोणत्याही स्वरूपात मैफिलींमध्ये वापर केला जाऊ नये. कोणत्याही मुलाला इअरप्लग किंवा श्रवण संरक्षणाशिवाय कॉन्सर्टमध्ये प्रवेश दिला जाणार नाही, अशा सूचनाही संस्थेला देण्यात आल्या आहेत. संगीत कार्यक्रमादरम्यान 120 डेसिबलपेक्षा जास्त आवाजाची पातळी मुलांच्या आरोग्याला धोका निर्माण करू शकते, असेही युनिटने म्हटले आहे. सूचनांचे पालन न केल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल, असेही या एडव्हायझरीमध्ये नमूद करण्यात आले आहे. चंदीगड येथील समाजशास्त्राचे सहायक प्राध्यापक पंडित राव धनेर्वार यांनी केलेल्या तक्रारीच्या उत्तरात ही नोटीस जारी करण्यात आली आहे.



एएनआय या वृत्तसंस्थेशी बोलताना धर्नेवार म्हणाले, मोठ्या आवाजात आणि तेजस्वी दिवे असलेल्या संगीत कार्यक्रमांमध्ये मुलांना सहभागी करून घेतल्याने त्यांचे शारीरिक आरोग्य आणि मानसिक वाढ याच्यावर परिणाम होऊ शकतो.

कोल्डप्लेचे तीन शो मुंबईत होणार आहेत कोल्डप्लेने सप्टेंबरमध्ये 18 आणि 19 जानेवारी 2025 रोजी मुंबईतील डीवाय पाटील स्पोर्ट्स स्टेडियमवर दोन मैफिली सादर करण्याची घोषणा केली होती. पण लोकांची मागणी पाहून बँडने 21 जानेवारीला त्याच ठिकाणी तिसरा शो करण्याची घोषणाही केली होती.

2016 मध्ये मुंबईत झालेल्या गोल्डन सिटीझन फेस्टिव्हलमध्ये कोल्डप्ले बँडने सादरीकरण केले. 80 हजार लोक या शोचा भाग बनले, ज्यामध्ये अनेक बॉलिवूड सेलिब्रिटींचा समावेश होता.

आता 9 वर्षांनंतर बँड पुन्हा भारतात येत आहे. कोल्डप्लेची हाय्म फॉर द वीकेंड, यलो, फिक्स यू ही गाणी भारतात खूप लोकप्रिय आहेत.

कोल्डप्ले बँडची सुरुवात 1997 मध्ये लंडनमध्ये झाली. ख्रिस मार्टिन, जॉनी बकलँड, गाय बॅरीमन, विल चॅम्पियन आणि फिल हार्वे हे या बँडचे सदस्य आहेत. कोल्डप्लेला 39 नामांकनांमध्ये 7 वेळा ग्रॅमी पुरस्कार मिळाला आहे.

■ ■

# ५ लाखांचे शूज घालतो कृष्णा अभिषेक



काही काळापूर्वी कृष्णा अभिषेक आणि गोविंदा 7 वर्षांच्या भांडणानंतर नेटफ्लिक्सच्या द ग्रेट इंडियन कपिल शोमध्ये एकत्र दिसले होते.

यादरम्यान दोघांनीही डान्स केला. आता अर्चना पूरण सिंहने या एपिसोडचा इळर व्हिडिओ शेअर केला आहे. ज्यामध्ये कृष्णाने आपल्या मामासोबत स्क्रीन शेअर केल्याबद्दल आनंद व्यक्त केला आहे आणि सांगितले आहे की, त्याचा 7 वर्षांचा वनवास संपला आहे.

कृष्णाने असेही सांगितले की तो मामा गोविंदाचे कपडे चोरायचा. एवढेच नाही तर कृष्णाने या एपिसोडमध्ये 5 लाख रुपये किमतीचे शूज घातल्याचा खुलासाही केला.

अर्चनाच्या बीटीएस व्हिडिओमध्ये कृष्णा म्हणाला, अशी भेट झाली, मजा आली. मला खूप मजा आली. मला वाटते की तो सर्वोत्तम क्षणांपैकी एक होता. आम्ही एकत्र होतो. आजही त्यांनी सादरीकरणादरम्यान माझा क्लास घेतला. पण ते माझा क्लास घेऊ शकतात कारण ते माझे मामा आहेत. ते काहीही करू शकतात. त्यांनी मला बोलण्याची संधी दिली नाही, पण मी त्यांना सांगू इच्छितो की मी त्यांच्या बऱ्याच गोष्टी चोरल्या आहेत आणि त्यांना त्याबद्दल माहिती देखील नाही.

कृष्णाने असेही सांगितले की गोविंदा कधी कधी त्याला त्याचे कपडे द्यायचा पण जेव्हा तो तसे करत नव्हता तेव्हा कृष्ण त्याचे कपडे चोरायचा. याबाबत तो म्हणाला, माझ्याकडे त्यांच्या कपड्यांचे कलेक्शन आहे, जे त्याने त्याच्या गाण्यात घातले आहे. मी मागितल्यावर त्यांनी मला त्यांचे कपडे दिले नाहीत तेव्हा मी ते चोरून घ्यायचो. मी रात्री चोरी करायचो आणि दुस?या दिवशी त्यांच्यासमोर ते घालून फिरायचो. त्यांच्याकडे इतके कपडे होते की त्यांना माहितही होत नव्हते.

मात्र, एकदा कृष्णा चोरी करताना पकडला गेला. याबाबत तो म्हणाला, एकदा त्यांनी मला पकडले. मी त्यांचा एक शर्ट घातला होता. विचारले असता, तुम्ही मला दिला होता, असे मी सांगितले. तो म्हणाला की मी हा शर्ट देऊ शकत नाही कारण मला अजून चित्रपटाचे काही शॉट्स द्यायचे आहेत. अशा प्रकारे त्यांनी मला पहिल्यांदा पकडले.

कृष्णा पुढे म्हणाला की तो आता वेगळ्या ठिकाणी आहे, कारण त्याने 5 लाख रुपये किमतीचे Dolce & Gabbana शूज घातले आहेत.

■ ■

# चाहतच्या आईचे बिग बॉसला खुले आव्हान



टेलिव्हिजनचा लोकप्रिय रिॲलिटी शो बिग बॉस 18 घरामध्ये होणाऱ्या भांडणांमुळे चर्चेत आहे. स्वतःला सुसंस्कृत म्हणवणारी चाहत पांडे एका पुरुषासोबत रिलेशनशिपमध्ये असल्याचे नुकतेच या शोमध्ये उघड झाले होते आणि तिने एका शोच्या सेटवर तिची 5 वी एनिवर्सरीही साजरी केली होती.

या दाव्यावर आता चाहत पांडेच्या आईने बिग बॉसला खुले आव्हान दिले आहे. जर निर्मात्यांनी चाहतच्या बॉयफ्रेंडचे नाव आणि फोटो दाखवला तर त्या त्यांना 21 लाख रुपये देतील, असे त्यांनी सांगितले.

अलीकडेच, चाहत पांडेच्या आईला याबद्दल विचारण्यात आले, जे तिच्या एनिवर्सरी सेलिब्रेशनचे छायाचित्र असल्याचा दावा करण्यात आला. यावर त्या म्हणाल्या, तो शूटिंगचा फोटो आणि व्हिडिओ आहे. हा कृष्णा मालिकेतील आहे. चाहतच्या मेकअप रूमचा हा फोटो आहे. या मालिकेत 80 जणांची टीम काम करते. जेव्हा एखाद्याचा वाढदिवस असतो तेव्हा चाहत तिच्या बाजूने केक मागवतो. तिने आपल्या सहकलाकारासाठी केक ऑर्डर केला होता कारण त्याच्या लग्नाला 5 वर्षे पूर्ण झाली होती. चाहतशी संबंधित काही असेल तर केकमध्ये लिहिले असते. ती 25 वर्षांची आहे, म्हणजे तिने 5 वर्षांपूर्वी म्हणजेच 20 व्या वर्षी लग्न केले काय?

चाहतची आई पुढे म्हणाली, ती काही वेगळं करत नाही, ती खऱ्या आयुष्यात आहे तशी शोमध्ये आहे. त्यांच्या (बिग बॉस) टीमला ते फोटो आणि व्हिडिओ सापडले आहेत. त्यांनी व्हिडिओमध्ये म्हटले आहे की तो चाहतचा बॉयफ्रेंड आहे.

आम्ही बिग बॉसच्या टीमला एक संदेश देऊ इच्छितो. बिग बॉसच्या विजेत्याला 15-20 लाख रुपये दिले जातात. जर त्यांना चाहतच्या प्रियकराचे नाव आणि फोटो सापडला तर आम्ही त्यांना आमच्याकडून 21 लाख रुपये देऊ. आमचा आमच्या मुलीवर विश्वास आहे म्हणून आम्ही मोठ्या गोष्टी बोलतोय.

■ ■ ■ ■

# जेव्हा गंभीर विषयातील पाणीच निघून जाते...

दिग्दर्शक म्हणून कथेतील संघर्ष दाखवण्याऐवजी आदिनाथ कोठारेंनी स्वतःचा नायक केंद्रस्थानी ठेवल्याने या सिनेमात काही पाणीच राहिले नाही.

महाराष्ट्राच्या अनेक भागांमध्ये पाण्याचा ज्वलंत प्रश्न भेडसावतो. जमिनीमध्ये पाणी मुरवण्यासाठी गावागावांत चर खोदण्याचे काम पाणी फाउंडेशनने सुरू केले. ते करताना श्रमदानासाठी ग्रामस्थांना एकत्र आणणे, त्यांच्यात या नवीन संकल्पनेविषयी विश्वास निर्माण करतानाच त्यांना एकजुटीने या एका उद्देशासाठी प्रेरित करण्याचे काम या गावांमध्ये करण्यात आले. पाणी हा सिनेमा म्हणजे त्यातीलच एका गावकरी युवकाची कहाणी. २०२४ मध्ये प्रदर्शित झालेला हा सिनेमा नुकताच प्राइमवर उपलब्ध झाला आहे.

अशा संकल्पनेवरील सिनेमासाठी पटकथाही सशक्त असायला हवी. नितीन दीक्षित यांनी अशी पटकथा उभी केली आहे. नागरदवाडीतील पाण्याच्या समस्येमुळे गावकरी असलेल्या नायकाशी लग्न करण्यास नायिका नकार देते आणि त्यामुळे नायक जिद्दीने पेटून उठतो. हे कथानक सत्यघटनेवर आधारित आहे. मग गावकऱ्यांचा विरोध, गावातील राजकारणी लोकांनी ठरल्याप्रमाणे काम बंद करण्यासाठी काही गुंड पाठवणे, ते सापडणे आणि त्यातून नायकाचे नेतृत्व गावकऱ्यांनी स्वीकारणे या चिरपरिचित क्रमाने ही पटकथा पुढे सरकते. दिग्दर्शक आदिनाथ कोठारेंनी कथेतील संघर्ष प्रभावीपणे पुढे आणून हा सिनेमा चित्रित न करता स्वतःच



साकारलेला नायक सतत दाखवण्याचा मार्ग पत्करल्याने सिनेमा अपेक्षित परिणाम साधत नाही.

अर्जुन सोरते यांची सिनेमॅटोग्राफी ही सिनेमाची त्यातल्या त्यात सर्वात उजवी बाजू. निव्वळ अर्थपूर्ण फ्रेम्स, बोलका कॅमेरा अनुभवण्यासाठी हा सिनेमा बघावा. चित्रपटाचा ओपनिंग सीन कमालीच्या कौशल्याने चित्रित केल्यामुळे अपेक्षा वाढतात आणि पुढेही या सिनेमॅटोग्राफीने अशीच कमाल दाखवली आहे. फोकस-आउट ऑफ फोकसचा खेळ मराठी सिनेमांमध्ये यापूर्वी इतक्या प्रभावीपणे फार कमी प्रमाणात बघण्यास मिळाला आहे.

आदिनाथ कोठारे यांचा हनुमंत केंद्रे हा गावातील युवक पटवून घ्यावा लागतो. सिनेमामध्ये नायक आदिनाथ कोठारे नसलेले प्रसंग जवळपास नाहीतच. गावातला हा युवक सर्वांना एकत्र आणतो. पुरुषांना एकत्र आणणारा युवक तोच आणि स्त्रियांची एकजूट करणाराही तोच. गावकरी एकत्र आले, तरी विहीर खणून पाणी पहिल्यांदा कोणाला सापडते, या प्रश्नाचे उत्तरही एकच.

ऋचा वैद्य यांनी सुवर्णा ही नायिका साकारताना एकाच चेहऱ्याने वावरण्याची खबरदारी घेतली आहे. नायिकेच्या मेकअपमध्येही अनेक प्रसंगांत विसंगती दिसतात. कधी तिला सुंदर, तर कधी सामान्य दाखवले आहे. त्यामध्ये एकसमान धागा किंवा विचार दिसत नाही. सुबोध भावे प्रत्येक मराठी चित्रपटात दिसत असले, तरी मराठी चित्रपट यशस्वी ठरण्याचा तो फॉर्म्युला नाही, हे सिद्ध झाले आहे.

शिवाय, ते सगळीकडे एकाच पद्धतीचा अभिनय करतात, त्यातही वैविध्य नाही. नाबार्डच्या अधिकाऱ्याचे काम रजत कपूर यांनी केले आहे.

विशेष म्हणजे, सुबोध भावे आणि रजत कपूर सिनेमाच्या सुरूवातीनंतर कथेतून गायब झाले आहेत.

गिरीश जोशींनी साकारलेले प्रमोद हे प्रारंभी नायकाला मार्गदर्शन करताना दिसतात, पण मराठी नायक चतुर आणि चतुरस्त्र असल्यामुळे पटकथा लेखकाने हा मार्गदर्शक पुन्हा चित्रपटात दिसणार नाही, याची जणू खबरदारी घेतली आहे.

या सिनेमाचा नायक आणि दिग्दर्शक स्वतः आदिनाथ कोठारेच आहेत. नायकाने पहार मारल्यावर सापडलेल्या पाण्याचा फवारा इतका मोठा आहे की, त्याच्या उंचीपेक्षाही उंच तुषार निरंतर उडत राहतात आणि त्या पाण्यातून नायक विहिरीच्या काठावर उभ्या असलेल्या नायिकेकडे पाहतो! टीमवर्कचे महत्त्व दाखवण्याऐवजी सगळा बदल एकटा नायक घडवून आणतो आणि हे अविश्वसनीय वाटते.

नागदरवाडीमध्ये पाणी सापडले असले, तरीही पटकथा लिहिताना, दिग्दर्शन करताना हा विषय पाण्यावर केंद्रित करण्याऐवजी नायकाच्या प्रेमावर केंद्रित केल्याने त्याचा प्रभाव पडत नाही. आणखी एक मराठी सिनेमा बघितला, एवढेच समाधान त्यातून मिळते. हनुमंत आणि सुवर्णा यांचे लग्न होते, ते त्याने केलेला पण पूर्ण केल्यामुळे, हे निर्विवाद. पण, त्याचे चित्रीकरण करताना अनेक शिलेदारांपैकी एक असे न दाखवता त्याला हिरो केले आहे.

पटकथा - संवाद लेखनासोबतच नितीन दीक्षित यांनी क्रिएटिव्ह डायरेक्टरची जबाबदारी सांभाळली आहे. परंतु, आदिनाथ कोठारेंनी नेमके काय दिग्दर्शन केले, हे शोधावे लागते. अनमोल भावे यांचे ध्वनी संयोजन उत्तम. पाण्याचा प्रश्न सोडवण्याचा विषय महाराष्ट्राच्या मातीतला आहे. पण, त्यावर प्रभावी सिनेमा झाला असता, तर तो गावोगावी दाखवून त्याद्वारे जनजागृती होऊ शकली असती, अशी खंत नंतर वाटत राहते.

■ ■ ■